Panchayati Raj refers to the System of local self – government operating in rural areas of India. It derives its name from the indigenous systems of governance in villages and among castes and communities by a group or council of elders called Panchayat, who have been prevalent in northern parts of the South Asia for Centuries. In contemporary India, Panchayats, along with municipal corporations in urban areas are the third level of governance , district from the central (federal) and state (provincial) Governments. But in several states in India , they were not given enough power and responsibilities and were neglect, although modern village panchayats have been constituted since the late 1950s. The 73rd Constitutional amendment of 1992 laid out provisions for the creation of local self –government institutions in villages consisting of an elected body called Panchayat which will be accountable to the Gram Sabha – the assembly of all eligible voters in a village. The amendment mandated states to conduct regular elections to Panchayats and also laid out the broad function of Panchayat Raj the preparation and implementation of plans for economic development and social justice. It also made provisions to ensure adequate and sustained financial resources for these institutions to operate autonomously. This research paper looks at how the panchayati Raj system has evolved since independence and what the current situation is. Secondary data is used to write this research paper.

OBJECTIVES:

1. To examine the various committees implemented for the development of rural areas.
2. To study the correlation between Panchayat Raj system and rural development.

HYPOTHESIS:

1. There is no transparency in the implementation of various schemes in rural areas.
2. Representatives from rural areas are not well educated.

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Pethvadgaon, Dist. Kolhapur.

3. Husbands of female representatives are more involved in politics and economics in rural areas.

STAGES OF DEVELOPMENT IN PANCHAYAT RAJ SYSTEM:

1. The Community Development Programme:

On 15 August 1947 , India got an opportunity of redeeming the pledges made to the people during the long –drawn freedom movement. Among the first tasks that India had to assume was the formulation and execution of the first five year plan in the fifties. Post Independence the first major development program launched in India was Community Development Programme in 1952. Core philosophy was overall development of rural areas and people's participation. This program was formulated to provide an administrative framework through which the government might each to the district, tehsil/taluka and village leval.

All the district of the country were divided into "Development Blocks", and a "Block Development Officer(BDO)" was made in charge of each block. Below the BDO were appointed the workers called village level workers (VLW) who were responsible to keep in touch with 10-12 villages. So, a nationwide structure was started to be created. Thousands of BDOs and VLWs were trained for the job of carrying out array of government programmes and make it possible to reach the government to villeges. Top authority was "Community Development Organization" and a Community Development Research Centre was created with best academic brains of the country at that time.

This programme was not successful. It's failure was directly attributed to inadequacy of avenues of popular participation in local level programmes of rural development. This was the conclusion of the study team headed Balwant Rai Mehta.

2. Balwant Rai Mehta Committee Report:

Un 1957, the Balavant Rai Mehta Committee was appointed to study the Community Development Programmes and National Extension Services Programme especially from the point of view of assessing the extent of people's participation and to recommend the creation of the institutions through which such participation can be achieved.

Balwant Rai Mehta was one of the legendry freedom fighters of the country who participated in the Bardoli Satyagraha. He is best known as the second Chief Minister of Gujarat. Balavant Rai Mehta was a parliamentarian when the committee was established . He is credited for pioneering the concept the Panchayati Raj in India and also known as Father of Panchayati Raj in India.

The Key recommendations of Balwant Rai Mehta Committee were as follows.

Panchayati Raj Institutions should be composed of elected representatives and should enjoy enough autonomy and ferrdom. The Balavant Rai Mehta committee recommended a 3-tier Panchayati Raj System which includes:

- Zila Parishad at the District Level.
- Panchayati Samiti at the Blok/Tehsil/Taluka Level.
- Gram Panchayat at the village level

The committee recommended that the Gram Panchayats should be constituted with directly elected representatives, whereas the Panchayat Samiti and Zila Parishad should be the constituted with indirectly elected members.

- The status of the Panchayat Samiti should be of that of an executive body, while the status of the Zila Parishad should be that of an advisory body.

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Peth Vadgaon Dist. Kolhapur.

- The Zila Parishad should be chaired by the District Collector.
- These democratic bodies must be given genuine powers.
- These bodies should be given adequate resources to carry out the functions and fulfill responsibilities.

The Balavant Rai Mehta report was greeted very warmly, and Panchayati Raj was introduced with great fanfare all over the country . The committee recommended a three tire system of rural local government, which is called panchayati raj.The principal thrust of the Mehta report was on the decentralization of democratic institutions in an effort to shirt decision centers closer to the people to ensure their participation , and to put the bureaucracy under local popular control.

The recommendations of the Balavant Rai Mehta Committee were accepted by the National Development Council in 1958 and subsequently Rajasthan in 1959 became the first state in India to launch the Panchayati Raj . The institution of Panchayati Raj was inaugurated by Jawahar lal Nehru on October 2,1959 in Nagaur District of Rajasyhan. Nine days later, Andhra Pradesh became the second state to launch Panchayati Raj at Shadnagar near Hyderabad. The launch of the Panchayati Raj Institutions was thumping success and soon the states started adopting the institutions. This continued for 5-6 years and after that the institutions started crippling due to lack of resources, political will, and bureaucratic apathy and change the government priorities. The rural elites dominated the system and the benefit of the development schemes was not able to reach to the last corner of the country.

The legitimacy of the Panchayati Raj Institutions came under questios. There was not much development in this site until the Congress was thrown out of center and Janta Government came in 1977. However, before that there are some efforts in the form of committees were done to make the system more efficient.

Santhanam Committee:1963

The Balawant Rai Mehta Committee was followed by the Santhanam Committee. This committee was formed by the Government of India to solve the following important practical questions.

- How and in what ratio, the revenues should be handed over to PRIs?
- What should be the criteria of sanction of grants to them by State Government.
- What should be the status of the financial Relations between the different levels of PRIs?

So, in a nutshell, the Santhanam committee's scope of study was the financial matters of the PRIs. The important recommendations this committee made are as follows:

- The Panchayati Raj Finance Corporations should be established.
- All the grants at the state leval should be sent in a consolidated form to various PRIs.
- Panshayats should have power to levy special tax which should be based upon the land revenue and house tax etc.

It turns out that Santhanam Committee gave some Practical recommendations to matters of financial relevance. There was one more major issue of Implementation of PRIs. This was- what should be the point of decentralization? Should it be a Tehsil/Taluks/block or a District? If it is a district, then what should be the relevancy of the middle tier of Panchayat Samitees? If it is to be Tehsil/Taluka/block, then how the effective decentralization can take place looking at vastness of the country?.After this Ashok Mehta Committee and G.V.K.Rao Committee were formed.

Ashok Mehta Committee: 1977

In December 1977, the Janta Government appointed a 13 member committee which was headed by Mr. Ashok Mehta. The committee was appointed for following:

- What are the causes responsible for poor performanceof the PRIs?
- What measures should be taken to improve performance of the PRIs?

The Ashok Mehta Committee submitted its report in 1978 and made more than 130 recommendations. The essence of Ashok Mehta Committee recommendations is as follows:

3-tier should be replaced by the 2-tier system. The upper tier would be the Zila Parishad at the district level and lower tier should be the Mandal Panchayat, which should be Panchayat of group of villeges covering a population of 15000 to 20000. The committee recommended that the base of the Panchayati Raj System should be a Mandal Panchayats. Each Mandal Panchayat should contain 15 members directly elected by the people. The head of the Mandal Panchayat should be elected among the members themselves.

Zila Parishad should be the executive body and made responsible for planning at the district level. The Zila Parishad members should be elected as well as nominated . The MLA and MPs of the area should have the status of the Ex-officio chairman of the Zila Parishads. Development functions should be transferred to the Zila Parishad and all development staff should work under its control and supervision.

From the above recommendation you can see that the Ashok Mehta Committee recommended abolishing the middle tier i.e. Blocks as unit of administration. It recommended that the district should be the first point for decentralization under popular supervision below the state level. In the matters of finance, the committee said that compulsory items of taxation should be put under the jurisdictions of the Zila Parishads so that they are able to mobilize their own financial resources.

The committee recommended that there should be regular audit at the district level and a committee of legislatures should check whether the funds allotted for the vulnerable social and economic groups are actually spent on them.

One more important recommendations of this committee was that there should be Nyaya Panchayats as separate bodies from that of development Panchayats. The Nyaya Panchayats should be presided over by a qualified judge. It was the Ashok Mehta Committee that recommended that there should be a minister for Panchayati Raj in the state council of ministers to look after the affairs of the Panchayati Raj institutions.

Summary, the Ashok Mehta committee made very good recommendations, but before any action could be taken on the recommendations of this committee, the Janata Government collapsed. So, the zeal to implement the recommendations got wiped out. However West Bengal and Karnataka were two state that took initiatives on the basis of recommendations of the Ashok Mehta Committee.

As per the recommendations the Karnataka Government passed the Karnataka Zilla Parishad s, Taluka Panchayat Samitis, Mandal Panchayats and Nyaya Panchayats Act, 1983 (Karnataka Act 20 of 1985). The Ashok Mehta committee noted that except the states of Maharashtra and Gujarat , the PRIs were not given an opportunity to take up implementation at a satisfactory level . The Zila Parishads were not relevant in the implementation of several Government programmes which ought to implement at the grass root level. Committee noted that the bureaucracy was also responsible for the decline for particularly two reasons:

- The officers felt that they are primarily accountable to the state Governments.
- They were not able to adjust to the working under the supervision of the elected representatives.

G.V.K. Rao Committee:1985

The Ashok Metha Committee was followed by GVK Rao Committee in 1985. This Committee was appointed prior to the 7th Five Year Plan, to recommend on an integrated concept for growth and poverty alleviation. The committee had the following tasks:

- Examine the existing administration structure for rural development and detail out the functions and revenue resources of the PRIs.
- Recommend the administrative arrangements for rural development and poverty alleviation programmes.
- Recommend on revitalizing the PRI.

The essence of the recommendations of the GVK Rao Committee is as follows:

- The district level Zila Parishad should be the basic unit for policy planning and programme implementation. The Zila Parishad should be the pivotal body for the scheme of the democratic decentralization.
- The state level planning functions should be transferred to the Zila Parishad for effective decentralized planning.

So, in a nutshell,the GVK Rao Committee was of the view of making the district as the pole of democratic centralization. The committee also recommended that a post of District Development Commissioner should be created,who would work as the CEO of the Zila Parishad. The District Development Commissioner should be the in charge of all the development departments at the district level.

This was a big deviation from the previous committees which recommended the lower bodies as bases and assigned the major role to the Panchayats and Mandal Panchayats in the development.

L.M.Singhvi Committee: 1986

A year after the GVK Rao committee, the Government of India set up Dr. L.M.Singhvi Committee. The Prime Minister was Rajiv Gandhi. The L.M. Singhvi Committee was of the view that the Panchayati Raj Institutions declined in the country because of –

- Absebce of a clear concept.
- Absence of political will.
- Lack of research , evaluation and monitoring .

The committee was in favour of making ways for the PRIs to ensure the availability of the enough financial resources. The L.M.Singhvi Committee is best known for recommending the constitutional status for Panchayats. This was virtually the first committee after decades of India's experiments with the decentralization which found the "Gram Sabhas" as the "incarnation of the direct democracy."

RECOMMENDATIONS:

- The PRIs should be recognized, protected and preserved constitutionally. A new chapter should be added in the Constitution of India which should enshrine the provisions to ensure free, regular and fair elections in the PRIs.

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Peth Vadgaon, Dist. Kolhapur.

- For revenue procedures, the Singhvi Committee was of the view that there should be optional and compulsory levies which should be entrusted to the PRIs. For initial years, the state government may levy on behalf of the PRIs and disburse money to them. This disbursement should be based upon the recommendation of the State Finance Commissions.
- For Jurisdiction of thr PRIs, Nyaya Panchayats should be established for a cluster of villages.
- Gram Sabha is the embodiment of the direct democracy and the village Panchayats should be more organized. Gram Sabha should be given Importance.
- The Singhvi Committee also recommended establishment of the Judicial Tribunals in the states which would tackle the controversies regarding the elections to the Panchayati Raj institutions.

Singhvi Committee versus Sarkaria Commission.

The above recommendations of the Singhvi Committee, though revolutionary, were opposed bt the Sarkaria Commission on Centre-State Relations, which submitted its report in 1988. This commission was of the view that enacting any law on the Panchayats is exclusive power vested in the states and rather than adding new chapter in the constitution, there should be a uniform law, applicable throughout India. A Model bill can be drafted on the basis of consensus among all the state at the level of Interstate Council.

64th Amendment Bill:

Despite the contradictory view of the Sarkaria Commission, the government had zeroed in on giving constitutional protection to the PRIs. In this regard, the 64th amendment bill was introduced in the parliament by Rajiv Gandhi Government on 15 May 1989. The bill got lapsed because it could not pass in Rajya Sabha. This was on 15 October 1989. On 27 November 1989, the tenure of the Rajiv Gandhi government ended and elections were held. Rajiv Gandhi lost the elections, and the result was a minority government under V.P.Singh and the National Front. This was the first minority government , since 1947, with help of the Left Parties and Bharatiya Janta Party, who supported the government from outside.

74th amendment Bill:

The VP Singh Government introduced the 74th Constitutional Amendment Bill on September 7,1990. This bill also got lapsed because the minority Government of VP Singh collapsed leading to dissolution of the Lok Sabha.

72nd Amendment Bill and 73rd Amendment Act:

The 72nd amendment Bill was enshrining a comprehensive amendment of the Constitution and was intraduced on 10th September, 1991 by G. Venkat swamy. The bill was passed in the Lok Sabha on December 22, 1992 and the Rajya Sabha on December 23,1992. After having been ratified by 17 state assemblies this bill came into effect as Constitution 73rd Amendment Act 1993 w.e.f. April 24, 1993.

Thus, April 24,1993 became the landmark day in the history of Panchayati Raj in India.By this amendment act, a new part IX was inserted in the Constitution of India enshrining the provisions for the Panchayats. Here please note that Original part IX was repealed by one the amendments of the constitution. Constitution (Seventy Forth Amendment) Act, 1992 has introduced a new part IXA in the Constitution, which deals with Municipalities.

Present situation of Panchayati Raj:

Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Peth Vadgaon, Dist. Kolhapur.

At present Panchayat Raj system is running through three tier system.To strengthen e-governence in Panchayati Raj Institutions (PRIs) across the country, Ministry of Panchayati Raj (MOPR) has launched e-gramswaraj, a user friendly web-based portal. eGramswaraj aims to bring in better transparency in the decentralized planning, process reporting and work based accounting. Currently "Svamitva" scheme has been launched.

Major Findings:

At present there is transparency in the functioning of Panchayati Raj. E-Governance are being used everywhere. Government benefits are reaching many people at the grassroots level. Welfare schemes of various governments are reaching out to the people.Women power developing in rural areas.Similarly, in Panchayati Raj System, Women representatives are being elected. Overall, the Panchayati Raj System has been Successful. In this regard, the Balwant Rai Committee has to be Considered first.

SOURCE:

Books:

1. M.Aslam, "PANCHAYATI RAJ IN INDIA", National Book Trust, India.New Delhi. First Edition , 2007.pp. 18,19.
2. Patil V.B. "Panchayat Raj", Prashant Publication, Jalgaon ., First Edition ,2012.pp. 78,79.
3. Kondekar A.Y., " Rural Sociology", Phadke Prakashan , Kolhapur.,First edition 2005.pp. 124,125.
4. Singh Yogendra.,"Social Change in India", K'Sagar Publications, Pune., First edition,2009.pp. 100,101.

Weblinks:

1.En.m.wikipedia.org 2. Particpedia.net 3. www.surendranathcollege.org.
3. www.gktoday.in

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Peth Vadgaon, Dist. Kolhapur.

संतोष विरनाक

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

विद्यावार्ता

Special Issue

Sarvoday Shikshan Sanstha's

Arts, Commerce and Science College, Kowad.

Tal. Chandgad, Dist. Kolhapur (Maharashtra) – 416508

(Affiliated to Shivaji University, Kolhapur)

Re-accredited by NAAC 'B+'

Email : kowad2.cl@unishivaji.ac.in Web : www.acscollegekowad.com

One day National Online Webinar on

Dr. Babasaheb Ambedkar's Human Rights, Socio-Economic and Political Thoughts

Date : 10/04/2022, Day : Sunday

Organized by NSS and Sociology Department under the aegis of IQAC.

Dr. Khanderavaji S. Kale
Cordinator

Dr. V. K. Dalvi
Co-coordinator

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.0741/2/MH/26/1/P/TC/251/95

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At Post Limbaganesh Tq Dist Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubl@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Peth Vadgaon, Dist. Kolhapur.

13) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना यांचे परस्पर संबंध — एक ...
गोविंद यशवंतराव पाटोळे, पुणे ||66

14) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय आणि सामाजिक विचार
डॉ. बेलखेडे महादेव बी., जि.नांदेड ||70

15) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार
प्रा.शिवानंद सुरेश शिदगौंड, कोवाड ||75

16) डॉ.बाबासाहेब आंबेडक आणि भारतीय राज्यघटना
प्राध्यापिका ज्योती लक्ष्मण सोनवणे, इगतपुरी ||78

17) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दलित स्त्रीयाविषय सामाजिक विचार
सिमा मुकूंदराव कांबळे, औरंगाबाद ||85

18) आर्थिक आणि सामाजिक विचार
श्री. आकाश संजय ब्राम्हणे, श्री. अभिजीत आबासो पाटील, कोल्हापूर ||88

19) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार
डॉ. संतोष तात्यासो बिरनाळे, जि. कोल्हापुर ||93

20) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार आणि स्त्रीमुक्ती
दिपिका दशरथराव बनसोडे, औरंगाबाद ||97

21) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक विचार
अभिनित्ता लक्ष्मण बनकर, औरंगाबाद ||99

22) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समाजशास्त्रीय विचार: एक संक्षिप्त अभ्यास
डॉ. राज चव्हाण, प्रा. सोनिया चव्हाण, सातारा(स्वायत्त) ||103

23) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री सशक्तीकरण विषयक विचार आणि कार्य
श्री. किरण गणपत कुंभार, सातारा ||110

24) Educational Philosophy of Dr. Babasaheb Ambedkar
Prof. Ambadas Ashok Mane, Dist. Pune ||113

25) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण विषयक विचार
डॉ. गंगासागर तुळसीदास चोले, जि. कोल्हापूर ||117

26) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार व कार्य : एक समाजशास्त्रीय ...
डॉ.सुनिषा बालासाहेब देशमुख, जि.बीड ||119

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Peth Vadgaon, Dist. Kolhapur.

19

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार

डॉ. संतोष तात्यासो बिरनाळे
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,पेठ–वडगांव
जि. कोल्हापुर

घोषवारा :–

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, घटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष, दलितांचे उध्दारकर्ते म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य अनमोल आहे. संपूर्ण जगामध्ये त्यांची ख्याती शिक्षणतज्ञ, ग्रंथकार, प्राध्यापक, देशभक्त म्हणून असलेले आपणास पहावयास मिळते. त्यांनी अर्थशास्त्र, इतिहास व राजकारणावर विपुल असे ग्रंथ लेखन केलेले आहे. निरनिराळ्या धर्मग्रंथांचा तौलनिक अभ्यास करून त्याविषयी आपली मतं व्यक्त केलेली आहेत. नेहरूंच्या मंत्रिमंडळात कायदे मंत्री पदाची धुरा त्यांनी यशस्वीपणे सांभाळली आहे. सन १९९० मध्ये भारतातील सर्वोच्च भारतरत्न या पदवीने त्यांना सन्मानित केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना अनेक पैलू आहेत. यामध्ये सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक व आर्थिक इत्यादींचा समावेश होतो. परंतु त्यांच्या आर्थिक विचारांच्या पैलूकडे अनेक लोकांचे दुर्लक्ष झालेले पाहावयास मिळते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक पैलूकडे प्रकाशझोत टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१. प्रास्ताविक:–

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पदवी व पीएच. डी साठी लिहिलेल्याप्रबंधातून अर्थशास्त्रीय विचार स्पष्ट होतात. विविध विषयावर त्यांनी केलेल्या लिखाणामधून त्यांच्या आर्थिक विचारांची कल्पना येते. त्याशिवाय स्वतंत्र मजूर पक्ष, अ. भा. शे. का. फेडरेशन यांचे निवडणूक काळातील जाहीरनामे, भारतीय राज्यघटनेवरील भाषणे, बहिष्कृत भारत व मुकनायक या पत्रकामधील लेखन यामधून त्यांचे आर्थिक विचार प्रतिबिंबित होतात. त्याशिवाय त्यांच्या अनेक ग्रंथांमधून ही अर्थशास्त्रीय विचार मांडलेले पहावयास मिळतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अर्थशास्त्रामध्ये दर्जेदार स्वरूपाचे लेखन केलेले आहे. म्हणूनच अर्थशास्त्रज्ञ म्हणून त्यांच्या दुर्लक्षित राहिलेल्या पैलूवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधामध्ये केलेला आहे.

२. उद्दिष्टे:–

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'आर्थिक विचारांचा' अभ्यास करणे.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'शेतीविषयक विचारांचा' अभ्यास करणे.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'चलनविषयक विचारांचा' अभ्यास करणे.

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'सार्वजनिक आयव्ययाचा' अभ्यास करणे.

३. संशोधन पद्धती:–

प्रस्तुत शोधनिबंध दुय्यम सामग्रीवर अवलंबून आहे. प्रस्तुत शोधनिबंधासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विविध मासिकातील प्रकाशित व अप्रकाशित लेख, अर्थशास्त्रीय ग्रंथ, त्यांची विविध भाषणे आणि इंटरनेट इत्यादी साधनांचा आधार घेतलेला आहे.

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दर्जेदार अर्थशास्त्रीय लेखन :–

१. 'एडमिनिस्ट्रेशन अँड फायनान्स ऑफ ईस्ट इंडिया कंपनी' १९१५ (एम.ए. ची पदवी संपादन करण्यासाठी कोलंबिया विद्यापीठात सादर केलेला प्रबंध)

२. 'स्मॉल फोल्डिंग इन इंडिया अँड देअर रेमिडीज' १९१८ (जनरल ऑफ दि इंडियन इकॉनॉमिक सोसायटी मध्ये प्रकाशित लेख)

३. 'द इव्होल्युशन ऑफ प्रॉव्हिन्शियल फायनान्स इन ब्रिटीश इंडिया' १९२५ (पीएच. डी. साठी सादर केलेला प्रबंध)

४. 'द प्रॉब्लेम ऑफ रुपी, इट्स ओरिजिन अँड इट्स सोल्युशन' १९३२ (डी. एससी. साठी सादर

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Peth Vadgaon, Dist. Kolhapur.

केलेला प्रबंध)

५. 'बहिष्कृत भारत' पत्रिकेतील अग्रलेख — 'महार आणि त्यांचे वतन' दि. २ १६, ३०–०६–१९२७

६. 'बहिष्कृत भारत' पत्रिकेतील अग्रलेख — 'खोती उर्फ शेतकरी वर्गाची गुलामगिरी' दि. ०३–०५–१९२७

५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्थशास्त्रीय विचार :—

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्थशास्त्रीय विचारांची विभागणी पुढीलप्रमाणे करता येईल. शेतीविषयक विचार, चलनविषयक विचार व सार्वजनिक आयव्ययविषयक विचार.

प. शेतीविषयक विचार

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतीविषयक विचार त्यांच्या विविध ग्रंथात मांडले आहेत. भारतीय शेतीचे लहान धारण क्षेत्र, जमीन महसूल, सामुदायिक शेती, सहकारी शेती, महार–वतन व खोती पद्धत याबद्दलचे विपुल लेखन त्यांच्या ग्रंथात आढळते. सन १९१८ मध्ये प्रसिद्ध झालेल्या Small Holdings in India and Their Remedies (भारतीय अल्प भूधारणा आणि त्यावरील उपाय) आणि सन १९४७ मध्ये प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या States and Minorities (राज्य आणि अल्पसंख्यांक) या ग्रंथात शेती विषयक विस्तृत असे लेखन झालेले आढळते.

अ. भारतातील लहान धारणक्षेत्र आणि त्यावरील उपाय

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सन १९१८ मध्ये प्रसिद्ध झालेल्या Small Holdings in India and Their Remedies (भारतातील लहान धारणक्षेत्र आणि त्यावरील उपाय) या लेखात भारताच्या शेती विषयक प्रश्नांसंबंधी विचार मांडले आहेत. भारतीय शेतीमध्ये लहान धारणक्षेत्र ही एक गंभीर समस्या आहे. त्यामध्ये सुद्धा धारणक्षेत्र विखुरलेले असल्याने ही समस्या अधिक गंभीर झाली आहे. भारत हा कृषिप्रधान देश आहे. ७०% लोक शेतीवर अवलंबून आहेत. शेती धारणक्षेत्र यासंदर्भात विचार करत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एकूण तीन प्रश्न उपस्थित केलेले आहेत. तसेच त्याचे स्पष्टीकरण सुद्धा दिलेले आहे.

१. धारणक्षेत्राचे विखंडन मुळात का होते?

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते 'वारसा हक्क' हे जमिनीच्या विभाजनाचे मुख्य कारण नसून शेतीवर असणारा 'लोकसंख्येचा अतिरिक्त भार' हेच शेतीच्या विभाजिकरणाचे मुख्य कारण आहे. उपजीविकेच्या साधनांची कमतरता असल्यामुळे लोक शेतीचे लहान लहान तुकडे करण्याचा मार्ग स्वीकारतात. उपजीविकेचा दुसरा कोणताही मार्ग उपलब्ध असता तर त्यांनी हे तुकडे करणे सोडून दिले असते.

२. किफायतशीर धारणक्षेत्र कसे ठरवायचे?

किफायतशीर धारणक्षेत्र म्हणजे नुसते जमिनीच्या आकारमान नसून धारणक्षेत्र आणि कार्यदक्ष मशागत करण्यासाठी आवश्यक असलेली इतर सामग्री यांचा योग्य मेळ होय. त्यामुळे लहान धारणक्षेत्र ही भारताची समस्या नसून भांडवल व इतर साधनसामुग्रीचा तुटवडा ही खरी समस्या आहे. शेतीत अतिरिक्त उत्पादन न झाल्यामुळे बचत कमी होते व त्यामुळे भांडवल तुटवडा निर्माण होतो. मोठे धारणक्षेत्र किफायतशीर व लहान धारणक्षेत्र अकिफायतशीर हा युक्तिवाद चुकीचा ठरू शकतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, शेती हा उत्पादन उपक्रम असून त्याला उपभोगाचा निकष लावून किफायतशीर धारण क्षेत्र ठरविणे चूक आहे.

३. विखुरलेल्या व लहान धारणक्षेत्राच्या समस्येवरील उपाय कोणता?

विखुरलेल्या व लहान धारणक्षेत्रावरील उपाय म्हणजे 'औद्योगीकरण' होय. औद्योगिकरणामुळे शेतीक्षेत्रातील बेकार श्रमिक बिगर शेतीक्षेत्रात सामावून घेतले जातील उपजीविकेसाठी त्यांना इतरांवर अवलंबून राहावे लागणार नाही ते श्रमिक स्वत: काम करून राष्ट्रीय उत्पन्नात भर घालतील. जमिनी पासून मिळणारा फायदा संपुष्टात येऊन जमिनीवरील भार कमी होईल परिणामी विभाजन व विखंडन कमी होईल. भांडवल व इतर साधनांचा वापर वाढल्याने आपोआप धारण क्षेत्र मोठे करावे लागतील.

ब. जमीन महसूल

जमीन महसूल हा अन्यायकारक आहे. जमीन महसूल आकारताना उत्पन्नावर आकारणी अन्यायकारक आहे. कमी उत्पन्न असणाऱ्या शेतकऱ्यांकडून कमी

Dr. Babasaheb Ambedkar Vidyalaya Peth Vadgaon, Dist. Kolhapur

महसूल घेतला पाहिजे. त्यांच्यामते जमीन महसुलाची आकारणी ही शेती उत्पन्नाच्या प्रमाणात केली पाहिजे. यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जमीन महसूल संहितेचे घटक वे कलम रद्द करून जमीन महसूल प्राप्तिकराच्या कक्षेत आणला पाहिजे असे विचार व्यक्त केले आहेत.

क. सामुदायिक शेती

शेती उत्पादन वाढविण्यासाठी यंत्रप्रधान शेती, विस्तृत शेती तसेच सहकारी व सामुदायिक शेती आदींचा पुरस्कार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेला होता. जमीनदारीचे उच्चाटन झाल्यानंतर शेतकऱ्याला जमिनीची वैयक्तिक मालकी न देता शेती हा राज्य सरकारचा प्रमुख उद्योग मानावा असे मत त्यांनी व्यक्त केले. पडीक जमीन लागवडीखाली आणावी त्यामुळे कृषी उत्पादन वाढेल यासारखे विचार त्यांच्या 'स्वतंत्र मजूर पक्षाच्या जाहीरनाम्यातही असलेले आढळतात'.

ड. सहकारी शेती

विखुरलेल्या व लहान धारण क्षेत्राला एकत्रित आणायचा असेल तर सहकारी शेती हा एक उत्तम पर्याय आहे. शेतकऱ्यास त्याच्या धारणक्षेत्राला लागून असलेल्या धारणक्षेत्रास जोडल्या शिवाय जमीन कसता येणार नाही. सहकारी शेत हे मोठ्ठ आकारमानाचे असेल तरच ते एकसंघ ही असेल. सहकारी शेतीच्या बाबतीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वरील विचार मांडले आहेत.

इ. महार वतन

महार वतनातील अनेक दोष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दाखवून दिले आहेत. जमिनीच्या शोड्ढ तुकड्यासाठी २४ तास काम, दर महिन्याला दोन आणे ते रुपया—दीड रुपया असा मुशाहिरा मिळे असे दोषपूर्ण महार वतन खालसा करावे असे मत व्यक्त करताना त्याविषयीची कारणेसुद्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्पष्ट केली आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, महार वतन का खालसा करावे? याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

१. वतनामुळे महार स्वाभिमानशून्य झाले आहेत.

२. महारांची महत्त्वकांक्षा मारली गेली आहे.

३. वतनदारी नष्ट केल्याशिवाय सामाजिक सुधारणा अशक्य आहेत.

सन १९२८ मध्ये मुंबईच्या विधिमंडळात कायद्यामध्ये दुरुस्ती सुचविणारे विधेयक त्यांनी मांडले होते. परंतु १९२९ मध्ये ते मागे घेण्यात आले. १९३९ मध्ये पुन्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महारांच्या वतनी जमिनी रयतवारी जमिनी कराव्यात, महारांना सरकारी कनिष्ठ नोकर समजून मासिक वेतन द्यावे व फक्त सरकारी कामे त्यांना सांगावीत अशा मागण्या केल्या. महारांनी जमिनीच्या लहान तुकड्यावर गुजराण न करता पडीक जमीन लागवडीखाली आणावी असे त्यांचे मत होते.

ई. खोती पद्धती

ब्रिटिश कालखंडामध्ये रत्नागिरी, कुलाबा इत्यादी भागात जमीन कसण्यासाठी खोती पद्धत अस्तित्वात होती. जमिनीच्या महसूलाकरिता सरकारचा प्रतिनिधी म्हणून खोत काम करत असे. शेतकऱ्याला सरकारी देणी देऊन खोती हक्काबद्दल वेगळे देणे द्यावे लागे. हा खोत विविध प्रकारे शेतकऱ्यावर जुलूम करीत असे. प्रसंगी अनेक वेळी खोत शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावत असे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी खोती पद्धती विरुद्ध रत्नागिरी येथील दलित वर्गीयांच्या परिषदेत आवाज उठविला. जमीन कसणाऱ्यांना कुळांचे वहिवाटीची हक्क मिळावेत व रयतवारी पद्धती आणावी यासाठी मुंबई विधिमंडळात घर्त्ती मध्ये त्यांनी खोती पद्धती रद्द करण्यासंबंधीचे विधेयक मांडले.

पप. चलनविषयक विचार

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'डॉक्टर ऑफ सायन्स' पदवीसाठी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मध्ये जो प्रबंध सादर केला होता. त्यावर आधारित The Problem of Rupee हा ग्रंथ १९२५ मध्ये प्रसिद्ध केला. १९४७ साली History of Indian Currency and Banking या नावाने तो ग्रंथ पुन्हा प्रकाशित झाला. यामध्ये त्यानी भारतासाठी आदर्श चलन पद्धती कोणती यावर आपले विचार मांडले आहेत. प्रा. केन्स व ईतर अर्थतज्ज्ञांनी सुवर्ण विनिमय परिमाण लवचिक असल्याने व या व्यवस्थेची निर्मिती ही देशातील सोन्याच्या साठ्यावर अवलंबून नसल्याने ही पद्धती भारतासाठी योग्य आहे असे प्रतिपादन केले. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी याला कडाडून विरोध केला. त्यांच्या मते, या व्यवस्थेची निर्मिती लवचिक असल्यामुळे ती

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Peth Vadgaon, Dist. Kolhapur.

अनिर्बंध होऊ शकते. यातून भाववाढ निर्माण होऊन रुपयाची किंमत घसरु शकते. सुवर्ण विनिमय परिमाण असताना भारतात कशीभाववाढ झाली याचे साधार विवेचन त्यांनी दिले. त्यांना सुवर्ण परिमाण पद्धती हीच भारतासाठी योग्य असून ऐतिहासिक पुरावे देऊन सुवर्ण परिमाण पद्धतीत भारतात किमती कशा स्थिर होत्या हे दाखवून दिले.

रिझर्व बँकेच्या निर्मितीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरयांचे योगदान

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाच्या मध्यवर्ती बँकेच्या निर्मितीसाठी नेमलेल्या 'हिल्टन यंग' कमिशनसमोर साक्ष दिली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाच्या मध्यवर्ती बँकेच्या संदर्भात केलेल्या शिफारशी आयोगाने स्वीकारून त्या ब्रिटीश सरकार समोर सादर केल्या. या शिफारशी तत्कालीन ब्रिटिश सरकारनेही स्वीकारल्या. त्यामुळे ब्रिटीश सरकारने भारतामध्ये १ एप्रिल १९३५ साली मध्यवर्ती बँकेची स्थापना केली आणि नंतर या बँकेचे १ जानेवारी १९४९ रोजी राष्ट्रीयीकरण करण्यात आले. पुढील काळात हीच बँक देशाची मध्यवर्ती बँक म्हणजेच 'रिझर्व बँक' म्हणून ओळखू लागली. म्हणजेच भारतातील मध्यवर्ती बँक स्थापन करण्याचे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे जाते.

पपप. सार्वजनिक आयव्यय

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एम. ए. च्या पदवीसाठी Administration and Finance of the East India Company हा शोधनिबंध लिहिला. तसेच पीएच. डी. पदवी साठी The Evaluation of Provincial Finance in British India हा प्रबंध लिहिला. या दोन्ही प्रबंधात त्यांचे सार्वजनिक आयव्यय विषयक विचार आढळतात.

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन व वित्तव्यवस्था १७९२ ते १८५८ मध्ये भारतीयांच्या दृष्टिकोनातून कसे अन्यायकारक होते हे आपल्या प्रबंधातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दाखवून दिले. जवळपास ६० वर्षांच्या कालखंडामध्ये भारतीय जनतेची प्रचंड आर्थिक पिळवणूक ईस्ट इंडिया कंपनीने केली. या काळात एकूण महसूल ५५ लाख पौंडवरून ३१७ लाख पौंड इतका वाढला. पैकी ५४ टक्के वाटा हा जमिनीवरील करातून होता. हा अत्यंत जाचक कर असून त्यामुळे भारतातील शेतकरी वर्ग पिचला जात होता. तसेच ब्रिटिशांनी अंतर्गत कर्जे मोठ्या प्रमाणात उभारली. ही रक्कम ७० लाख पौंड वरून ६०७ लाख पौंड झाली असून या कंपनीने इंग्लंडमध्ये किती कर्ज उभारावी याला निर्बंध असल्याने विदेशी कर्ज फारसे उभारले नाही. महसुली उत्पन्न प्रचंड असा त्यांचा विनियोग करताना मात्र भारतीय जनतेच्या विकासासाठी अत्यंत नगण्य रक्कम खर्च करण्यात आली.जॉन ब्राईट या परदेशी तज्ञाचाही दाखला त्यांनी दिला आहे. त्यांच्या मते, मॅचेस्टर या एका शहरात पाण्यावर जेवढा खर्च होतो. त्यापेक्षा कमी खर्च भारतासारख्या देशात सार्वजनिक बांधकामावर केला जातो. १८५८ मध्ये ईस्ट इंडिया कंपनी बरखास्त झाल्यानंतर ६६३ लाख पौंड कर्जाचा बोजा दरिद्री भारतावर टाकून अन्याय केला आहे. महसुलाचा विनियोग भारताशी संबंधित नसलेल्या बाबींवरही करण्यात येत आहे हे त्यांनी सप्रमाण दाखवून दिले.

६. समारोप :–

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या विविध ग्रंथांमधून विपुल अर्थशास्त्रीय लेखन केलेले आढळून येते. त्यांचे कार्य विशिष्ट वर्गातपुरते मर्यादित नसून शेतकरी, शेती, उद्योग, परकीय व्यापार, वित्तव्यवस्था, बँकिंग, गरिबी, विषमता यासारख्या अनेक घटकांबद्दल असलेले पहावयास मिळते. भारतीय अर्थव्यवस्था भक्कम व्हावी यासाठी त्यांनी दिलेले योगदान अतुलनीय आहे. आपल्या विविध ग्रंथांमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या आर्थिक विचारांचा स्वीकार भारताने केल्यास तो अधिक चांगल्या प्रकारे प्रगती करू शकेल.

७. संदर्भसूची :–

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर — धनंजय कीर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई (१९९९)

२ भारतातील लहान जमिन धारणक्षेत्र व त्यावरील उपाय – डॉ. बी आर आंबेडकर, भारतीय अर्थशास्त्र सोसायटीचे जर्नल, खंड–१ (१९१८)

३. आर्थिक विचारांचा इतिहास – संपादक, प्रा. डॉ. जे. एफ. पाटील, फडके प्रकाशन, (जानेवारी २०१६)

४. आर्थिक विचारांचा इतिहास – डॉ. अनिलकुमार वावरे, प्रा. संजय धोंडे व डॉ. अनिल सत्रे, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद (जून २०१५)

५. महाराष्ट्र शासन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लिखाण व व्याख्याने खंड–१ (१९७९)

६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे

Perh Vatgaon, Dist. Kolhapur.

Peer reviewed Journal Impact Factor: 7.265 ISSN-2230-9578

Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Referred Journal


March-2022 Volume-13 Issue-16

Chief Editor
Dr. R. V. Bhole
Editor
Dr. C. V. Murumkar
Co-Editor
Dr. S.K. Patil
Mr. K.V. Kulkarni









Address
Ravichandram, Survey No. 101/1, Plot No. 23, Muktadeo Nagar, Jalgaon (M.S.) 425 002

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

CONTENTS

Sr. No.	Paper Title	Page No.
1	भारत में जैविक कृषि Dr. Kapil Panchabhai Ghosiya	1-4
2	'एकबेतवा – एकमीरा – एकउर्वशी'('बेतवाबहतीरही'उपन्यासकेसंदर्भमें) डॉ.मृणाल शिवाजीराव गोरे	5-7
3	दलित साहित्य के प्रेरणास्त्रोत: डॉ.बाबासाहब आंबेडकर श्री. किसन भानुदास वाघमोडे	8-11
4	कोविड -१९चा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम प्रा. प्रताप बाबुराव शिद, डॉ. लहू सिताराम वावरे	12-15
5	कंत्राटी/करार शेती प्रा. गणेश गंभीरराव देशमुख	16-19
6	शेतमजुरांपुढील आव्हाने डॉ. उमेश चिंधु भोकसे	20-23
✓	कृषी किंमत धोरण प्रा. अमित धर्मा पोवार	24-29
8	WTO चे कृषी संबंधित करार व त्याचे भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम डॉ.आर.एस. वानखेडे, डॉ.अरविंद अमृत बडगुजर	30-32
9	करार शेती: एक अध्ययन राहुल मोरेश्वर लभाने	33-36
10	शाश्वत शेती काळाची गरज कु. ए. एस. बनसोडे	37-40
11	कृषी क्षेत्रातील कामगारांसमोरील आव्हाने प्रा. जयश्री मच्छिंद्र बगाटे	41-44
12	भारतीय शेतीची बदलती पीक रचना कु. सुप्रिया रविंद्र नाळे	45-47
13	अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या समस्यांचा अभ्यास करणे डॉ. एस. पी. उगले, कुशारे संगिता सुदाम	48-52
14	भारतीय कृषी अर्थव्यवस्थेवरील कोव्हीड - १९च्या परिणामाचे विश्लेषण डॉ. सुभाष तातेराव पंडित	53-56
15	भारतीय शेती क्षेत्रामध्ये सहकाराचे योगदान प्रा.डॉ. जगन्नाथ मोतीराम साळवे	57-59
16	सहकारी शेती एक वास्तव के. एस. तिडके	60-63

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Peth Vadgaon, Dist. Kolhapur.

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Refereed and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, March-2022, Volume-13 Issue-16

कृषी किंमत धोरण

प्रा. अमित धर्मा पोवार
डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, पेठ वडगाव
ई-मेल amitpowar2019@gmail.com

प्रस्तावना :

भारताची अर्थव्यवस्था कृषिप्रधान आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील कृषीवरील अवलंबित्व सध्या कमी झाले आहे. मात्र एकंदर देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी कृषी क्षेत्राचा विकास महत्त्वाचा आहे. भारतामध्ये वाढत्या लोकसंख्येला अन्नपुरवठा करण्याचे कार्य कृषी क्षेत्राकडून केले जाते. भारतीय शेती क्षेत्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी पाहिली तर भारतीय कृषी पारंपारिक व निर्वाह प्रकारची होती असे दिसते यामध्ये प्रामुख्याने खाद्य पिकांचे उत्पादन काढण्यावर भर होता. त्यामुळे अशा पीक उत्पादनाच्या किंमती रास्त आणि निश्चित असणे आवश्यक आहे. भारतातील शेतमाल खर्च आणि किंमत आयोग हा शेतमालाच्या किंमत निश्चित करण्यासाठी केंद्र शासनाने नेमलेला एक आयोग आहे. स्वतंत्र भारतातही टप्याटप्याने शेती विकासावर भर देण्यात आला. देशाचे आर्थिक धोरण उच्च विकासदरास अनुकूल राखण्याच्या प्रयत्नाचा एक भाग म्हणून शेतमालाच्या किंमती बाबतही काही विशिष्ट धोरणाचा पाठपुरावा करण्यात आला. त्यासाठी 1965 मध्ये शेतमाल किंमत आयोगाची (ॲग्रिकल्चरल प्राइसेस कमिशन-ए.पी.सी.) स्थापना करण्यात आली या आयोगाची कार्यकक्षा वेळोवेळी वाढविण्यात आली. 1985 साली याचे नामांतर "शेतमाल खर्च आणि किंमत आयोग (सी.ए.सी.पी.) असे करण्यात आले व याद्वारे कृषी किंमत धोरणामध्ये कृषी मालाच्या (पिकांच्या) किमान आधारभू किंमती (एम.एस.पी.) निश्चित केल्या जाऊ लागल्या.

1) सूचक शब्द :

ए.पी.सी., सी.ए.सी.पी., एम.एस.पी.इ.

2) उद्दिष्टे :

1) शेतमालासाठी किंमत धोरणाची आवश्यकता स्पष्ट करणे.
2) कृषी किंमत धोरणाची वाटचाल जाणून घेणे.
3) कृषी किंमत धोरणाचा अभ्यास करणे.
4) किमान आधारभूत किंमत जाणून घेणे.
5) सध्याच्या कृषी मंत्रालयामार्फत जाहीर किंमत निश्चितीचा आढावा घेणे.

3) संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधन पेपर हा मुख्यत: दुय्यम सामग्रीवर आधारित आहे. यासाठी न्यूज पेपर, विविध मासिके, पुस्तके, इंटरनेट इ. चा वापर करण्यात आला आहे.

4) कृषी किंमत धोरणाची आवश्यकता / गरज :

कृषीमाल उत्पादीत करणारा शेतकरी, उपभोग घेणारे ग्राहक, कर्ज देणारे कर्जपुरवठादार, खरेदी-विक्री विपणनातील मध्यस्थ, व्यापारी, निर्यातदार यांच्या हितांच्या रक्षणासाठी आणि अर्थव्यवस्थेच्या संतुलित विकासासाठी शेतमालाच्या किंमतीबाबत धोरणाची आवश्यकता असते. या धोरणामुळे शेतकऱ्यांना शेतीमध्ये अधिक भांडवल गुंतवणुकीची प्रेरणा मिळते. शेतमालाच्या किंमती शेतकऱ्यांच्या दृष्टीने किफायतशीर असतील, तरच शेतकरी अधिक गुंतवणूक करून शेतीत आधुनिकीकरण घडवून आण्याचा प्रयत्न करतील. त्याचप्रमाणे या किंमतीच्या माध्यमातून ग्राहकांच्या हितांची जपवणूक करणे आवश्यक ठरते. अन्यथा किंमतवाढीचे/ भाववाढीचे चक्र निर्माण होईल. त्यामुळे कृषी

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya
Peth Vadgaon,
Dist. Kolhapur.

व दुय्यम क्षेत्राच्या विकासासाठी, नागरिकांच्या कल्याणाच्या दृष्टीने योग्य स्वरूपाचे कृषी किंमत धोरण असणे आवश्यक आहे.

5) कृषी किंमत धोरणाची वाटचाल :

भारतामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळात पंजाबमध्ये डिसेंबर 1941 मध्ये गव्हाच्या किंमतीवर निर्बंध घातले, त्याची अंमलबजावणी 1942 मध्ये झाली. त्यानुसार अन्नधान्याचा व्यवसाय करण्यासाठी परवाने देणे सुरू झाले. त्याचवर्षी डिसेंबरमध्ये अन्नधान्य विभागाची निर्मिती करण्यात आली. पुढे बंगालमध्ये दुष्काळ पडला. त्यानंतरच्या काळात अन्नधान्य क्षेत्राकडे सरकारने अधिक लक्ष घालण्याची मागणी जोर धरू लागली. त्यावेळी इंग्रज सरकारने जुलै 1943 मध्ये सर थिओडोर ग्रिगोरी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. अन्नधान्यांच्या दरामध्ये होणारी चढ-उतार कमी करण्यासाठी उपाय योजना सुचविणे यासाठी प्रयत्न केले. या समितीने केलेल्या अनेक शिफारशींपैकी मुख्य अन्नधान्य घटकांवर दर निश्चितीसाठी नियंत्रण ठेवणे, अन्नधान्याच्या किंमतीनुसार त्याची माहिती संकलित करण्याच्या पध्दतीमध्ये सुधारणा करणे या महत्वाच्या शिफारशी केल्या आहेत. पुढे टी.टी. कृष्णम्माचारी यांच्या अध्यक्षतेखाली डिसेंबर 1943 मध्ये शेतमालाच्या किंमती नियंत्रित करण्यासाठी उपसमिती स्थापन केली. शेतकऱ्यांच्या उत्पादनाला हमी भाव देणे, कृषी व औद्योगिक क्षेत्रातील उत्पन्नात समानता आणणे, अन्नधान्याच्या किंमती जाहीर करणे, अन्नधान्याची किमान दर मर्यादा कमाल उत्पादनावरून ठरविणे, तसेच त्यासाठी वाहतूक खर्च, विपणन आणि इतर खर्च याचाही विचार करणे. या धोरणाची अंमलबजावणी होण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर एका संस्थेची निर्मिती करावी अशा शिफारशी केल्या होत्या.

स्वातंत्र्यानंतर पी.एन. थापर यांच्या अध्यक्षतेखाली नोव्हेंबर 1953 मध्ये कृषी उत्पादन दर चौकशी समितीची स्थापना करण्यात आली. समितीने 1954 मध्ये आपला अहवाल सादर केला. माहिती गोळा करणे आणि विस्तृत बाजारपेठेची माहिती मिळविण्यात सुधारणा करणे, कृषीदर समितीचे धोरण ठरविण्यासाठी मिळालेल्या माहितीच्या आधारे सुधारणा करणे, बाजारातील बातम्यांमध्ये सुधारणा करणे इ. शिफारशी या समितीने केल्या होत्या. त्यांचा पाठपुरावा केल्यामुळे कृषी उत्पादन दराच्या किंमती निश्चित करण्यात सुधारणा दिसून आली. पुढे 1954 मध्ये एम.व्ही. कृष्णप्पा यांच्या अध्यक्षतेखाली कृषी उत्पादन चढ-उतार देखरेख समितीची स्थापना करण्यात आली होती. अन्नधान्याच्या किंमती वाढीची कारणे शोधून ती कमी करण्यासाठी 1957 मध्ये अशोक मेहता समितीची स्थापना करण्यात आली. त्यानंतर 1964 मध्ये एल. के. झा यांच्या अध्यक्षतेखाली अन्नधान्य किंमत निश्चिती समिती नेमण्यात आली. जानेवारी 1965 मध्ये भारत सरकारने एम. एल. दंतवाला यांच्या अध्यक्षतेखाली कृषी मूल्य आयोगाची स्थापना केली. सुरूवातीला या आयोगाचा कार्यकाल तीन वर्षाचा होता, परंतु किंमत धोरणातील या आयोगाचे महत्व लक्षात घेता यास कायम स्वरूप देण्यात आले. कृषी मूल्य आयोगाचे 1985 मध्ये 'कृषी खर्च व मूल्य आयोग' असे नामकरण करण्यात आले. कृषी मालाची योग्य किंमत ठरवून सरकारला देशाची आर्थिक स्थिती नियंत्रणात ठेवण्यास मदत करणे, तसेच उत्पादक आणि ग्राहकांच्या हिताचे रक्षण करणे हा या आयोगाचा मुख्य उद्देश आहे. त्याचबरोबर किमान आधार किंमत निश्चित करणे, किंमतीतील चढ-उतारावर नियंत्रण ठेवणे, कृषी उत्पादनांच्या प्रचलीत विपणन पध्दतीतील विपणन खर्च आणि मध्यस्थांच्या नफ्याचा अभ्यास करणे, बी-बियाणे, खते व किटकनाशके इ. मध्ये काही अडचणी येत असतील किंवा साधनांची अनउपलब्धता किंवा त्यांच्या किंमती अधिक असल्यास तसेच कृषीविषयक इतर समस्या सोडविण्यासाठी सरकारला आवश्यक त्या सुचना करणे, सरकारने जाहीर केलेल्या कृषी किंमत धोरणाचा अभ्यास करून त्यासंदर्भात सरकारला सल्ला देण्याचे कार्य हा आयोग करतो. सध्या 25 पिकांच्या बाबतीत केंद्र सरकार किमान आधारभूत किंमती निश्चित करत असते. या किंमती निश्चित करताना शेतकरी व ग्राहक, देशातील कारखान्यांची गरज लक्षात घेतली जाते. अनेक रोख पिकांच्या (ऊस, तेलबिया, कापूस, ताग इ.) किंमती निश्चित केल्या जातात. मळ्याच्या शेतीमध्ये उत्पादित होणाऱ्या शेतमालाच्या किंमती (कॉफी, रबर इ.) आंतरराष्ट्रीय किंमत पातळी समोर ठेवून निश्चित केल्या जातात.

6) कृषी किंमत धोरण (Agricultural Price Policy) :

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, Tal. Vadgaon, Dist. Kolhapur

कृषीमालास योग्य भाव मिळाल्यास शेतकऱ्यांना जास्त उत्पन्न मिळुन त्यांची आर्थिक स्थिती सुधारते. त्याचबरोबर योग्य किंमतीमुळे शेती उत्पादन वाढीस चालना मिळते. शेतमालाच्या किंमती स्थिर राहिल्यास शेतीचा विकास होण्यास मदत होते. त्या किंमती स्थिर रहाव्यात यासाठी देशात शेतमालविषयक किंमत धोरणाची आवश्यकता आहे. शेतमाल किंमत धोरणाची शेती विकासात महत्वाची भूमिका आहे. त्यामुळे किंमतीमधील चढ-उतारावर नियंत्रण ठेवता येते.

अ) कृषीमालविषयक किंमत धोरणाची उद्दिष्टे :

शेतमाल विषयक धोरणाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

1. आदानाच्या किंमती विगर आदानांच्या किंमती यामध्ये योग्य समन्वय राखणे तसेच शेती वस्तू व औद्योगिक वस्तू यामधील व्यापारशर्तीत समन्वय राखणे. या दोन्हीही क्षेत्रातील किंमतीत तीव्र स्वरूपाचे बदल न होऊ देणे.
2. विविध पिकांच्या किंमतीमध्ये योग्य संबंध राखणे की जेणेकरुन विविध पिकांच्या वाढत्या मागणीची गरजपूर्ण करता येईल.
3. शेतमालातील मर्यादित किंमत उच्चवचनाद्वारे शेतकऱ्यांच्या व ग्राहकांच्या आर्थिक लाभात योग्य समन्वय साधणे.
4. किंमत वाढीतील चक्रीय उच्चवचने कमी करणे व शेतमाल किंमतीतील हंगामी उच्चवचने किमान करणे.
5. देशातील विविध प्रदेशातील शेतमालाच्या किंमतीत समानता राखणे.
6. आर्थिक विकासासाठी होणाऱ्या वाढीव सार्वजनिक खर्चामुळे होणारी सर्वसाधारण किंमतवाढ स्थिर ठेवणे.
7. शेतकऱ्यांना, शेतमाल उत्पादनासाठी लागणाऱ्या शेती आदानाच्या किंमती व शेतमालाच्या विक्री किंमती यांच्यात योग्य समन्वय ठेवणे.
8. देशातील लोकांचा समतोल आहार व उद्योगासाठी असणारी कच्चा मालाची गरज पूर्ण करण्यासाठी विविध वस्तूंच्या उत्पादनात वाढ करणे.
9. ग्राहकांची उपभोग्य वस्तू स्वस्त दरात खरेदी करण्याची आवड योग्य किंमत निश्चित करून टिकवून ठेवणे.

ब) कृषीविषयक किंमत धोरणाची साधने :

भारत सरकारने अवलंबिलेल्या कृषीमाल विषयक किंमत धोरणामध्ये अनेक उपायांचा अवलंब केलेला आहे. मालाच्या किंमती योग्य आणि स्थिर ठेवण्याच्या दृष्टीकोनातून भारत सरकारने खालील साधनांचा वापर केलेला आहे.

1. **किमान आधारभूत किंमत :**

शेतकऱ्यांनी उत्पादीत केलेल्या शेतमालाच्या किंमतीची सरकारकडून दीर्घकालीन हमी मिळणे यास किमान आधारभूत किंमत म्हणतात. या किंमतीनुसार दिर्घकाळात शेतमालाच्या किंमती स्थिर राहतील. अशी सरकारकडून शेतकऱ्यांना हमी मिळत असते. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पीक उत्पादनासाठी विश्वास निर्माण होतो. किमान आधारभूत किंमत ही शेतमाल उत्पादन खर्चावर आधारीत असतात.

2. **सरकारी खरेदी किंमत :**

भारत सरकार ज्या किंमतीस धान्याची खरेदी करत असते, अशा किंमतीना सरकारी खरेदी किंमत म्हणतात. सामान्यपणे अशा किमती किमान आधारभूत किमतीपेक्षा जास्त व बाजारातील किंमतीपेक्षा कमी असतात. सरकारी खरेदी किंमतीमुळे शेतकऱ्यांना उत्पादन वाढीस प्रेरणा मिळते. शेतीविकास होण्यास मदत होते.

3. **कायदेशीर किमान आधारभूत किंमत :**

देशाचे सरकार काही ठिकाणाच्या किंमतीस कायदेशीर दर्जा देत असते किंवा ज्या पिकांच्या किंमती सरकार कायद्यानुसार ठरवत असते, अशा किंमतींना कायदेशीर किमान आधारभूत किंमत असे म्हणतात. सरकारने ठरविलेल्या कायदेशीर किमान आधारभूत किंमतीपेक्षा कमी किंमतीला संबंधित पिकांची खरेदी केल्यास अशा प्रकारचे कृत्य

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya
Peth Vadgaon, Dist. Kolhapur.

बेकायदेशीर मानले जाते. त्यामुळेच साखर कारखान्यांना ऊसाचा दर किमान आधारभूत किंमतीपेक्षा कमी देता येत नाही. तेलबियांच्या किंमतीसुध्दा याच पध्दतीने निश्चित केलेल्या आहेत.

4. सार्वजनिक वितरण प्रणाली :सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे सरकार समाजातील लोकांना अन्नधान्याची स्वस्त किंमतीत विक्री करते. सरकारी खरेदी किंमतीपेक्षा स्वस्त धान्य दुकानातील किंमती कमी असतात. यामुळे अर्थव्यवस्थेतील किंमत पातळी स्थिर राखण्यास मदत होते. सरकारच्या किंमत धोरणाचे सार्वजनिक वितरण प्रणाली हे महत्वाचे साधन आहे.

5. सरकारी साठा :

शेतमालाच्या किंमती स्थिर राखण्यासाठी देशाच्या सरकारकडून करण्यात येणारा धान्याचा साठा म्हणजेच सरकारी किंवा शिल्लकी साठा होय. भारतीय अन्न महामंडळ व नाफेड या दोन संस्था आवश्यक अन्न धान्याचा साठा करत असतात. त्या साठ्याचा वापर उत्पादनाची टंचाई निर्माण झाल्यावर केला जातो.

6. पतविषयक सुविधा :

भारतीय शेतकऱ्यांना कमी व्याजदराने कर्जपुरवठा करण्यासाठी सरकारने अनेक प्रयत्न केलेले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या मालाचा साठा करता येतो. ज्योवळी चांगल्या किंमती असतील त्यावेळी त्या मालाची विक्री करता येते. परिणामत: कृषीमालाच्या किंमतीमध्ये स्थैर्य टिकुन राहते.

7) किमान आधारभूत किंमतीचे धोरण :

सध्याच्या कृषी किंमत धोरणामध्ये प्रामुख्याने किमान आधारभूत किंमत (एम.एस.पी.) या संकल्पनेचा वापर करून शेतमालाच्या किंमती निश्चित केल्या जातात. किमान आधारभूत किंमत (एम.एस.पी.) म्हणजे ज्या किमान किंमतीस शासन शेतकऱ्यांकडून अन्नधान्य खरेदी करण्यास बाध्य असते, ती किंमत होय. त्या अन्नधान्य पिकांचा बाजारभाव काहीही असला तरीही शासनास या किंमतीस अन्नधान्य खरेदी करावे लागते. अशा किंमती शासन संबंधित पिकांच्या पेरणीपूर्वीच जाहीर करते.

अ) किमान आधारभूत किंमत धोरणाची उद्दिष्टे :

1) शेतमाल उत्पादकाचे रक्षण करणे.
2) विविध पिकांचे उत्पादन करण्यासाठी प्रोत्साहन देणे.
3) शेती उत्पादनात वाढ घडवून आणणे.
4) शेतकऱ्यांच्या मालाला बाजारात आणण्यासाठी प्रोत्साहन देणे.
5) किंमतीतील अतिरिक्त वाढीविरूध्द उपभोक्त्यांचे संरक्षण करणे.

ब) किमान आधारभूत किंमत धोरणाची कार्ये :

1) शेतकऱ्यांना शेतमालासाठी किमान किमतीची शाश्वती देणे.
2) शेतमालाच्या किंमतीत चढ-उतार होऊ न देणे.
3) शेतीतील उत्पादनावर नियंत्रण ठेवणे.
4) शेतकऱ्यांच्या उत्पादनात स्थिरता निर्माण करणे.
5) उत्पादन वाढीला प्रोत्साहन देण्यासाठी सहाय्य करणे.
6) पिकाखालील क्षेत्रातील मोठे बदल टाळणे.

देशातील कृषीमालाच्या किंमती निर्धारीत करण्यासाठी सन 1965 मध्ये 'कृषी मूल्य आयोगाची' (ए.पी.सी.) स्थापना करण्यात आली होती. पुढे मार्च 1985 पासून या आयोगाचे नामकरण 'कृषी मूल्य व किंमत आयोग' असे करण्यात आले. किमान आधारभूत किंमती (एम.एस.पी.) या 'कृषी मूल्य व किंमत आयोगा' (सी.ए.सी.पी.) मार्फत तयार केल्या जातात व भारत सरकारच्या कृषी मंत्रालयामार्फत जाहीर केल्या जातात.

सध्या कृषी मंत्रालयामार्फत एकूण 25 पिकांच्या किमान आधारभूत किंमती (एम.एस.पी.) जाहीर केल्या जातात.

अ) खरीप हंगामातील पीके :

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, Peth Vadgaon, Dist. Kolhapur.

अ. क्र.	पीक	प्रजाती	वर्ष 2020-21 (प्रति क्विंटल रू.)	वर्ष 2021-22 (प्रति क्विंटल रू.)	मागील वर्षाशी तुलना करता किंमतीतील बदल (प्रति क्विंटल रू.)
1.	तांदुळ	सामान्य	1868	1940	+72
		अ-ग्रेणी	1888	1960	+72
2.	ज्वारी	हायब्रीड	2620	2738	+118
		मालदांडी	2640	2758	+118
3.	बाजरी		2150	2250	+100
4.	मका		1850	1870	+20
5.	तुर		6000	6300	+300
6.	मुग		7196	7275	+79
7.	उडीद		6000	6300	+300
8.	कापूस	मध्यम धागा	5515	5726	+211
		लांब धागा	5825	6025	+200
9.	भुईमूग		5275	5550	+275
10.	सुर्यफुल		5885	6015	+130
11.	सोयाबीन	काळया व पिवळ्या	3880	3950	+70
12.	तीळ		6855	7307	+452
13.	कारले		6695	6930	+235
14.	नाचणी		3295	3377	+82

Link:https://play.google.com/store/apps/details?id=com.google.android.apps.books&e=-EnableAppDetailsPageRedesign

Google Play Books is the one app that you need for enjoying audio books and ebooks purchased from Google Play.

Choose from millions of best selling ebooks, comics, textbooks and audio books. Download your book to read or listen. When you've finished, find your next favourite from recommendations personalized just for you. Audiobooks and ebooks as you go – with no subscriptiorequired

Google Books :

Website : https://books.google.co.in/bkshp?hl=en&tab=rp

Google Books (previously known as Google Book Search and Google Print and by its codename Project Ocean) is a service from Google Inc. that searches the full text of books and magazines that Google has scanned, converted to text using Optical Character Recognition (OCR) and stored in its digital database. Books are provided either by publishers and authors through the Google Books Partner Program or by Google's library partners through the Library Project. Additionally Google has partnered with a number of magazine publishers to digitize their archives.

Jstor :

Website : https://www.jstor.org/

JSTOR provides access to more than 12 million academic journal articles, books, and primary sources in 75 disciplines.

It helps to explore a wide range of scholarly content through a powerful research and teaching platform. JSTOR collaborate with the academic community to help libraries connect students and faculty to vital content while lowering costs and increasing shelf space, provide independent researchers with free and low-cost access to scholarship and help publishers reach new audiences and preserve their content for future generations.

JSTOR is part of ITHAKA, a not-for-profit organization that also includes Artstor, Ithaka S+R, and Portico.

E-Shodhsindhu :

Website : http://nlist.inflibnet.ac.in/members.php

Based on the recommendation of an Expert Committee, the MHRD has formed e-ShodhSindhu merging three consortia initiatives, namely UGC-INFONET Digital Library Consortium, NLIST and INDEST-AICTE Consortium.The e-ShodhSindhu will continue to provide current as well as archival access to more than 15,000 core and peer-reviewed journals and a number of bibliographic, citation and factual databases in different disciplines from a large number of publishers and aggregators to its member institutions including centrally-funded technical institutions, universities and colleges that are covered under 12(B) and 2(f) Sections of the UGC Act.

Shodhganga :

Website : http://shodhganga.inflibnet.ac.in

Shodhganga is an Open Access Repository of full-text theses submitted to universities in India. Membership is not required to browse, view, search and download theses available in Shodhganga. However, INFLIBNET signs MoUs with universities so as to facilitate submission of electronic version of theses into Shodhganga and synopses/approved research proposals into Shodhgangotri. The eligible universities that signs MoUs with INFLIBNET Centre on Shodhganga are provided access to anti-plagiarism software. Colleges are not eligible for this benefit.

"Shodhganga" is the name coined to denote digital repository of Indian Electronic Theses and Dissertations set-up by the INFLIBNET Centre. The word "Shodh" originates from Sanskrit and stands for research and discovery. The "Ganga" is the holiest, largest and longest of all rivers in Indian subcontinent. The Ganga is the symbol of India's age-long culture and civilization, everchanging, ever-flowing, ever-loved and revered by its people and has held India's heart captive and drawn uncounted millions to her banks since the dawn of history. Shodhganga stands for the reservoir of Indian intellectual output stored in a repository hosted and maintained by the INFLIBNET Centre.

Conclusion :

With decreasing library budget, the judicial use of money to satisfy the need of maximum users is the need for the time. With availability of ICT and internet technology, library consortia are one of the ways to tackle this problem. It benefits the libraries to procure more electronic resources in the library with limited budget and increasing demands of the library users. Collective and logical negotiation with the publishers to get the maximum resources at the minimum price is a way by which librarians can optimise the use of resources. There are various issues involved with consortia, but these issues can be tackled by adopting right approach and following the right procedures with the coordinated approach of the members of the consortia. In a developing country like India, a major portion of education and research are funded by the Government, national consortium is the practical solution, making one payment and adjustments while allocating their individual budgets may be the worthwhile solution. It may be a cost-effective mechanism, if worked out.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University

Acknowledgment :

The author is thankful to various contributors, whose research work; articles are freely used and cited. Since this paper is based on various sources/languages, any error in scientific names or spelling is regretted. Suggestions for corrections are welcome.

References :

1) A.S. Chandel and Mukesh Saikia,"Challenges and opportunities of e-resources", Annals of Library and Information Studies 59(2012):148-154.
2) Albitz, Becky (2014). Successfully negotiating an agreement, in Licensing and Managing Electronic Resources. Oxford, England: Chandos Pub., pp. 83-119
3) Brown, Abbie (2014). Negotiation of e-resources licensing and pricing terms, in ALCTS Webinar Association for Library Collection and Technial Services ALA http://www.ala.org/alcts/confevents/upcoming/webinar/050714
4) Carrell, M. R., & Heavrin, C. (2008). Negotiating essentials: theory, skills, and practices. Upper Saddle River, NJ: Pearson/Prentice Hall.
5) CDL Model License Agreement (2011). Standard license agreement: publisher and the regents of the University of California. California Digital Library available at www.cdlib.org/gateways/vendors/docs/Model_License_LATEST_Revised_10-09.docx
6) Fisher, R., Ertel, D., & Fisher, R. (1995). Getting ready to negotiate: the Getting to yes workbook. New York: Penguin Books.
7) Jagdish Arora and Kruti Trivedi,"INDEST-AICTE Consortium: present services and future endeavours", DESIDOC Journal of Library and Information Technology 30, no. 2(2010):79-91.
8) Kruti Trivedi et.al., Economics of UGC-INFONET digital library consortium. In Library and Information Science in Digital Age: Essays in honour of Prof M.P. Satija, Vol.1 (2009), 356-69.
9) S.J.D. Varaprasad and S. Madhusudhan ," E-journal Consortium: Is it a Success Story Always?" (2014). Accessed May 20, 2021, www.publications.drdo.gov.in/ojs/index.php/djlit/article/download/10/545.
10) Dr. Neeraj Chaurasia,"E-Resources and Consortia Management" (2021). Accessed May 20, 2021, https://onlinecourses.swayam2.ac.in/arp20_ap28/unit?unit=20&lesson=24



शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर
विद्वत्प्रमाणित, यु.जी.सी. मान्यताप्राप्त त्रैमासिक
(Peer Reviewed Referred Research Journal)
ISSN No. 2319-6025

शिविम संशोधन पत्रिका

वर्ष-दहावे : अंक अठ्ठाविसावा । ऑक्टोबर ते डिसेंबर २०२१



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya
Peth Vadgaon, Dist. Kolhapur.

अंतरंग

संपादकीय ३
भालचंद्र नेमाडे यांच्या कादंबऱ्यांतील
मुस्लीम समाजजीवन /डॉ. राजेखान शानेदिवाण ५
लिखित भाषेचा कट्टा / डॉ. अनंता मच्छिंद्र कस्तुरे २४
प्रधानांच्या लेखणीतून आविष्कृत व्यक्तिवेध / नीला जोशी ३०
संत तुकारामांची सामाजिक समता / डॉ. प्राजक्ता प्रल्हादराव निकम ३६
मराठी दलित कविता: बदलते संदर्भ / डॉ.सर्जेराव पद्माकर ४२
लोकप्रिय साहित्यातील रंजनपरता / स्वाती प्रभाकर मगदूम ५५
पारंपरिक लावणीचे स्वरूप जपणारी
उत्पातांची लावणी / डॉ. दत्तात्रय महादेव डांगे ६०
साहित्यकृतींचे माध्यमांतर / डॉ.तातोबा बदामे ६८

मराठी दलित कविता: बदलते संदर्भ

डॉ. सर्जेराव पद्माकर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,
पेठ वडगाव, जि. कोल्हापूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या संपूर्ण हयातीमध्ये महाराष्ट्रात जे सर्वंकष बंड आणि वैचारिक आंदोलन दलित समाजात उभे केले, त्यातूनच दलित साहित्याचा जन्म झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९३५ मध्ये दिलेली धर्मांतराची हाक आणि १९५६ साली त्यांनी बौद्ध धम्मात केलेला प्रवेश यातून दलित वर्गाच्या जाणिवा आपोआपच बदलत गेल्या. या कालखंडात सुशिक्षित तरुणांची नवी पिढी उदयाला आली. तिचा पांढरपेशा वर्गाशी जाणिवेच्या पातळीवर अटळ संघर्ष सुरू झाला. समाजाची जडणघडण, जातिव्यवस्था, त्यातील अस्पृश्यतेची भीषणता, तिचे दारुण स्वरूप, उदयाला येणारा नवा सत्ताधीश वर्ग व त्याच्याकडून खेड्यापाड्यांत दलितांवर होणारे अत्याचार इत्यादींचे दर्शन या पिढीतील लेखकाला घडले. यापूर्वीच्या साहित्यातील दलितांचे चित्रण हे खूपच विकृत, भाबडे, सहानुभूतीपूर्ण अथवा स्वप्नरंजनात्मक अशा स्वरूपाचे होते. वर्तमानाशी व भूतकाळाशी दलित लेखकांचा असलेला संबंध इतर लेखकांहून भिन्न आहे. त्यामुळे दलित लेखकांचे आकलन, त्यांना गवसणारा जीवनाचा गर्भितार्थ व त्यांचे दुःखही भिन्न अशा स्वरूपाचे आहे. दलित साहित्य म्हणजे केवळ आर्थिक वा सामाजिक लढा नाही, तर तो सांस्कृतिक नीतिमूल्यांचा लढा आहे. साधारणतः १९५६ सालापासून मराठी साहित्यविश्वामध्ये 'दलित साहित्य' हा शब्दप्रयोग आढळत नसला, तरी अस्पृश्यतेची स्पष्ट जाणीव तेराव्या शतकात संत चोखामेळा यांच्या 'विटाळाच्या अंभगा'च्या माध्यमातून स्पष्टपणे समाजासमोर येताना दिसते. परंतु ही जाणीव सामाजिकतेच्या संदर्भात विद्रोह पुकारणारी नव्हती. त्यानंतर विद्रोहाचे सूर प्रामुख्याने गोपाळबाबा वलंगकर आणि पंडित कोंडिराम (१८९०) यांच्या लेखनात सापडतात. पुढे किसन फागुजी बनसोडे आणि शिवराम जानबा कांबळे (१९०१) यांनी जातीव्यवस्थेवरती घणाघाती प्रहार केलेले पाहावयास मिळतात. साधारणतः १९५४ पासून १९६७ पर्यंत दलित साहित्याच्या चळवळीला चालना मिळू शकली नाही. प्रारंभीच्या काळात अण्णा भाऊ साठे, शंकरराव खरात, बंधुमाधव यांसारख्या लेखकांचा अपवाद वगळता दलित साहित्याला फारसे चळवळीचे स्वरूप प्राप्त होऊ शकले नव्हते. १९६७ सालानंतर मात्र दलित लेखकांच्या वेगवेगळ्या जाणिवा ठसठशीतपणे व्यक्त होऊ लागल्याचे दिसून येते.

ISSN No. 2319-6025

दलित साहित्यप्रवाहाची फार मोठी जागा कवितेने व्यापलेली आहे. वास्तविक पाहता आत्मनिष्ठ जाणिवांना कविता हा वाङ्मयप्रकार अधिक जवळचा वाटतो. त्यामुळे कदाचित अशा प्रकारची मानसिकता निर्माण झाली असावी, असे वाटते. गेल्या चार दशकाचा विचार करता दलित साहित्यात लक्षणीय स्वरूपामध्ये काव्यलेखन करणारे असंख्य कवी दिसून येतात. यापैकी नामदेव ढसाळ, यशवंत मनोहर, केशव मेश्राम यासारखे कवी यादृष्टीने महत्त्वाचे ठरतात. पुरुषप्रधान संस्कृतीत दलित स्त्री ही पुरुषांपेक्षा अधिक प्रमाणात दबलेली होती. दलित स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम काही मोजक्याच कवयित्रींनी केलेले आहे. यामध्ये प्रामुख्यानें हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार, प्रज्ञा लोखंडे यांचा उल्लेख करावा लागेल. लोकजीवनातील म्हणी, प्रतिमा, लोकभाषा, नवी मिथकं यांचा उपयोग वर्तमान दलित कवितेने केल्याने या कवितेमध्ये तिचे वेगळेपण उठून दिसते. वामनदादा कर्डक यांच्यापासून सुरू झालेली दलित कवितेची निर्मिती केशव मेश्राम, नामदेव ढसाळ, दया पवार, प्रल्हाद चेंदवणकर, त्र्यंबक सपकाळे, लोकनाथ यशवंत, हिरा बनसोडे, शरणकुमार लिंबाळे, वाहरू सोनवणे, यशवंत मनोहर, भुजंग मेश्राम ते आधुनिक काळामध्ये लिहीत असलेल्या असंख्य नवोदित दलित कवी यांच्यापर्यंत अखंडपणे सुरु असलेली पाहावयास मिळते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये प्रामुख्याने १९९० नंतरच्या दलित कवितेचा आणि तिच्या बदलत्या संदर्भाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

दलित शाहीर, कवी, लेखक आणि विचारवंतांची पूर्वपरंपरा

दलित साहित्य या वाङ्मयप्रवाहाचा विचार करता एकोणिसाव्या शतकापासून आजतागायत त्याचे चार विभाग पाडता येतील. यामध्ये साधारणतः १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात १८७९ पासून पुढे जोतिराव फुले, गोपाळबाबा वलंगकर, किसन फागुजी बनसोडे, शिवराम जानबा कांबळे, गणेश आक्काजी गवई, भाऊ फक्कड, रामचंद्र हरी बनसोडे, उद्धव रामटोके आणि बळीराम बुवाजी कदम यांच्यासारखे समाजसुधारक, लेखक, कवी, शाहीर व जलसाकार दिसतात. कवितेला समृद्ध करण्यामध्ये लोककलावंतांची भूमिकादेखील तितकीच महत्त्वाची आहे. कारण उमा-बापू, शिवा-संभा कवलापूरकर, तात्या-बाबू, अर्जुन वाघोलीकर, सातू-हिरु, सातू-सुबराव, रावू मांग यांसारख्या तमाशा कलावंतांनीदेखील कविता मनापासून जपलेली पाहावयास मिळेल.

१९३० नंतर महात्मा गांधींचा यापूर्वीच राजकारणामध्ये प्रवेश झाला होता. साधारणतः १९३० नंतरच्या कालखंडामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांच्या व्यथा, वेदना जवळून अनुभवलेल्या होत्या. त्यामुळे त्यांच्या कार्याचा गौरव करून समाजास जागृत करण्याच्या हेतूने आंबेडकरी जलसाकार आणि आंबेडकरी जाणिवेचे कवी व शाहीर यांचा उदय झालेला पाहावयास मिळतो. यामध्ये भीमराव कर्डक,

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Peth Vadgaon, Dist. Kolhapur

ISSN No. 2319-6025

पांडुरंग गावंद पवार, दिनकर भामाजा भांसले, रामचंद्र नामदेव सोनवणे, केरुजी घेगडे, केरुबुवा गायकवाड, अर्जुन हरी भालेराव, केशव सुका आहेर, कवी शेख, कवी धोंडिराम निकम, चांगदेव खैरमोडे, कोंडदेव श्रीराम खोलवडीकर, आप्पा रणपिसे, पतितपावनदास, अमृतबुवा बावस्कर यांसारख्या शाहिरांचा समावेश होतो.

दलित कवितेच्या प्रांतामध्ये साधारणतः १९४५ नंतरच्या काळामध्ये आंबेडकरी कलावंतांच्या कवितेला प्रारंभ झालेला पाहावयास मिळतो. या काळामध्ये प्राधान्याने जलसाकारांची दुसरी पिढी, आंबेडकरी बाण्याचे शाहीर आणि गायकांचा समावेश करण्यात येईल. कलापथके, गायनपार्ट्या, भजनीमंडळे, कव्वालीपार्ट्यांचा हा काळ होता, त्यामुळे स्वाभाविकपणेच वेगवेगळ्या वाङ्मयप्रकाराच्या माध्यमातून या कालखंडामध्ये प्रबोधनाचे कार्य सुरू होते. यामध्ये काही मोजक्याच कलावंतांचा उल्लेख करावयाचा झाल्यास रावजी सावळाराम गडकरी, भीमराव हणमंत भोसले, विठ्ठल उमप, प्रभाकर गवई, प्रल्हाद शिंदे, भाऊ-बापू मांग, यासोबतच कथाकार, कादंबरीकार आणि नाटककारांची पिढी यामध्ये समाविष्ट होते. बंधु माधव, मोरेश्वर तांबे, म. भि. चिटणीस, म. ना. वानखेडे, शंकरराव खरात, बाबुराव बागूल, अण्णा भाऊ साठे इत्यादी कवींचादेखील या परंपरेमध्ये समावेश करता येईल. दलित साहित्याच्या या विकासप्रवाहाचा संदर्भ घेताना डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात-''दलित साहित्य म्हणजे मुक्तिगीत/दलित साहित्य म्हणजे आत्मशोध/दलित साहित्य म्हणजे नाकारलेल्या जीवनाचे दर्शन/दलित साहित्य म्हणजे मूल्यगर्भ जाणिवांचा नवा अविष्कार.''[१]

दलित साहित्याला समृद्ध करण्यामध्ये कवींच्याबरोबरच लेखक, विचारवंतांचीदेखील तितकीच महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे पाहावयास मिळेल. साधारणतः १९६० नंतरच्या कालखंडाचा विचार करता यामध्ये असंख्य कवी, लेखक, संशोधक, विचारवंत, कथाकार, आत्मकथनकार आणि नाटककार यांनी दलित साहित्याच्या निर्मितीसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिल्याचे पाहावयास मिळते. 'दलित चळवळ आणि साहित्य' या ग्रंथामध्ये ही यादी पुढीलप्रमाणे दिली आहे, ''डॉ. गंगाधर पानतावणे, केशव मेश्राम, यशवंत मनोहर, नामदेव ढसाळ, वामन निंबाळकर, प्रकाश त्रिभुवन, दया पवार, भि. शि. शिंदे, दत्ता भगत, प्रेमानंद गज्वी, भालचंद्र फडके, रावसाहेब कसबे, डॉ. जनार्दन वाघमारे, विलास वाघ, रामनाथ चव्हाण, लक्ष्मणे माने, लक्ष्मण गायकवाड, माधव कोंडविलकर, शरणकुमार लिंबाळे, धर्मराज निमसरकर, डॉ. कृष्णा किरवले, अर्जुन डांगळे, प्रल्हाद चेंदवणकर, त्र्यंबक सपकाळे, रतनलाल सोनग्रा, सुखदेव ढाणके, ज. वि. पवार, अविनाश डोळस, भुजंग मेश्राम, वाहरू सोनवणे, नजुबाई गावीत, प्र. ई. सोनकांबळे, वसंत मून, कुमुद पावडे, ज्योती लांजेवार, हिरा बनसोडे, प्रज्ञा लोखंडे, मल्लिका अमर शेख, मा. रा. लामखडे,

ISSN No. 2319-6025

मोतीराम कांबळे, मनोहर जाधव, बळवंत कांबळे, भगवान ठाकूर प्रमोद वाळके, भगवान भोईर, लोकनाथ यशवंत, ऋषिकेश कांबळे, डी. बी. जगत्पुरिया, महेंद्र गायकवाड यासारखे लेखक, विचारंत, नाटककार, आत्मकथनकार आणि कवी यांनी दलित साहित्याला समृद्ध केल्याचे दिसून येईल. यापैकी १९९० नंतरच्या दलित कवितेतील बदलत्या संदर्भांचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

१९९० नंतरच्या दलित कवितेतील बदलते संदर्भ

भारतीय समाजजीवनामध्ये विशेषकरून उपेक्षित लोकांच्या मनामध्ये आपण इतर लोकांच्यासारखे नाही आहोत, ही भावना अधिक प्रबळ होती. कारण पारंपरिक समाजव्यवस्थेमुळे याबरोबरच वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था आणि जन्मजात व्यवसाय यामुळे दलित माणसाला आत्मभानच राहिलेले नव्हते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले यांच्यामुळे हे आत्मभान दलित माणसाला प्राप्त झाले. ह्याच आत्मशोधातून स्वातंत्र्य, समता, बंधुता व नकार न्याय आणि ह्या मूल्यांचा आग्रह कवितेच्या माध्यमातून १९९० नंतरच्या काही प्रमुख कवींनी घेतलेला दिसून येतो. रा. ग. जाधव याविषयी म्हणतात,''दलितांच्या माणुसकीची, माणूस म्हणून असणाऱ्या, त्याचे मूलभूत हक्कांची अभ्युदयाच्या त्यांच्या आकांक्षाची त्यासाठी द्यावयाच्या लढ्याची आणि आत्मोद्धाराच्या सामर्थ्याची युगप्रवर्तक जाणीव डॉ. आंबेडकरांनीच चेतवली. प्रेतवत दलित जिन्यात चैतन्याचे दीप उजळविले. दलितांच्या जन्मसिद्ध स्वातंत्र्याची संपन्न भवितव्याची युगप्रवर्तक चेतना त्यांनी दिली. या चेतनेत दलित कवी मनाची काव्यातून रूपास आणले/जाणले हे निर्विवाद खरे आहे.''[२] दलित माणूस हा पूर्वीपासूनच कष्टप्रद जीवन असतानाही प्रामाणिकपणे जगताना दिसून येतो. त्यामुळेच सगळा गाव उजेडामध्ये न्हाऊन निघाला असताना स्वतःची झोपडी मात्र अंधारामध्ये गढून गेलेली असायची. अशावेळी त्रागा न करता आपली याविषयीची प्रतिक्रिया तो संयतपणे मांडतो. ही प्रतिक्रिया शरणकुमार लिंबाळे यांच्या पुढील कवितेच्या माध्यमातून उमटताना दिसते,

''बा तू त्यांच्या वाटेवर दिवे लावलेस
पण त्यांनी तुझी वाट अंधारीच ठेवली रे'' (येसू, पृ. २८)

या माध्यमातून नवपिढीचा प्रस्थापित समाज व्यवस्थेविरुद्धचा विद्रोह उफाळून येताना दिसून येतो. वास्तविक पाहता कुटुंबाचं दारिद्र्य आणि ह्या दारिद्र्यातही स्वतःच्या सामर्थ्यावर बाबासाहेबांसारखे मोठे व्हावे असे संस्कार करणारी माय, बाप, बंधू-भगिनी दलित साहित्यामध्ये आणि विशेषतः १९९० नंतरच्या दलित कवितेमध्ये पाहावयास मिळतात.

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Peth Vadgaon, Dist. Kolhapur.

ISSN No. 2319-6025

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर दलित तरुणांमध्ये आत्मभान निर्माण झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारकार्यापासून प्रेरणा घेऊन सजग झालेला हा तरुण आत्मशोध घेऊ लागला. म्हणजेच पारंपरिक ग्रामसंस्कृती आणि आपला उपेक्षित समाज यातलं अंतर त्यांना प्रकर्षाने जाणवू लागले. हीच जीवघेणी वेदना उत्तम बावस्कर यांनी 'विद्रोह' या कवितेच्या माध्यमातून पुढीलप्रमाणे व्यक्त केली आहे,

''त्यांच्या' वराती
या वेशीतून थाटानं जातात
आमची प्रेतंही तिथून नेता येत नाहीत!'' (विद्रोह, पृ.२३)

या माध्यमातून पारंपरिक समाजव्यवस्था आणि यामध्ये अस्पृश्यांवरती होणारे अन्याय परिणामकारकपणे अभिव्यक्त केले आहेत. जी भूमी आमची आहे, जे गाव आमचे आहे त्या गावामध्ये आम्ही स्वतंत्रपणे कोणत्याही घटकाचा उपभोग घेऊ शकत नाही. याविषयीची खंत कवी आपल्या कवितेच्या माध्यमातून व्यक्त करताना दिसतो. सततचा हा कोंडमारा असह्य झाल्यामुळेच नामदेव ढसाळ यांच्यासारखा कवी आपल्या 'गोलपिठा' कवितेच्या माध्यमातून पुढील शब्दात खडा सवाल करतो,

''स्वातंत्र्य कुठल्या गाढवीचं नाव आहे?
रामराज्याच्या कितव्या घरात आपण न्हातोत?'' (गोलपिठा पृ. ३१)

थोडक्यात स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळातदेखील दलितांच्यावरती अन्याय, अत्याचार हे होतच आहेत. याविषयीची प्रतिक्रिया म्हणून आपणास उपरोक्त कवितेकडे पाहावे लागेल. कारण स्वातंत्र्यानंतरदेखील महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह, नाशिकच्या काळाराम मंदिराचा सत्याग्रह यासारखे करावेच लागले आहेत हे सर्वांना ज्ञात आहे.

भारतामध्ये अस्पृश्यांना आपले हक्क मिळविण्यासाठी बरीच आंदोलने करावी लागली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काही प्रमाणात हक्क मिळाले; परंतु परिस्थिती मात्र जैसे थे राहिली. समाजामध्ये मात्र आरक्षणाविषयीची ओरड सुरू झाली. कारण प्रस्थापित समाजास ही बाब रूचली नाही. यावरून असे म्हणता येईल की, 'अस्पृश्यांना स्वतःचे हक्क मिळविण्यासाठी स्वकीयांशीच लढा देणे भाग होते. कारण मागून जर एखादी गोष्ट मिळत नसेल तर ती हिसकावून घ्यावी लागेल', या मताचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. याविषयीची तिखट प्रतिक्रिया नोंदविताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुढील विवेचन केले आहे. ''आमचे धोरण चढाईचे आहे. आम्ही विनम्र भावाने व अधोवदनाने जे काही मागावयाचे ते मागत नाही. यामुळे अस्पृश्यता निवारणाला अनुकूल असलेले लोकसुद्धा प्रतिकूल बनतात, असा आक्षेप आमच्याविरुद्ध आहे. पण असा आक्षेप घेणाऱ्यांना जनाची नसली तरी मनाची लाज वाटली पाहिजे, असे मला

ISSN No. 0949-6095

वाटते. अस्पृश्यांइतका नम्र व लाचार अलम दुनियेत कोण आहे? आज शतकानुशतके आम्ही नम्र राहिलो नाही काय? पाषाणालाही पाझर फोडणाऱ्या दीनावस्थेत व नम्र अवस्थेत आम्ही दिवस काढले ना? आता तरी कृपा करून नम्रतेचे व विनयाचे पाठ आम्हाला देऊ नका. ते आता उच्चवर्णियांनाच शिकवा. विनंत्या, अर्ज, शिष्टमंडळे यांच्या साहाय्याने गमावलेली स्वातंत्र्ये व दडपलेले हक्क मिळणे शक्य असते, तर नेमस्त पक्षाचे लोक आतापर्यंत हिंदुस्थानचे राजे बनले असते व हिंदूंची धर्मसत्ता अस्पृश्यांच्या घरी पाणी भरू लागली असती! उद्दामपणाची आम्हाला सवय आहे, अगर चढेलपणाचे चाळे करण्याची हौस आहे, असे थोडेच आहे? दिवसभर काबाडकष्ट करून पोटासाठी दोन घास कसे मिळवता येतील ही विवंचना आमची रोजची सोबतीण. पण भाकरीपेक्षा माणुसकी श्रेष्ठ म्हणून आम्ही या यातायतीत पडलो. कारण ठोठावल्याशिवाय दरवाजे उघडत नाहीत आणि हिसकावून घेतल्याशिवाय माणुसकीचे साधे हक्कही तुमच्या हातून सुटत नाहीत.''[३] या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पारंपरिक भारतीय समाजव्यवस्थेवरती एकप्रकारे असूड ओढण्याचे काम केले आहे. त्यांच्या मते, भारतीय परंपरा अनेकतेत एकता मानणारी आहे; परंतु ती उच्च-निचतेमध्ये बंदिस्थ असल्याने मानवतावादी विचार बाजूला पडतो. त्यामुळे आपली पारंपरिक मानसिकता बदलणे आवश्यक असल्याचे मत या माध्यमातून ते व्यक्त करताना दिसतात. बऱ्याच वेळेस एखादी गोष्ट मागून जर मिळत नसेल तर त्यासाठी संघर्ष हा अटळ असतो. त्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पष्ट शब्दात सुनावतात की, आमचे हक्क आम्हास मिळवून द्या. अन्यथा, संघर्ष करण्यास आम्ही समर्थ आहोत. या माध्यमातून एक प्रकारचा उद्वेगच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व्यक्त केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा हा स्पष्टवक्तेपणा आणि संघर्षशील स्वभाव बहुतेक कवींनी आपल्या कवितेचा विषय बनविलेला दिसून येतो.

दलितांचे आत्मभान आणि आत्मशोध ह्या दोन्ही वैशिष्ट्यांची साहित्यात प्रकट होणारी रूपे पाहिली आणि त्या अनुषंगाने वरील उतारा वाचला म्हणजे दलित साहित्यातून अभिव्यक्त होणारी वेदना आणि त्या माध्यमातून निर्माण होणारा विद्रोह आणि नकार किती अटळ आहे हे या ठिकाणी स्पष्ट होते. पाच वर्षे वाट बघून जर रामाचे मंदिर उघडणार नसेल तर 'देव दानवा नरे निर्मिले, हे मत लोका कळू द्या', असे निर्धारपूर्वक सांगणाऱ्या केशवसुतांच्याही पुढे जाऊन तुकाराम सपकाळे सारखा कवी आपल्या 'सुरुंग' सारख्या कवितेच्या माध्यमातून पुढील विचार व्यक्त करतो,

''आम्ही गाँड मेकर
देतो नोटीस तुझ्यावर

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya
Peth Vadgaon, Dist. Kolhapur.

निग्लिजन्स ऑफ ड्युटीची

युवर सव्हिंसेस आर नॉट रिक्वायर्ड'' (सुरुंग, पृ. ५३)

थोडक्यात पारंपरिक मानसिकता बदलण्याचे काम आम्ही हाती घेतले असल्याचेच जणू कवी सूचित करतो. कारण दलित वर्गातील खूप मोठा तरुण वर्ग आता शिक्षणाच्या माध्यमातून सज्ञान झाला आहे. तो अशा प्रकारची गुलामी कदापिही सहन करणार नाही, हा आशावाद उपरोक्त काव्यपंक्तीच्या माध्यमातून अभिव्यक्त होताना दिसतो.

भारतीय पारंपरिक मानसिकता, धर्म, संस्कृती आणि दांभिकता ह्याला वेदना, विद्रोह आणि नकाराची जोड आहे. अशा प्रकारचा उद्वेगपूर्ण आवेग अभिव्यक्त करणाऱ्या दलित कवींच्यामध्ये एक उत्तम उदाहरण म्हणजे अरूण कांबळे यांची पुढील कविता होय,

''आज आम्ही गद्दार झालोय
तुमच्या संस्कृतीशी, ढोंगी मानवतेशी
आणि वांझ धर्माशी सुद्धा
समुद्र खवळलाय
आमच्या मुक्तीच्या घोषणांचे हिल्लोळ
देतील धडकी तुमच्या ढोंगी संस्कृतीवर
आणि करतील प्रक्रिया सर्वांवर
समुद्राच्या समानतेची
आज आम्हाला प्रकाशाची शीड उभारलेलं
स्वातंत्र्याचं गाव दिसतंय'' (अलवाद, पृ. ३१)

वास्तविक पाहता दलित तरुण आक्रमक बनण्यापाठीमागे इथली समाजव्यवस्था कारणीभूत असल्याचे मत कवी उपरोक्त काव्यपंक्तीच्या माध्यमातून अभिव्यक्त करताना दिसतो. एकूणच दलित कवितांच्या माध्यमातून अभिव्यक्त होणारा नकार आणि विद्रोह हा प्रामुख्याने इथली धर्मपरंपरा आणि संस्कृतीला पवित्र मानणाऱ्या पारंपरिक मानसिकतेला विरोध करण्यासाठी आहे. दलित कविता निर्माण होण्यापाठीमागे देखील अशा प्रकारच्या प्रवृत्तींवर आघात करणे हाच उद्देश दिसून येतो. परंपरेवरील प्रेमामुळे अगर खोट्या अहंतांमुळे ही व्यवस्था टिकवून ठेवण्यात अप्रत्यक्ष मदत करणाऱ्या स्वकीयांविरूद्ध संघर्ष करण्याची भावनादेखील या माध्यमातून दिसून येते. इतकेच नव्हे; तर दलित चळवळीचा कणा मोडू पाहणाऱ्या पांढरपेशा मनोवृत्तीविरुद्ध उठाव करावा या प्रमुख उद्देशानेच त्यांच्या बहुतेक कविता निर्माण होताना दिसतात.

ISSN No. 2319-6025

दलित साहित्याच्या, पर्यायाने दलित कवितेच्या निर्मितीमध्ये शब्द हे माध्यम खूपच महत्त्वपूर्ण आहे. कारण शब्दांच्याच साहाय्याने आपण आपले विचार अभिव्यक्त करीत असतो. अशा प्रकारे भाषेच्या अविष्काराचादेखील विचार करणे या ठिकाणी क्रमप्राप्त ठरते. त्यामुळेच शब्दशक्तीची एक सार्थ जाणीव दलित साहित्यातून दिसून येते. त्यासाठी वामन निंबाळकरांची 'शब्द' ही कविता महत्त्वपूर्ण ठरते ती पुढीलप्रमाणे,

''शब्दांनीच पेटतात घरे, दारे देश
आणि माणसेसुद्धा
शब्द विझवतात आगही
शब्दांनी पेटलेल्या माणसांची
शब्द नसते तर पडल्या नसत्या
डोळ्यातून आगीच्या ठिणग्या,
वाहिले नसते आसवांचे महापूर,
आले नसते जवळ कुणी,
गेले नसते दूर-'' (शब्द, पृ. ११)

ही कविता म्हणजे जणू दलित कवींचा शब्दाविषयीचा प्रातिनिधिक दृष्टिकोन प्रकट करणारी आहे. वास्तविक पाहता शब्द हे विचार करण्याचे प्रमुख माध्यम आहे. शब्दांमुळेच विचारांचे आणि अनुभवांचे आदानप्रदान शक्य असते. त्यामुळेच शब्द हे परिवर्तनाचे साधन होय. परिवर्तनाआड येणाऱ्या शक्तींशी मुकाबला करायचा तो शब्दांच्या आधारेच आणि माणसं जोडायची तेही शब्दांच्या आधारेच. थोडक्यात भावनांच्या प्रकटीकरणाचे माध्यम म्हणून शब्दाची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते. म्हणूनच अखिल मानवजातीला करुणेच्या पदराखाली आणायचे ते शब्दांच्याच मदतीने. अशी शब्द शक्तीची पुरेशी जाणीव दलित कवितेच्या माध्यमातून अभिव्यक्त होते. ह्याचाच पर्यायाने अर्थ असा की, दलित कवींना शब्द आशयांप्रमाणे वाकवणारे हवेत; कोंडमाऱ्याचा उबग येईल इतके अस्वस्थ करणारे हवेत आणि विचाराचा प्रकाश पेरतील, असे आशादायकही हवेत.

दलित समाजाची वेदना हा भाग दलित कवितेसाठी खूपच महत्त्वपूर्ण आहे. त्यामुळेच दलित वेदना प्रकट करताना जो आक्रोश दलित कवितेत येतो तो पांढरपेशा वाचकाला उद्देशून बोलताना मात्र येत नाही. तिथे ज्याला बोलायचे आहे त्याच्या सर्वस्व भाषेचाच आधार घेत दलित कवी अतिशय धारदार उपरोध प्रकट करतो. त्र्यंबक सपकाळे यांचा कल शोषण लादणाऱ्यांना खडबडून जागे करण्याकडे आहे. 'उघडशील का मुर्दया बंद मनाचे दरवाजे', या कवितेमध्ये प्रकट झालेला उपरोध वाखाणण्याजोगा

Babasaheb Bedkar Mahavidyalaya Peth Vadgaon, Dist. Kolhapur
ISSN No. 2319-6025

आहे. तर तरुणांची तडफड आणि आपले काहीसे पांढरपेशी दुबळेपण ह्यातील अंतर प्रत्ययकारी करताना केशव मेश्राम यांनी आपल्या 'पाखरांनो' या कवितेची रचना एखाद्या स्वगतासारखी केलेली आहे. दलित कवी कळत नकळत स्वतःचे दुःख सांगता सांगता ते आपल्या संपूर्ण समूहाचे आहे हे सांगताना 'आम्ही' च्या रूपात बोलू लागतो. यशवंत मनोहर हे ज्यावेळी कविता करतात त्यावेळी त्यांच्या कवितेतील आवेश कृत्रिम वाटत नाही. त्यांची कविता पुढीलप्रमाणे,

''जाताना मुक्याने जाणार नाही
या पसाऱ्याला शाप देऊन जाईन
येताना उत्तरे घेऊन आलो होतो
जाताना प्रश्न घेऊन निघून जाईन'' (शाप, पृ. २८)

थोडक्यात, यशवंत मनोहरांच्या कवितेत वाचकांना विरंगुळा वाटावा यासाठी शब्दांची आतषबाजी नाही. तर दलित जाणीव 'मी'कडून 'आम्ही' कडे संक्रमित झाली की हा आवेश अभिव्यक्तीच्या गरजेतून जन्माला येतो. लोकनाथ यशवंत. यांच्या कवितासंग्रहाचे नाव 'आता होऊन जाऊ द्या!' असे आहे. झुंज देण्याची ही मानसिकता दलित कवितेशिवाय इतक्या प्रभावीपणे इतरत्र कुठेही पाहावयास मिळत नाही.

साधारणतः १९८० च्या दरम्यान 'अजातशत्रू' या टोपणनावाने काव्यलेखन करणारे अरुण काळे हे कवी उदयास येतात. त्यांना फार वर्षे कविता नीटनेटकी चपखल करता आली नाही. त्यामुळे समृद्ध आशय, भाषाप्रयोग असलेली त्यांची कविता जवळच्या परिसरातदेखील फार उशिरा पोहोचली. त्यांचा कवितासंग्रहही उशिराच प्रकाशित झाला. त्यांच्या स्वभावात असलेला विस्कळीतपणा हे कारण त्यापाठीमागे असू शकेल. २००६ साली त्यांनी प्रकाशित केलेल्या 'नंतर आलेले लोक' या काव्यसंग्रहाने मराठी समीक्षेचे सर्वच पारंपरिक अर्थयुद्ध, मध्ययुगीन आवरासावरीकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष करून 'शायनिंग इंडियाच्या' मोहजालात मशगूल झालेली येथील पारंपरिक मानसिकता, महासत्तेचे स्वप्न पाहणारे आणि मायभूच्या माणसाला मातीत गाडणारे येथील 'पावरवाले', येथील बारबालांची अगतिकता...यासारखे सारेच रसायन अरुण काळेंच्या काव्यसंग्रहाच्या माध्यमातून प्रभावितपणे अभिव्यक्त होताना दिसतात. समृद्ध चिंतनातून व्यक्तिगत अनुभवाच्या प्रदेशापलीकडे पाहू शकणाऱ्या अरुण काळे यांच्यासारख्या रापलेल्या चिंतनशील कवीच्या कवितेला दाद द्यावी तेवढी थोडीच आहे. त्यांच्या कवितेतील ओळींच्या माध्यमातून सांगावयाचे झाल्यास ते पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल,

''ही सनातन मोडस ऑपरेंडी, ही उपेक्षा, ही अवहेलना

ISSN No. 2319-6025

ही पाताळयंत्रे, ही खुन्नस, हे वैचारिक चळवळीचे गबरस्तान
हे जागतिकीकरण...बळी दादांनो
तुम्ही मानवाला उत्सव मिलेनियमचा, क्वार्टरभर दारू पिऊन
घाटा, ताठा, वाटा...यावर करणार की नाही काम?'' (नंतर आलेले लोक, पृ. १२)

नेणिवेच्या खोल तळातून आलेली अरुण काळे यांची कविता आज अनेकांना खुणावते आहे. अशा या प्रतिभावान कवीच्या अचानक जाण्याने दलित कवितेला काजळी चढल्याचे सूचन नक्कीच होताना दिसून येते. टिपिकल शब्द कवितेत पेरण्याची अरुण काळे यांची कला काही औरच होती. नटात बोल्ट की बोल्टात नट कशावर नेमकं काय फिट्ट? हे लक्षातच येत नाही. जागतिकीकरणात बोन्साय झालेलं माणूसपण अरुण काळेंच्या कवितेमध्ये सर्वत्र आढळताना दिसते. म्हणूनच त्यांची कविता विशिष्टांची न राहता, सीमारेषेत न अडकता वैश्विक होते. हेच त्यांच्या कवितेचे विशेष लक्षण असल्याचे पाहावयास मिळते.

१९९० नंतरच्या कालखंडात कवितालेखन करणाऱ्या काही प्रमुख कवींपैकी अगदी अलीकडच्या कालखंडात काव्यलेखन करणारे कवी म्हणून प्रकाश मोगले या कवीचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो. प्रकाश मोगले हे विचारनिष्ठ कवी आहेत. दलित समाजातील सामाजिक, राजकीय अस्थिरता, फुटीर दलित चळवळ यावरती ते समर्थपणे भाष्य करताना दिसतात. ज्या दलित पुढाऱ्यांवर दलित जनतेने विश्वास टाकला, ज्यांच्यासाठी प्राण पणाला लावले तेच पुढारी जेव्हा दुसऱ्याच्या दावणीला बांधून घेतात तेव्हा त्यांची बौद्धिक आणि राजकीय दिवाळखोरी कवी पुढील शब्दातून व्यक्त करतो,

''आम्ही नामांतर केले
तो टिऱ्या बडवून सांगत होता
हारतुरे स्वीकारत होता
नंतर दंगलीत पाय तुटलेला बाप पचकन थुंकला
आयला हिजड्यांना मिशा कधी आल्या'' (दंभस्फोट, पृ.

Babasaheb Ambedkar Mahavidyalaya
Peth Vadgaon, Dist. Kolhapur.

ज्या सर्वसामान्य दलित माणसांनी नामांतराची चळवळ समर्थपणे पेलली, ज्यांची घरेदारे जळून खाक झाली. अनेकांना आपल्या प्राणास मुकावे लागले. अनेकजण लुळे झाले. अशा परिस्थितीत स्वतःला पुढारी म्हणवणाऱ्यांना कवी उद्वेगाने म्हणतो, अरे आम्ही शूर म्हणविती मग हिजड्यासारखे का वागतो. लंगडत लंगडत भीमाचे नाव घेणारी, नामांतर व चळवळीतील माणसं बाजूला राहिली. या दंगलीपासून शेपूट घालून

ISSN No. 2319-6025

बाजूला पळणारी मंडळी आज विविध राजकीय पक्षांच्या ताटाखालचे मांजर बनून जगत आहेत. अशा प्रकारचा उद्वेग उपरोक्त कवितेच्या माध्यमातून अभिव्यक्त होतो.

'पोळणाऱ्या सावल्या' हा कवी कैलास भाले यांचा काव्यसंग्रह प्रकाशित झाला. त्यांनी आपल्या काव्यसंग्रहाच्या माध्यमातून ग्रहणग्रस्त मनाच्या जखमांची ओझी उतरून ठेवली आहेत. कवीच्या मनाला लागलेले ग्रहण बहुआयामी आहे. कवीचे भावविश्व जातीयतेच्या वणव्यात जळून खाक झाले आहे. बहुआयामी ग्रहण म्हणजे काल-परवा लागलेले ग्रहण नसून त्याचे वय साधारणतः हजारो वर्षांचे आहे. कवीने आपल्या मांग जातीला अस्पृश्यतेचे ग्रहण कसे लागते हे सांगत असताना पुढील ओळींचा आधार घेतला आहे,

''दे दान सुटे गिऱ्हान या ओळीत
आख्या गावगाड्याचे गिऱ्हान सुटले
आणि सुपा टोपल्याच्या जुन्या जीर्ण वस्त्र दानातून
पुन्हा आम्हाला चिटकले.'' (पोळणाऱ्या सावल्या, पृ.२८)

अशा प्रकारचे आर्थिक आणि सामाजिक शोषणाचे ग्रहण मातंग बांधवांना चिकटलेले आहे. त्याने गोचडीचे स्वरूप धारण केले असून ते आजतागायत सुटायचे नावच घेत नाही. अशा प्रकारचा उपरोध आपल्या कवितेच्या माध्यमातून कवी व्यक्त करताना दिसतो.

किर्तीपाल गायकवाड हे शतकाअखेर लेखन करणारे एक प्रतिभावान कवी ठरतात. त्यांनी 'गाव बाबाचं तळं आसवाचं' हा काव्यसंग्रह २००३ साली प्रकाशित केला. वास्तविक पाहता १९९० नंतरच्या काळात काही मोजकेच कवी कवितालेखन करू लागले होते. त्यामध्ये किर्तीपाल गायकवाड हे एक महत्त्वपूर्ण कवी ठरतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याविषयी किर्तीपाल गायकवाड यांनी आपल्या काव्यपंक्तिंच्या माध्यमातून सुमनांजली वाहिली आहे ती पुढीलप्रमाणे,

''आंबेडकरी जाणीव कोऱ्या हृदयावर
जयभीम नाम राहू द्या ओठावर
सांगता सांगता रक्त कितीचे आटले
भीम झटले झटले, राष्ट्रासाठी झटले'' (गाव बाबाचं, तळं आसवांचं, पृ. २३)

उपरोक्त काव्यपंक्तीच्या माध्यमातून कवीला केवळ दलित समाजाला जागृत करावयाचे नाही, तर संपूर्ण भारतीय समाजाच्या मनामध्ये परिवर्तनाची मशाल पेटवायची आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना दैवत मानून किर्तीपाल गायकवाड यांनी त्यांच्या

ISSN No. 2319-6025

प्रत्येक कवितेच्या माध्यमातून त्यांच्या कार्याचे स्मरण समस्त समाजास करुण देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या प्रत्येक कवितेच्या माध्यमातून अत्यंत थोडक्या शब्दांच्या माध्यमातून व्यापक अर्थ सहजपणे वाचकांच्यापर्यंत पोहोचविण्याची किमया कवीने साधली आहे.

पहिल्या पिढीतील दुर्लक्षित कवी म्हणून नारायणजी मगर यांचा उल्लेख करावा लागेल. त्यांचा 'दिशा' हा काव्यसंग्रह २००५ साली प्रकाशित झाला. नारायण मगर यांच्या वाट्याला जे जीवन आले तेच त्यांनी आपल्या कवितेच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी आपल्या कवितेच्या माध्यमातून भारतीय पारंपरिक संस्कृती, राष्ट्रीय एकात्मता, नात्या-नात्यांमध्ये निर्माण झालेला विसंवाद, सर्वत्र बोकाळलेली धर्मांधता, अंधश्रद्धा, धर्मांतरानंतरदेखील हिंदुत्वाच्या ओझ्याखाली वावरणारी दलित जनता यांसारख्या विषयांना आपल्या लेखणीच्या माध्यमातून शब्दबद्ध केले आहे. ते वास्तवाचे भान राखणारे कवी आहेत, हे त्यांच्या प्रत्येक कवितेच्या ओळीतून पाहावयास मिळते. आंबेडकरी जनतेची प्रतारणा करणाऱ्यांची ते कधीही गय करीत नाहीत, हे त्यांच्या पुढील काव्यपंक्तीच्या माध्यमातून स्पष्ट होते,

''अरे माणसांनीच माणसाची हत्या केल्यावर
जगात भारतीय संस्कृती थोर
असा आक्रोश करणाऱ्या धटिंगणांनो
कुठल्या तोंडाने सांगणार आहात
मेरा भारत महान''(दिशा, पृ.४५)

या माध्यमातून कवीने पारंपरिक भारतीय समाज मनावरती असूड ओढण्याचे काम केले आहे. त्यामुळेच तर भारतीय संस्कृती थोर आहे असे म्हणणाऱ्यांच्या डोळ्यात अंजन घालण्याचे काम कवी मगर यांची कविता करताना दिसते. ते म्हणतात की आजही अस्पृश्य जनता नशिबाला दोष देत जगत आहे. कारण इथे उदयाची पहाट कशी उगविणार आहे याविषयी साशंकता आहे. इतकी इथली समाजव्यवस्था जातीयतेच्या आणि धर्माच्या बंधनामध्ये अडकल्याची दिसून येते.

१९९० नंतरच्या एकूणच दलित कवितेचा विचार करता तिने पारंपरिक विचार झुगारून नवीन विचारांची कास धरलेली पाहावयास मिळेल. ही संपूर्ण कविता म्हणजे आजही बुद्ध, फुले, शाहू आणि आंबेडकरी विचारांवरती नितांत प्रेम करणारी आहे. विशेषतः बदलती समाजव्यवस्था, यामध्ये आंबेडकरी विचारांची उपयुक्तता, आजही दलितांवरील होणारे अन्याय, अत्याचार, स्त्रियांवरील बलात्काराच्या घटना याविषयीची प्रचंड चीड, अस्पृश्यतेचे दाहक चटके, वर्तमान युगात देखील दलितांच्यावरती लादली

ISSN No. 2319-6025

गेलेली वेठविबगारी यांसारख्या विषयांच्या माध्यमातून दलित कविता नव्या रूपांमध्ये प्रचंड प्रगती केली आहे. सर्वत्र आधुनिकतेचे वारे वाहत आहे. परंतु अशाही अवस्थेमध्ये लोकांची पारंपरिक मानसिकता मात्र तसूभरही ढळताना दिसत नाही. याविषयीचा संताप एकूणच कवितांच्या माध्यमातून अभिव्यक्त होताना दिसून येतो. कारण आजही जात ही गोष्ट लोकांच्या मनातून ढळताना दिसत नाही. लोकांची ही मानसिकता बदलणे अत्यंत आवश्यक आहे. तरच आधुनिक भारताची वाटचाल आशावादी आणि उज्ज्वलतेच्या दिशेने होईल, यामध्ये निश्चितच शंका नाही. गरज आहे ती पारंपरिक विचार त्यागून नवविचाराची कास धरण्याची, त्यासाठी करावा लागणारा जातीयता आणि पारंपरिक विचाराचा त्याग मात्र अत्यंत आवश्यक आहे. साठोत्तरी ते १९९० नंतरची दलित कविता याविषयीचेच सूचन करताना दिसून येते. या एकूणच कवितेच्या माध्यमातून आपल्या दलित समाजाविषयीची आत्मीयता आणि भविष्यकालीन वाटचालीचा वेध अभिव्यक्त होताना दिसतो.

संदर्भ :

१. डॉ. गंगाधर पानतावणे : 'अस्मितादर्श', प्रास्ताविक, १५ जाने १९७४, औरंगाबाद.

२. रा. ग. जाधव : 'निळी पहाट', विद्या प्रकाशन, पुणे, १९७८, पृ. ८८.

३. फडके भालचंद्र : 'दलित साहित्य वेदना आणि विद्रोह', पृ. ६८

◆◆◆

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya
Peth Vadgaon, Dist. Kolhapur


ISSN No. 2319-6025

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Vidyawarta®

Peer Reviewed International Multilingual Research Journal

Issue-40, Vol-02, Oct. to Dec. 2021



Editor
Dr.Bapu G. Gholap

14) Radha: a Conceptor Character in Gitagovindaa Study
Saroj Mahananda, Vani Vihar ||63

15) A COMPARATIVE STUDY OF SELF-CONCEPT OF B.ED. AND B.C.A. STUDENTS IN ...
DR. SHAHDAT HUSSAIN ||67

16) Sociolgy of Displacement : Specially focus on Tribal's Of India
Dr. Navin Kumar Singh, Disrict-Darbhanga ||70

17) BEAUTY IS IN MEASURING TAPE: CHANGING BEAUTY STANDARDS AND ITS ...
Kavita Mathpal & Dr. Jitendra Kumar Tiwari, Jhansi ||77

18) Analysis of Drainage Density of Auranga Basin, Jharkhand (India)
Dr. Ramchet Singh Yadav, Gorakhpur (U.P) ||82

19) WOMEN'S HUMAN RIGHTS: WITH INDIAN CONCERN
Dr. Rashmi Yadav, Sagar (M.P.) ||87

20) ब्रिटिश लष्करातील महारांचे पराक्रम आणि भीमा कोरेगावचे युध्द
सिध्दार्थ विठ्ठलराव मस्के, परभणी ||92

21) भारताची आर्थिक वाढ आणि आर्थिक विकास : एक परीक्षण
प्रा.डॉ. प्रकाश जंगले, ठाणे ||96

22) रायगड मधील कातकरी (आदिवासी) समाजाचे सामाजिकजीवन
प्रणिता काळे, मुंबई ||98

23) कोरोना महामारीचा भारतीय शेती क्षेत्रावरील परिणाम
डॉ.गोवर्धन रावसाहेब खेडकर, जालना ||103

24) आधुनिक ग्रामीण साहित्यातील स्त्रीचित्रण
डॉ. सर्जेराव पद्माकर, जि.कोल्हापूर ||106

25) नवोदत्तरी मराठी बालनाटय आज काळाची गरज .....
आशा दौलतराव राजगुरु ||110

26) माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान (आयसीटी) ग्रंथालयाच्या विकासाचेप्रभावी माध्यम
प्रा. मोहन शशिकांत रतकंठीवार, जिल्हा — चंद्रपूर ||112

http://www.printingarea.blogspot.com
www.vidyawarta.com/03

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Peth Vadgaon Dist. Kolhapur

24

आधुनिक ग्रामीण साहित्यातील स्त्रीचित्रण

डॉ. सर्जेराव पद्माकर
डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,
पेठवडगाव, जि.कोल्हापूर

प्रास्ताविक :

वर्तमान समाजव्यवस्थेमध्ये ग्रामीण साहित्याचा विचार करता ग्रामीण साहित्य हे पारंपरिक विचारांना केंद्रिभूत मानून वाटचाल करताना दिसून येते. आधुनिक कालखंडामध्ये जरी समाज बदलला असला तरीही ग्रामीण समाजजीवन आणि विशेषकरून ग्रामीण स्त्री मात्र बदललेली पहावयास मिळत नाही कारण, ती पारंपरिकतेच्या आहारी गेल्याने तिचा विकास होऊ शकला नाही. शहरी भागामध्ये मात्र शिक्षणाच्या परिणामातून सुशिक्षित झालेली स्त्री प्रचंड प्रमाणात बदलली.वर्तमान युगात तीने आपल्या इच्छाशक्तीच्या बळावर समाजातील सर्वच क्षेत्रे पादाक्रांत केलेली पहावयास मिळतात. त्याअनुषंगाने वर्तमान सामाजिक स्थितीं देखील प्रचंड प्रमाणात बदलताना दिसते. आज केवळ दळनवळणाचीच नव्हे तर सर्वच क्षेत्रामध्ये बदलाचे वारे वाहताना पहावयास मिळते. याचाच एक भाग म्हणून ग्रामीण भागातील स्त्री देखील केवळ चूल आणि मूल या जोखडातून मुक्त होऊन अलिकडच्या कालखंडामध्ये थोड्याबहुत प्रमाणात स्वतंत्र विचार करू लागलेली आहे. वर्तमान युगात खेड्यांमध्ये देखील प्रचंड प्रमाणात बदल दिसून येतो आहे. आज प्रत्येक खेड्यामध्ये देखील भ्रमनध्वनीसारख्या सुविधा उपलब्ध आहेत. शेतकरी आज पारंपरिक शेतीऐवजी आधुनिक शेतीच्या माध्यमातून स्वत:ची प्रगती साधू लागलेला पहावयास मिळतो. हा बदल लक्षात घेऊनच सध्याच्या ग्रामीण स्त्रीची नेमकी जगण्याची रीत व तिच्या बदलाचे स्वरूप स्पष्ट करण्याचा हेतू प्रस्तुत शोधनिबंध लेखनापाठीमागे आहे.

ग्रामीण साहित्य : संकल्पना आणि स्वरूप :

स्वातंत्र्यपूर्व काळापासून उदयास आलेल्या ग्रामीण साहित्याची खरी सुरूवात १९६० नंतरच झालेली पहावयास मिळते. कारण १९६०नंतर वाङ्मयीन प्रांतात दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, जनवादी, विज्ञानवादी यासारख्या वाङ्मयीन प्रवाहांना प्रारंभ झाला. याचाच एक भाग म्हणून 'ग्रामीण साहित्य' या जोरकस प्रवाहाचा उल्लेख करावा लागेल. ग्रामीण जीवन हे केवळ शेतकरी जीवनापुरते मर्यादित नसून शेतकरी आणि त्याच्या कुटुंबाचे प्रतिबिंब प्रस्फुटित करणारे वाङ्मय आहे. त्यामुळे ओघानेच शेतकरी जीवनाबरोबर त्याचे कुटुंबदेखील तितकेच महत्वपूर्ण ठरते. कुटुंबाचा एक महत्वपूर्ण भाग म्हणून शेतकऱ्याची पत्नी आणि तिचे शेतकरी कुटुंबात असलेले स्थान कितपत सक्षम आहे याचा विचार प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून मांडणे क्रमप्राप्त ठरते.

१९६०नंतरच्या कालखंडामध्ये उदयास आलेल्या 'ग्रामीण साहित्य' या संकल्पनेचा विचार करीत असताना 'ग्रामीण' या शब्दाचा संबंध ग्रामाशी, खेड्याशी आहे. 'ग्राम' म्हंटल्या बरोबर 'खेडे' किंवा 'अनागर वस्ती', 'शहराशिवायची वस्ती' हेही आपल्या लक्षात यायला वेळ लागत नाही. हे खेडे किंवा ग्राम मुख्यत: गावगाड्यावर आधारित असते. म्हणजेच खेड्यातील जीवन ग्रामसंस्कृतिला डोळ्यासमोर ठेवून चालत असते. ही ग्रामसंस्कृती गावगाड्याच्या संस्कृतीशी, रूढी परंपरेशी बांधलेली असते. गावगाड्यात जे लोक राहतात त्या लोकांचे राहणीमान, त्यांची जीवनपद्धती, आचार — विचार, रूढी — परंपराहे त्यांच्या लिंग भेदावर निश्चित केलेले असते. म्हणजे स्त्री–पुरूष, त्यांच्या जगण्याच्या पद्धती, सामाजिक दर्जा, वर्तनपद्धती हे ग्रामीण समाजाने घालून दिलेल्या व्यवस्थेनुसार नियमव्यवस्थेनुसारच असल्याचे पहावयास मिळते. पुरूषांच्या तुलनेत ग्रामीण भागात स्त्रीयांना पारंपरिक समाजव्यवस्थेला अधिक प्रमाणात सामोरे जावे लागते. परंपरेने दिलेली चूल आणि मूल ही रूढीग्रस्त देणगी, समाजातल्या रूढी–परंपरा, आचार–विचार, धार्मिकपरंपरा या सर्व जाणिवांना खेड्यातील स्त्री मूकपणे सहन

करीत असल्याचे दिसून येते. दुःख, दारिद्र्य हे तर तिच्या पाचविलाच पुजलेले आहे. अशा दारून अवस्थेत ग्रामीण भागातील स्त्री भरडली जाते आहे. हे ग्रामीण समाजजीनातील एक भयान वास्तव आहे.

मराठी ग्रामीण साहित्यातील स्त्रीच्या बदलाचे स्वरूप :

वर्तमान स्थितीत खेडे बदलू लागले आहे. या बदलत्या खेड्याची झळ ग्रामीण भागातील स्त्रीला खूपच मोठ्याप्रमाणात जानवू लागली आहे. तिला असंख्य संकटांना सामोरे जावे लागते. या स्त्रीच्या बदलत्या जीवनाचे प्रतिबिंब ग्रामीण साहित्यात थोड्याफार प्रमाणात उमटलेले दिसते. अगदी स्त्रीवादी जीवन चित्रण करणाऱ्या लेखिकांच्या साहित्याच्या माध्यमातूनही ग्रामीण भागातील कष्टकरी स्त्री चित्रित झालेली दिसते. संपूर्ण भारताचा विचार केला तर ग्रामीण व शहरी यांच्या अनुषंगाने बदलती स्त्री जीवनाचे चित्रण अनेक लेखिकांनी केलेले पहावयास मिळते. त्यात 'अमृता प्रितम' यांचा विशेषत्वाने उल्लेख करावा लागतो. त्या ग्रामीण प्रतिमांच्या आधारे स्त्री जीवनाची भयावहता वाचकांच्या समोर मूर्तीमंत उभी करतात. जणू खेड्यातील स्त्री प्रत्यक्षात आपली वेदना मांडते आहे असे वाटते. या संदर्भातील विवेचन पुढीप्रमाणे,

''अन्नदाता में मांस की गुडियाँ खेल ले खिला ले ।
लहू का प्याला पी ले, पिला ले,
तेरे सामने खडी हूँ, इस्तमाल की चीज,
कर लो इस्तमाल''

किंवा

''इजी हूँ, पिसी हूँ, बेलनसे बीली हूँ ।
आज गर्म तवे पर, जैसे चाहे उलट लो ।
मैजो निगले से बढकर, कूछ भी नही ।
जैसे चाहे निकल लो ।''

उपरोक्त काव्यपंक्तींच्या माध्यमातून इतक्या परखडपणे बोलणारी ही कवयित्री संपूर्ण भारतातील स्त्रियांचे प्रतिनिधित्व करताना पहावयास मिळते. ह्या पार्श्वभूमीवर मराठी साहित्यातील विविध प्रवाहांमधील कवितांचा आणि कवयित्रींचा विचार करता सर्वच प्रवाहातील स्त्रीचे चित्रण अपूर्ण असल्याची जाणीव होते. ग्रामीण साहित्यात स्त्री जिवनाचा मुख हेतू लेखनातून शोधताना सावित्रीबाई फुले यांचा अग्रक्रमाणे उल्लेख करावा लागतो.त्यांच्या लिखानातून स्त्रीचित्रण प्राधान्यक्रमाने आलेले आहे. पुढे 'स्त्री–पुरूष तुलना' या गद्य लेखनातून ताराबाई शिंदे यांनी मांडलेले परखड विचार आणि 'बहिणाबाईची गाणी' यांच्या गीतातून साकारलेली स्त्री बदलाचे प्रतिक मानावे लागेल. या काळातील ग्रामीण स्त्रीच्या चित्रणाला तोड नाही. ते अजोड तर आहेच पण, पुरूष लेखकाच्या लेखनालाही आव्हान देणारे आहे. पेशवाईतील ब्राह्मण स्त्रियांनाही पती आज्ञेमुळे इच्छा नसतानाही जो व्याभिचार सहन करावा लागत होता त्याचे रोखठोक चित्रण सावित्रीबाईनी केले आहे.

ताराबाई शिंदे म्हणतात की, 'स्त्री–पुरूष तुलना' हे लेखन निर्भिडपणे करण्याचे कारण 'स्त्री–पुरूष अशा दोन जाती आहेत आणि स्त्रीला कोणतीच जात नाही हे वैश्विक सत्य आहे.' बहिणाबाई तर स्वत:च्या हातांवरील रेषांवर विश्वास न ठेवता हातातील कतर्श्त्वावर विश्वास ठेवून जगतात. स्त्री कष्टाचे गीत त्या पुढील शब्दांच्या माध्यमातून मांडतात,

''काया काया शेतामधी
घाम जीरव जीरव
तवा उगलं उगलं
काया मधून हिरवं''

या कालखंडामध्ये समाजात स्त्रियांना महत्वाचे स्थान नव्हते त्यामुळे पारंपरिक मानसिकतेतील पुरूष प्रवश्तीला स्त्रीचे ऐकण्याची सवय नाही. त्यामुळे लेखन प्रांत स्त्रीयांचा नाही असा स्त्री–पुरूष दोघांचाही समज होता. त्यामुळे बहिणाबाईची गाणी ठेवावी लागली तर मालतीबाईना टोपन नावाने लिहावे लागले.

मराठी साहित्यात १९६० नंतर विविध प्रवाह निर्माण झाले. त्यामध्ये ग्रामीण साहित्यातून दुर्मिळ असणाऱ्या स्त्रीचे चित्रण उमटू लागले. स्वातंत्र्यप्राप्ती नंतरच्या घटनांमुळे स्त्री–पुरूष समानता निदान कागदोपत्री तरी मांडली गेली. कागदोपत्री स्त्रीला अनेक हक्क मिळाले. पुढे स्त्रीजागृतीचे प्रयत्न अनेक स्तरावर सुरू झाले त्याचे परिणाम ग्रामीण स्त्रीवर होवू लागले. त्यामुळे स्त्री बदलू लागली. ग्रामीण स्त्रीचे चित्रण साहित्यातून प्रामुख्याने दिसू लागले. ग्रामीण लेखक केशव बोबडे

'एक सावली व कडूनिंबाची गोष्ट' या कथेच्या माध्यमातून स्त्रियांचे भावविश्व नेमकेपणाने टिपताना दिसतात. त्यांनी एकाच मुलीवर स्वत: निर्णय घेऊन पाळणा थांबविणारी नायीका आपल्या पतीलाही नव्या प्रवाहात सामील करताना दिसते अशाप्रकारचे भावविश्व चित्रित केले आहे. उद्धव शेळक्यांच्या 'धग' या कादंबरीतील नायीका कौतिक ही आळशी नवऱ्याचा संसार रेटत आपले कुटुंब सावरत वास्तवात जगण्याचा प्रयत्न करते.

ग्रामीण गद्यलेखनाचा प्रारंभ करणाऱ्या लेखिका सरोजीणी बाबर यांचा 'नव्याची पुनव' हा कथासंग्रह ग्रामीण स्त्रीचे चित्रण करणारा महत्वपूर्ण आहे. या कथासंग्रहाच्या माध्यमातून ग्रामीण स्त्री, तिची सुख दु:खे, समजुती व चालिरिती या सगळ्याचे दर्शन खास ग्रामीण शैलीत होते. सासू—सून यांचे नाते, सण—वार, रूढी—परंपरा जपणारी स्त्री, अबुलाही जपणारी स्त्री अशा स्त्रीचे चित्रण अनुराधा गुरव यांच्या कथातून व्यक्त होते. प्रतिमा इंगोले यांच्या लिखानातील ग्रामीण स्त्रीचे भोग, कावाड कष्ट, हाल अपेष्टा, नवऱ्याचा धाक आणि त्यातून अभिव्यक्त केलेली स्त्री अस्तित्वाची जाणीव दिसून येते.

बदलत्या ग्रामीण जीवनाचे चित्रण करताना अनेक लेखकांनी साहित्यातून बदललेल्या ग्रामीण स्त्रीजीवनाचे वास्तव चित्रत करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु हे जीवन ग्रामीण जीवनाच्या अनुषंगाने अथवा ग्रमीण पुरूषांच्या अनुषंगाने येते. ग्रामीण साहित्यात स्वतंत्र स्त्री जीवन फक्त आनंद यादव यांच्या आत्मचरित्रानंतर रा. रं. बोराडे यांच्या साहित्यात आलेले आहे. त्यांच्या 'पाचोळा' मधील पार्वती तर 'संस्कार' मधील व्यक्तिरेखा आहे. पण 'आमदार सौभाग्यवती' सारख्या कलाकृतीतून बदलत्या स्त्रीच्या जीवनाचा आलेख मांडला आहे. ग्रामीण स्त्री जीवनाच्या शोषनाचे चित्रण सदानंद देशमुख यांच्या कथातून प्रकट होते. 'कणा' कादंबरीबरोबर कवितेतूनही अनेक कवींनी या बदलत्या स्त्रियांना रेखाटले आहे. नारायण सूर्वेच्या 'मास्तर तुमचंच नाव लिवा' या कवितेतून ग्रामीण भागातून फसऊन मुंबईला नेलेली आणि नको त्या धंद्याला लावलेली स्त्री आपल्या लेकराला शिकवू बघते. शाळेत नाव घालताना मास्तर बापाचे नाव विचारतात तेव्हा 'मास्तर तुमचच नाव लिवा' म्हणून सांगणारी स्त्री काळजाचा ठोका चुकविते. कवी ना. धो. महानोर यांच्या 'तिची कविता' हा कवितासंग्रह रात्रंदिवस शेतात, मळ्यात, खळ्यात राबणाऱ्या कुटुंबासाठी कष्ट करणाऱ्या ग्रामीण स्त्रीचा कवितासंग्रह आहे. इंद्रजित भालेराव यांच्या 'कुणबिणीची कहाणी' या कवितेमध्ये अपवादानेच अनेक स्त्रियांच्या अवस्था मांडल्या आहेत. अशा अनेक कहाण्या लिहूनही जीची गाथा संपणार नाही अशी ही ग्रामीण स्त्री साहित्यापुढील आव्हान आहे. तिचे हेच प्रत्यक्ष रूप कवी पुढील शब्दांच्या माध्यमातून प्रतिबिंबित करतो,

"आई खरच काय असते?
लेकराची माय असते
वासराची गाय असते
दुधाची साय असते
लंगड्याचा पाय असते
आई असते जगण्याची शिदोरी
सरतही नाही, उरतही नाही"

ही खरी ग्रामीण स्त्रीची ओळख, पुरूषप्रधान संस्कृती प्रमाणभूत मानून जीवन जगणाऱ्या वर्तमान समाजजीवनात स्त्रीच्या भावविश्वाकडे कोणाचे लक्ष जाईल हाच खरा प्रश्न आहे. पोटाची खळगी भरण्यासाठी शहराकडे धाव घेणारी तिची लेकरे तिला विसरू पाहत आहेत. कवितेच्या माध्यमातून उभे केलेले स्त्रीचे हे रूप वास्तवपणे उभे राहते. तरीही तिचे अस्तित्व कालातीत आहे. अशी ग्रामीण बदलती स्त्री सर्वमान्य होत आहे हे मात्र निश्चित.

समारोप :

स्वातंत्र्यपूर्व काळापासून उदयास आलेल्या ग्रामीण साहित्याची खरी सुरूवात १९६० नंतरच झालेली पहावयास मिळते. कारण १९६० नंतर वाङ्मयीन प्रांतात दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, जनवादी, विज्ञानवादी यासारख्या वाङ्मयीन प्रवाहांना प्रारंभ झाला. याचाच एक भाग म्हणून ग्रामीण साहित्य या जोरकस प्रवाहाचा उल्लेख करावा लागेल. ग्रामीण जीवन हे केवळ शेतकरी जीवनापुरते मर्यादित नसून शेतकरी आणि त्याच्या [illegible] प्रतिबिंब प्रस्फुटित करणारे ते महत्वपूर्ण वाङ्.

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Peth Vadgaon Dist. Kolhapur

मय आहे. ग्रामीण साहित्यात स्त्री चित्रणाचा मूळ हेतू लेखनातून शोधताना सावित्रीबाई फुले यांचा अग्रक्रमाणे उल्लेख करावा लागेल. त्यांच्या लिखानातून स्त्रीचित्रण प्रभावीपणे आले आहे. पुढे 'स्त्री–पुरूष तुलना' या गद्य लेखनातून ताराबाई शिंदे यांनी मांडलेले परखड विचार आणि 'बहिणाबाईची गाणी' यांच्या गीतातून साकारलेली स्त्री ग्रामीणत्वाचे प्रतिक मानावे लागेल. या काळातील ग्रामीण स्त्रीच्या उमटलेल्या चित्रणाला तोड नाही. ते अजोड तर आहेच पण पुरूष लेखकाच्या लेखनालाही आव्हान देणारे आहे.

ग्रामीण गद्य लेखनाचा प्रारंभ करणाऱ्या लेखिका सरोजीनी बाबर यांचा 'नव्याची पुनव' हा कथासंग्रह ग्रामीण स्त्रीचे चित्रण करणारा महत्त्वपूर्ण कथासंग्रह आहे. तर तो त्यात ग्रामीण स्त्री, तिची सुख दुःखे, समजुती व चालिरिती या सगळयाचे दर्शन खास ग्रामीण ढंगात होते. सासू–सून यांचे नाते, सण–वार, रूढी–परंपरा इतकेच नव्हे तर अबुलाही जपणारी स्त्री अशा स्त्रीचे चित्रण अनुराधा गुरव यांच्या कथातून व्यक्त होते. प्रतिमा इंगोले यांच्या लिखानातील ग्रामीण स्त्रीचे भोग, कावाड कष्ट, हाल अपेष्टा, नवऱ्याचा धाक आणि त्यातून अभिव्यक्त केलेली स्त्री अस्तित्वाची जाणीव प्रभावीपणे प्रकट होते.एकूणच ग्रामीण कविता आणि तिच्या वाटचालीचा वेध घेतल्यानंतर हाती आलेले प्रमुख निष्कर्ष पुढीलप्रमाणे,

१- स्वातंत्रपूर्व काळ्यपासून उदयास आलेल्या ग्रामीण साहित्याची खरी सुरूवात १९६० नंतरच झालेली पहावयास मिळते.

२- ग्रामीण साहित्यात स्त्री चित्रणाचा मूळ हेतू लेखनातून शोधताना सावित्रीबाई फुले यांचा आग्रक्रमाणे उल्लेख करावा लागेल. त्यांच्या लिखानातून स्त्री चित्रण प्रभावीपणे आले आहे.

३- 'स्त्री–पुरूष तुलना' या गद्य लेखनातून ताराबाई शिंदे यांनी मांडलेले परखड विचार आणि 'बहिणाबाईची गाणी' यांच्या गीतातून साकारलेली स्त्री ग्रामीणत्वाचे प्रतिक मानावे लागेल.

४- ग्रामीण गद्य लेखनाचा प्रारंभ करणाऱ्या लेखिका सरोजीनी बाबर यांचा 'नव्याची पुनव' हा कथासंग्रह ग्रामीण स्त्रीचे चित्रण करणारा महत्त्वपूर्ण कथासंग्रह आहे.

संदर्भ: –

१- सार्वेकर कैलास, : 'ग्रामीण कवितेची पहाट', मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे, प्रथमावृत्ती, १९९९ पृ–1-

२- यादव आनंद, : 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, द्वितीयावृत्ती, १९८४ पृ–४९

३- चौधरी बहिणाबाई, : 'बहिणाबाईची गाणी', चौथी आवृत्ती, मुंबई,ज्योती पिरिऑडिकल्स, १९८२ पृ–३०

४- नलगे चंद्रकुमार,(संपा.) : 'मराठी ग्रामीण कविता', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, १९६६ पृ–१२०

५- जहागिरदार विश्वास,: 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका (ग्रामीण साहित्य विशेषांक)' जुलै–डिसेंबर, १९८० पृ –८९-

❑❑❑

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Peth Vadgaon, Dist. Kolhapur.

कोल्हापूर
NAAC Reaccredited 'A'
with CGPA -3.24 (in 3rd cycle)

'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार'
-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

ISSN : 2281-8848

VIVEK
RESEARCH JOURNAL

A Biannual Peer Reviewed National Journal of Multi-Disciplinary Research Articles

A Special Issue on

Indian Council of
Social Science Research
SPONSORED

विमुक्त और घुमंतू जन समुदाय : दशा और दिशा
(भारतीय साहित्य के परिप्रेक्ष्य में)

March, 2022

Babasaheb Ambedkar Marathwada University

ISSN : 2581-8848

15	'वळंबा' आत्मकथन : सामाजिकता	वीणा रमेश गुलदेवकर	63
16	लमाणांच्या आर्त वेदनांचे स्पंदनलदनी:	श्रीगौरीशंकर दत्तात्रय खोबरे .	66
17	"शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे विचार व कार्य आणि भटक्या विमुक्त जाती–जमाती"	सौ. शेख शबाना.एम. प्रा. सचिन बबन साळवे	70
18	उपन्यास 'अल्मा कबूतरी': कबूतरा समाज का ताना बाना –	डॉ. सरोज पाटील	74
19	भटक्या समाजातील स्त्रियांची आत्मकथने	डॉ . सर्जेराव पद्माकर	78
20	छप्परबंद समाजाची सामाजिक स्थिती	डॉ.मनिषा विनायक शिरोडकर	86
21	भटक्या विमुक्त जाती-जमातीच्या आत्मकथनांमधील सामाजिकता	शितल संग्राम सालवाडगी	91
22	आदिवासी जमातीचे सामाजिक जीवन	डॉ.ज्योती रामराव रामोड	97
23	"भटक्या विमुक्त जमातीची क्षेत्रीय पहाणी"	डॉ. घाडगे डी. के.	100
24	"बंजारा समाजाचे सामाजिक जीवन"	प्रा. आर्या सुनील कुलकर्णी	105
25	स्वातंत्र्याची पंच्याहत्तरी आणि उपेक्षित वंचित घटक	प्रा. डॉ. विजय माने	108
26	'निलोफर' उपन्यास में चित्रित विमुक्त और घुमन्तू जनजातिय परिवार	डॉकल्पना पाटोळे.	114
27	खानाबदोश नटों के जीवन का यथार्थ दस्तावेज :शैलूष	डॉ.मालोजी अर्जुन जगताप	118
28	गोहुअन (उपन्यास) और आदिवासी स्त्री का विद्रोह	डॉइबरार खान .	121
29	"घुमंतू जनजाति का दहकता दस्तावेज : पराया"	डॉ.गायकवाड शितल माधवराव	125

Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Peth Vadgaon Dist Kolhapur

ISSN : 2581-8848

भटक्या समाजातील स्त्रियांची आत्मकथने

डॉ. सर्जेराव पद्माकर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,
पेठ-वडगांव जि. कोल्हापुर.
मो.८३२९८१२०१२

सारांश :

दलित लेखिकांची आत्मकथने मराठी साहित्यात आत्मचरित्र या वाङ्मय प्रकाराचे स्वतंत्र स्थान आहे. त्याला ' दीर्घ परंपरा आहे. सर्वसाधारणपणे वाचकांनी या वाङ्मय प्रकाराबद्दल आस्थेने कुतूहल दाखविलेले आहे. मराठी वाङ्मयाच्या प्रवासात अनेक वळणे घेत हा साहित्य प्रकार मान्यता पावलेला आहे. विविध टप्प्यांच्या आधारे त्याचे विश्लेषण केले जाऊ शकते. इतके वैविध्य त्यात आढळते. अनेक अभ्यासकांनी त्याचे वेगळेपण आणि वैशिष्टये वेळोवेळी दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. मराठीमध्ये पुरुषांच्या आत्मचरित्रांची आत्मकथनांची परंपरा सांगता येते. तशी ती स्त्रियांच्या आत्मकथनांची सांगता येते. या परंपरेत आपल्या व्यवच्छेदक वैशिष्टयांनी ही आत्मकथने नटलेली आहेत.

आपल्या जगण्याचा पट कमीअधिक प्रमाणात अभिव्यक्त करण्याचा साहित्यप्रकार म्हणून आत्मकथनाला विशेष महत्त्व आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये भारतीय संविधानाने कार्यान्वित केलेल्या शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणामुळे इथला दलित, आदिवासी, भटके, विमुक्त इत्यादी सर्वच वर्गाने आत्मकथनाद्वारे आपले जीवन मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे यामध्ये भटक्या जमातीच्या विमल मोरे व जनाबाई गिऱ्हे यांच्या आत्मकथनाचा प्रस्तुत निबंधामध्ये विचार मांडला आहे.

पारिभाषिक संज्ञा : आत्मचरित्र, साहित्यप्रकार, गोपाळ, जातपंचायत, शिंदळकी करणे, गोंधळी समाज

'मरणकळा' जनाबाई गिऱ्हे

'गाव तिथं पालं आणिक पाणी तिथं पालं', 'खाली धरती वर आभाळ', 'हातावरचं आणा आणि हातावरचं खा' असं भणंग जीवन जगणाऱ्या भणंग भटक्या समाजातील एक जमात म्हणते गोपाळ. या गोपाळ जमातीत जन्मलेल्या जनाबाई कचरु गिऱ्हे यांचे सन १९९२ रोजी प्रकाशित झालेले 'मरणकळा' आत्मकथन मराठी साहित्य प्रांतात गोपाळ समाजाचे प्रतिनिधित्व करते. गोपाळ समाजातील एक मुलीचा शिक्षणासाठीचा संघर्ष आणि गोपाळ समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक स्थितीचे दर्शन घडविणारे आत्मकथन म्हणून त्याकडे पाहता येते. 'मरणकळा' आत्मकथनाची मांडणी अशा एकूण ९ प्रकरणामध्ये केली आहे. आत्मकथनाची सुरुवात गोपाळ समाजाची तत्कालीन स्थिती कशी होती. याच्या कथनाने होते. सुरुवातीला आजी आजोबांच्या आठवणी सांगत आहे अशी रचना लेखिकेने केली आहे. प्रत्येक प्रकरणाचे शीर्षक पाहिल्यानंतर त्यांच्या अंतरंगातील आशय लक्षात येण्यास मदत होते. आजीने सांगितलेल्या आठवणी, जमातीची भटकंती, भूकेचे चित्रण, भीक मागणे, चोऱ्या करणे, शिक्षणासाठीचा संघर्ष, जातपंचायत, लग्नाच्या पध्दती, लेखिकेचे डी.एड. पर्यंतचे शिक्षण, लग्न, संसार, नोकरीच्या निमित्ताने होणारी धावपळ, त्यातून होणारा अपघात, पुन्हा नव्याने उभे राहून नोकरीत स्वतःला गुंतवून घेणे अशा सलग क्रमाने लेखिकेने आपला जीवनप्रवास कथन केला आहे. त्यामुळे मरणकळातील आशय अनुभव संपन्न, सरळ रेषेत असलेला दिसतो.

ज्या माणसांना घर नाही, गाव नाही, एका गावामध्ये तीन दिवसांपेक्षा अधिक काळ राहता येत नाही अशा भटकंती करीत भीक मागणाऱ्या या समाजाला अन्न, वस्त्र, निवाऱ्यासारख्या मूलभूत गरजा भागविणे कठीण असते, ही माणसे पालामध्ये राहत असतात. त्यांना खायला पोटभर अन्न मिळत नाही. आठरा विश्व दारिद्रय अनुभवास येणाऱ्या या समाजाचे दर्शन आपल्याला 'मरणकळा' आत्मकथनातून घडते.

'मरणकळा' चे आशयसूत्र :

समाजव्यवस्थेने गुन्हेगारीचा शिक्का मारलेल्या या समाजाला स्वतःच्या मालकीचे गाव, घर, जागा असे काहीच नाही. माणसाचा मृत्यू झाला तर पुरण्यासाठीही जागा नाही. ऊन, वारा, पाऊस यातून संरक्षण करण्यासाठी या समाजाला कशाचाही आधार नाही. पोटातील भूक भागविण्यासाठी चोरी करणे, भीक मागणे, अनेकविध सोंगे घेणे अशा परिस्थितीला त्यांना सामोर

Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Peth Vadgaon Dist. Kolhapur

जावं लागत असतं. अशा समाजामध्ये जन्मलेल्या जनाबाई गिहे यांनी स्वतः बरोबरच या समाजाचे दुःख, वेदना आणि संघर्ष यांचे वर्णन करुन धगधगते समाजवास्तव आपल्यासमोर ठेवले आहे.

वडीलांनी जनाबाईला शाळेत घातले तेंव्हा समाजाने विरोध केला. मुलीला शाळा शिकवणे या समाजाला पटत नाही. अशा समाजातील मुलगी शिक्षण घेते, शिक्षिका होते. आपल्या समाजातील भयंकर जीवन जगणारी माणसे, त्यांची सततची भटकती, चालीरीती, रुढी, परंपरा आणि समजूती यामध्ये अडकलेली आहेत. दसरा, दिवाळी, शिमगा, पाडवा है सण भटकंती करत भीक मागत साजरे केले जातात. हा समाज देवभोळा असल्याने काही बरे वाईट झाले तर ते देवाने केले असे तो मानतो. त्यामुळेच 'आसं कसं झालं? आमच्यावर देव का कोपला? आम्ही का देवाचं घोडं मारलं का?"[१]" यासारख्या प्रश्नांमधून ते दृष्टिस पडते. समाजातील चालिरिती, रुढी, परंपरा, अज्ञान अंधश्रध्दा यांचे वेळोवेळी दर्शन घडते.

स्वतःला येणारे अनुभव, दुःख, समाजाशी, कुटुंबाशी संघर्ष, संघर्षातून होणारी भांडणे, मारामारी, गावातून केली जाणारी हाकालपट्टी, समाजातील विविध विधी, सण, शिक्षण घेताना आलेल्या अडचणी, बेकारी, नोकरीसाठी दूर राहणे, प्रवासाचा त्रास, अपघात आणि त्यातून सावरुनही अनेकविध प्रसंगाना तोंड देत जगणे असा एकूणच जनाबाईच्या आयुष्यातील प्रवास 'मरणकळा' मधून घडलेला दिसतो.

शिक्षणासाठी संघर्ष :

अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या मुलभूत गरजा पण या प्राथमिक गरजांचीच पूर्तता जिथे करता येत नाही, अशा ठिकाणी शिक्षण तर दूरची गरज ती कशी पूर्ण होणार ? या समाजातील लोकांचं पोट सतत पाठीला लागलेलं, त्याची भरती करण्यात आयुष्य संपत चाललेलं, ज्यांच्या आयुष्यालाच किंमत नाही अशा समाजात शिक्षणाचा प्रसार कसा होणार? अज्ञानाच्या अंधःकारात सापडलेल्या समाजातील एखादया व्यक्तिला शिक्षणासाठी फार मोठा संघर्ष करावा लागतो. जागोजागी अंधार असतो, विरोध असतो. समाजातील, कुटुंबातील विरोध मोडीत काढून गोपाळ समाजातील शिक्षण घेणारी जनाबाई ही पहिली मुलगी, मुलींना शिकविणे म्हणजे शिंदळकी किंवा भूताची बाधा होते, असा समज असणाऱ्या समाजाने लेखिकेला शाळेत घातले म्हणून त्यांच्या आजोबांना, वडीलांना बहिष्कृत केले. तरीही पंचायतीच्या निर्णयाला न जुमानता लेखिकेचे शिक्षण सुरु असते.

शिक्षण घेत असताना समाजाकडून अपमान, छळ, उपेक्षा सहन करावी लागते. जनाबाई जेंव्हा शाळेत जाते तेंव्हा तिच्या अवताराकडे पाहून एक बाई आपल्या मुलील तिच्या शेजारी बस देत नाही. मास्तरला तिला हाकलून दयायला सांगते. पारास्थता सामना करीत पालाबरोबर फिरत - फिरत तिसरीपर्यंतचे शिक्षण जनाबाई घेतात. 'पोटाप्रमाणेच पुस्तकांसाठीही भीक मागावी लागायची' असेही त्या नमूद करतात. या समाजातील स्त्रिया जात्यावर गाणी गाताना त्यातूनही टोमणे मारत. मुलीने शिकणे म्हणजे नाचक्की असे समजणाऱ्या या समाजातील लेखिकेचा चुलता म्हणत असे, 'बाप्या, बाप्या खेडर्याला जा अन् पोरीला घेऊन ये. आपल्या भिकाऱ्याच्या पोरी का कुठं शिकत्यात ? चालला पोरीला शिकवायला. आरं बा ! उंटाच्या गांडीचा का मुका घेतुया ? का त्वा शिकायचा नाद धरला? आन् पोर थाटात नेऊन घातलीया."[२]" शिक्षणासाठी घरातूनही विरोध असला तरी अशा विरोधाला न जुमानता प्रचंड इच्छाशक्तीच्या जोरावर संघर्षाला तोंड देत-देत लेखिका डी.एड.पर्यंतचे शिक्षण पूर्ण करते. अशा प्रकारे अज्ञानी असलेल्या गोपाळ समाजातील शिक्षणाविषयीच्या गैरसमजाचे दर्शन मरणकळातून घडते.

भूकेसाठी करावा लागणारा संघर्ष :

पाठीवर बिऱ्हाड घेऊन पोटासाठी गावोगाव भटकणाऱ्या या समाजाचा सगळ्यात मोठा प्रश्न असतो तो भूकेचा. रोजच्या रोजी रोटीचा. रोजी रोटीसाठी या लोकांना अनेक यातना सहन कराव्या लागतात. पोटातील भूकेमुळे निर्माण झालेल्या वास्तवावर प्रकाश टाकताना जनाबाई म्हणतात, 'पोटात सकाळपासून कणभर अन्न नव्हतं' जाता दिस कल्ला. चार वाजायला आले हुते, जेवणाच्या उसट्या पत्रावळ्या उकिरडयावर टाकल्या तशा आम्ही धावलो. आमच्याबरोबर कुत्रीबी धावले. आम्ही एकीकडे वढीत हुतो आन् कुत्री एकीकडे वढीत हुते'."[३]" उकिरडयावर टाकलेल्या पत्रावळयावर कुत्र्याप्रमाणेच माणसेही तुटून पडतात. हृदय पिळवटून टाकणाऱ्या या भूकेसाठीच्या प्रसंगातून जनावरांप्रमाणे माणसालाही जीवन जगावे लागते. पोटातील भूक भागविणाऱ्यासाठी या समाजातील लोकांना कराव्या लागणाऱ्या संघर्षातून कुत्र्यापेक्षाही किंबहुना जनावरांपेक्षाही भयंकर वास्तव

Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

ISSN : 2581-8848

जीणं वाटयाला आलेले दिसून येते. म्हणूनच भूकेपुढे, पोटापुढे माणसाचे सारे प्रश्न दुय्यम ठरतात. एकीकडे जनावरांप्रमाणे करावा लागणारा संघर्ष तर दुसरीकडे जगण्यासाठी भीक मागण्यासाठी घ्यावी लागणारी सोंगे या दोन्ही पातळीवरील वास्तव लेखिकेन मांडलेले दिसते. 'अंगात फाटकी तुटकी चोळी आणि इजार हुती त्याच्यातून अंगाला चटाचटा ऊन लागत हुतं. उन्हात चड्डी ओली व्हायची पाळी आली हती, आन् आमी जळगावात शिरलो... बानं इचार केला आन् बा मनला, पोरी आता म्या आंधळा हुतुया, माव्ह बोट धरं, खरोखरच बानं डोळं झाकले. म्या बाचा हात धरला अन् बानं गाणं मनाया सुरुवात केली, आंधळ्याला कुटका देरे राम, रघुपती राघव राजाराम'."[४] भीक मागण्यासाठी खरोखर आंधळा नसतानाही आंधळ्याचं सोंग घ्यावं लागतं. आंधळा नसतानाही आंधळ्याचं सोंग घेणारा माणूस, त्याची राहणी, भीक मागत असताना केविलवाणे होऊन म्हटले जाणारे गाणे. या सर्वच घटना प्रसंगातून गोपाळ समाजातील धगधगते समाज वास्तव आपल्या मरणकळा या आत्मकथनाद्वारे जनाबाई गिहे समाजासमोर ठेवताना दिसतात.

गोपाळ समाजातील स्त्रीजीवन :

दलित शोषित, पीडित भटक्या समाजातील स्त्रियांचे जीवन पुरुषांनी लिहिलेल्या साहित्यातून आले असले तरी स्त्रीने लिहिलेल्या स्त्रियांचे जीवन साहित्यातून अल्प प्रमाणात आले आहे. ज्यांना गाव नाही, घर नाही, तीन दिवसापेक्षा जास्त काळ एका ठिकाणी राहता येत नाही अशा समाजातील स्त्रियांचे जीवन अत्यंत हालाखीचे आहे. भारतीय समाजव्यवस्थेने स्त्रियांना दिलेले दुय्यमत्व त्यातही दलित स्त्रीला अतिशय वाईट अनुभवांना सामोरे जावे लागते. पुरुषांचे दास्यत्व स्वीकारुन पिढ्यान् पिढ्या तिला चाकोरीबध्द जीवन जगावे लागते. असाच एक जीवनानुभव लेखिकेने सांगितला आहे.लेखिकेला घरात काम करताना तिचा लहान मुलगा फार त्रास दयायचा म्हणून तिने मुलाला मारले. ही घटना लेखिकेच्या सासू आणि नणंदेने भर घालून नवऱ्याला सांगितली. ते ऐकून लेखिकेचा पती तिला म्हणतो, 'तुझं माझं नातं तुटलं, माझ्या घराबाहेर हो'. यावर लेखिका लिहिते, 'जंगलातल्या चुकलेल्या पाडसासारखी मी कावरीबावरी झाले हुते. हया दहा तोंडापुढं माझं एकटीचं तोंड आणि मला स्वातंत्र्य नव्हतं. त्यांचं ते खरं आणि माझं ते सारं खोटं असे समजून ते वागायचे हे सारं दुःख मी गिळून बसायची."[५] अतिशय लहान-सहान घरगुती क्षुल्लक कारणावरुनसुध्दा स्त्री आणि पुरुषही कसे छळतात याचा नमुना आपल्याला पहावयास मिळतो.

गोपाळ समाजातील स्त्रीला जीवनात कुठेच स्थैर्य मिळत नाही. ती सतत कष्टामध्ये, धावपळीमध्ये अडकलेली असते. या आत्मकथनामध्ये गोपाळ समाजातील कष्टकरा स्त्रिया, भीक मागून जगणाऱ्या स्त्रिया, लेखिकेच्या आईला तिच्यानंतर मूल होत नाही म्हणून लेखिकेला 'सपाटपाटीची' असं हिणवणाऱ्या स्त्रिया, मुलींने शाळा शिकणे म्हणजे शिंदळकी करणे असं म्हणणाऱ्या स्त्रिया या सर्व स्त्रियांच्या मनाचे, भावभावनांचे, सुखदुःखाचे, कल्लोळाचे काळजाला भिडणारे चित्रण मरणकळामधून येते. पोरीची जात म्हणजे काचेचं भांड, ती शिकल्यानंतर वाईट वर्तन करेल, समाजाचे नाक कापेल या दृष्टीकोनातून हा समाज स्त्रीवर्गाकडे पाहतो. या सर्वांचे परिणामकारक चित्र 'मरणकळा' मधून उभे केलेले दिसते. परंतु व्यापक अर्थाने गोपाळ समाजातील स्त्रीचे चित्र उभे राहताना दिसत नाही.

भाषा विशेष :

मरणकळा मधून आलेली भाषा ही गोपाळ समाजाची बोलीभाषा आहे. बीड - अहमदनगर सीमारेषा परिसरातील भाषेतील अनेक शब्द त्यातून आविष्कृत झाले आहेत. गोपाळ समाजाची भाषा, बोलीभाषेतील म्हणी, वाक्यप्रचार, गाणी यातूनही ते समृध्द झाले आहे. या आत्मकथनाचे निवेदन प्रामुख्याने प्रथमपुरुषी स्वरुपातले आहे. आपले जीवन ओघवत्या शैलीत मांडल्याने आत्मकथनाला विलक्षण. प्रत्ययकारकता प्राप्त झालेली दिसते. लेखिकेने आपल्या पूर्वायुष्याचे कथन बोलीभाषेतून अत्यंत परिणामकारकरित्या साधले आहे. निवेदनातील सहजपणा, निःसंकोचता, छोटी छोटी वाक्ये यामुळे आत्मकथनाला आटोपशीरपणा आला आहेच. त्याचबरोबर यामुळे अस्सलपणाही प्राप्त झालेला दिसून येतो.

बोटी (मटणाचा तुकडा), डोणूक (लाकूड), इलाज (उपाय), बाजिंदी (नखरैल) बीमोड (नाश) खळगूट (कालवण), सागुती (मटण), जल्लाद (हुशार, भारी) असे गोपाळ समाजात वापरले जाणारे शब्द आत्मकथनाला आशयघनत्व प्राप्त करुन देतात. हट्टाला पेटणे, टुमणी मागं लावणे, उरात धडकी भरणे, पाचवीला पुजणे, बारा बैलाचं बळ येणे, पाठीच धिर्ड काढणे अशा

Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

वाक्यप्रचारातून भटक्या समाजजीवनाची ओळख होते. 'मारणाऱ्याचा हात धरता येतो, बोलणाऱ्याचं तोंड धरता येत नाही, जित्याची खोड मल्यावाचून जात नाही"[५]" आब्रूच खचतं बीन आब्रूचं पोसतं, बाप भीक मागू द्यायना आन् माय भाकर दिना अशा म्हणींमधून या समाजाचे जीवन, त्यांची नितीमत्ता, सस्कार, संस्कृती, व्यवहार स्पष्ट होतात. यातून आविष्कृत झालेल्या उपमा, संवाद, इंग्रजी शब्द, शिव्या, गाणी या सर्वच गोष्टींमधून 'मरणकळा' हे आत्मकथन समृध्द झाले आहे. त समाज वास्तवाला स्पर्श करणारे ठरत असल्यामुळे नलिनी महाडिक म्हणतात, 'जनाबाई गिहे यांनी मरणकळा' या आत्मकथनात आपल्या भटक्या जातीचे वास्तवपूर्ण चित्रण केले आहे."[७]" ते योग्य वाटते.

समारोप :

स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाची प्रकाशकिरणे समाजापर्यंत किंबहुना तळागाळापर्यंत पोहोचण्याची प्रक्रिया सुरु होती. या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून ही किरणे तळागाळापर्यंत पोहोचत होती. पोटाची भूक शमविण्याचा ठाण मांडून उभा राहिलेला प्रश्न सोडविताना दलित समाजाला त्याहीपेक्षा दलित समाजातील स्त्रीला करावा लागणारा संघर्ष वेगळा अनुभव सांगून जातो. या भूकेबरोबरच शिक्षणासाठीचा संघर्ष तोही स्त्री असूनसुध्दा शिक्षण म्हणजे फारच विदारक अनुभव. असा विदारक अनुभव, परिणामकारक भाषा निवेदनशैलीमध्ये जनाबाई गि-हे यांनी मरणकळातून मांडला आहे. गोपाळ समाजाला स्वतःच्या गाव, घर असे काही नसतानाही हा समाज भटकंती करीत भीक मागत आपल्याला येणारं, आलेलं आयुष्य कंठत असतो. माणसाला माणूस असूनसुध्दा माणसासारखं जीवन जगता येत नाही. तर जनावरासारखं जीवन त्याला जागवं लागतं. हे भयानक वास्तव या आत्मकथनातून समोर येतं. मात्र हे वास्तव असलं तरी 'आपली कुठं इस्टीक वाया चाललीया, चार घरं मागतुया तवा पोटाला मिळतंया मला नको दोन बाया एका हाडाला दोन सुया"[८]" दुसऱ्या लग्नाचा विचार नाकारणारी लेखिकेच्या वडिलांसारखी व्यक्तिरेखा ही वर्तमान परिस्थितीचा विचार केंद्रस्थानी ठेवणारी व्यक्तिरेखा परिणामकारक निश्चितच ठरते.

एकूणच गोपाळ समाज, या समाजातील मानवी मनाचे, स्त्री मनाचे त्यांच्या व्यथा, वेदना, संघर्ष, शिक्षणाचा संघर्ष यांचा मेळ बसविताना बोली भाषा, म्हणी, वाक्यप्रचार गोपाळ समाजातील सांकेतिक भाषा यांचा अतिशय उत्तम संयोग साधलेला दिसता.

'तीन दगडाची चूल'- विमल मोरे :

'तीन दगडाची चूल' हे विमल मोरे लिखित आत्मकथन एका वेगळया विश्वाची ओळख आपणाला करुन देते. 'तीन दगडाची चूल' हे आत्मकथन भटक्या विमुक्त जमातीमधील स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मकथनामध्ये दुसरे आत्मकथन आहे. विमल मोरे यांचे हे आत्मकथन २००० साली प्रकाशित झालेले असून यामधून त्यांनी आपल्या जीवन जाणिवांसह स्वतः जगलेला समाज चित्रित केला आहे. 'तीन दगडाची चूल' मधून विमल मोरे यांनी स्वतः जगलेला समाज अगदी बारकाव्यांसह टिपलेला आहे. या समाजात असणाऱ्या रुढी, परंपरा, चालीरिती, समजूती, अंधश्रध्दा यांची स्पष्टपणे माहिती दिलेली आहे. या परंपरेत हा समाज कसा जगतो, तसेच उपेक्षितांतील उपेक्षित असणारे स्त्रियांचे जीवन या आत्मकथनातून मांडले आहे. भटक्या समाजातील लोकांची पोटाची भूक, पोटाच्या भूकेसाठी भटका समाज कशा प्रकारचे जीवन जगतो आहे याचे चित्रण विमल मोरे यांनी आपल्या या आत्मकथनातून केले आहे.

आत्मकथनाचा आशय :

समाजव्यवस्थेकडे स्त्रीच्या दृष्टिकोनातून पाहण्याचे परिणाम, रुढी, परंपरेत अडकलेल्या भटक्या समाजाला रोजची चूल पेटविण्यासाठी करावा लागणारा संघर्ष याचे केलेले चित्रण म्हणजे 'तीन दगडाची चूल' हे आत्मकथन होय. या आत्मकथनामध्ये विमल मोरे यांनी आपले लग्नापूर्वीचे कोल्हापूर (कळंबा) येथील जीवन व पालाबरोबर भटकंतीचे जीवन आणि लग्नानंतरचे चळवळीतील घटना -प्रसंगाचे वर्णन करताना दिसून येतात. एका स्त्रीने भोगलेले दुःख फक्त तिचेच न राहता ते भटक्या समाजातील प्रत्येक स्त्रीचे होऊन जाते. विमल मोरे या लग्नापूर्वीची विमल नामदेव भोसले तिचा भाऊ अशोक हयाच्यामुळे प्रथम शाळेची पायरी चढते. विमलला शिक्षणासाठी तिची बहिनी सुमती ही मदत करते. कोल्हापूरमध्ये राहून शिक्षण घेता घेता सुटीच्या काळात पालाबरोबर जाणे, या समाजातील पुरुष अंबाबाईचा पुजारी होऊन भीक मागून आणतात, लहान मुलेही लाकडाच्या काठीला

Ambedkar Mahavidyalaya

ISSN : 2581-8848

कापड गुंडाळून त्याची सटवाई करुन भीक मागतात. गोंधळी समाजातील स्त्रियाही पुरुषांच्या बरोबरीने काम करतात. भीक कोण वाढत नाही तेंव्हा भांडी विकायला स्त्रिया आणि पुरुषही जातात. या समाजात संशय घेणारे, दारु पिणारे पुरुष आहेत. ते दारु पिऊन बायकोला मारतात. स्त्रिया हे सर्व सहन करतात. असे भटक्या समाजातील चित्रण आपल्याला 'तीन दगडाची चूल' या आत्मकथनामध्ये पहावयास मिळते.

तसेच विमल मोरे यांच्या दुसऱ्या भावाचे (लिंगाप्पाचे) लग्न झाल्यानंतर पैशाच्या ओढाताणीमुळे आई-वडिलांची व भावंडांची वाटणी होते. त्यांची ताटातूट, अशोकदादाची बदली या घटना - प्रसंगातून हे आत्मकथन फिरताना दिसते. तरीही त्या शिक्षण घेतात. पण घरातील मानसिक त्रासामुळे आणि दारिद्र्यामुळे त्यांचे शिक्षण थांबते. त्याचवेळेस त्यांना दादासाहेब मोरे यांचे स्थळ येते. आणि त्यानंतर विमल नामदेव भोसले हया सौ.विमल दादासाहेब मोरे होतात. त्यामुळे आत्मकथनाला वेगळी दिशा मिळते. पालाबरोबर भटकंती करणारे त्यांचे जीवन चळवळीच्या मार्गाने धावताना दिसते. दादासाहेब मोरे यांच्याबरोबर त्या भटक्या विमुक्तांच्या कार्यक्रमाला जातात. त्यामुळे त्यांना भटक्या विमुक्तांचे प्रश्न समजतात. त्यांच्या अडचणी लक्षात येतात. तसेच त्या विटा येथील कार्यक्रमात अशिक्षित, अडाणी नंदीवाल्यांची शांताबाई आपल्या समाजाचे जीवन, स्त्रियांची दुःखे, वेदना मांडताना पाहतात. विविध ठिकाणी कार्यक्रम घेण्यासाठीच्या बैठका पाहतात. या कार्यक्रमातून आलेले अनुभव त्या आत्मकथनाच्या दुसऱ्या भागात मांडलेल्या आहेत. भटक्या - विमुक्तांचा मेळावा, उत्तम कांबळे यांच्या घरातील बैठक, याबरोबरच नाशिक येथे विमल मोरे यांनी पोटात दुःखण्याचे नाटक करुन मांत्रिकाचा ढोंगीपणा उघड केला. याचेही चित्रण या आत्मकथनात येते. दादासाहेब यांच्या सहवासामुळे त्या चळवळीत सहभागी होतात. आणि चळवळीतून आलेले अनुभव त्यांनी आत्मकथनाच्या उत्तरार्धात मांडले आहेत. तसेच दादासाहेब मोरे यांच्या नोकरीच्या निमित्ताने त्यांच्याबरोबर फिरताना जीवनाशी, परिस्थितीशी संघर्ष करण्याची तयारी ठेवताना त्या दिसतात. यामधून दगडाची चूल' चे अंतरंग दिसून येते.

भटकंतीचे चित्रण :

तीन दगडाची चूल' मध्ये विमल मोरे यांनी गोंधळी समाजाच्या वाटयाला आलेल्या भटकंतीचे चित्रण केले आहे.गोंधळी समाजाचे देवस्थान सांगली जिल्हयातील जत येथे आहे. गाव आहे पण पोटासाठी देवीचा पुजारी होऊन भीक मागत ही जमात गावोगावी फिरताना दिसते. चातुर्वर्ण्य व्यवस्थेत जगणाऱ्या माणसाने दिलेल्या भीकेवर हा गोंधळी समाज जगताना दिसतो. हा समाज गाव बदलताना कधी पायी तर कधी एस.टी. ने प्रवास करतो. या प्रवासाचे वर्णन करताना विमल मोरे सांगतात, 'पाचसहा दिवसातच आम्ही अथणीहून उगारला राहण्यासाठी आलो. उगारच्या बस स्टॅण्डवर आमच्या सात आठ कुटूंबातील चिल्ली-पिल्ली मिळून, तीस - पस्तीस लोकांची गर्दी त्या स्टॅण्डवर सर्व लोकांचं लक्ष वेधून घेत होती."[५] यावरुन गोंधळी समाज संसार बरोबर घेऊन भटकंती करताना दिसतो. अशातहेने गोंधळी समाजातील लोक एका गावावरुन दुसऱ्या, दुसऱ्यावरुन तिसऱ्या गावाला भटकंती करत जगताना दिसतात.

पालावरचे जीवन :

पालावरील जीवनामध्ये सगळीच माणसे उघडयावर राहतात. बायकाही उघडयावर बसून आघोळ करताना दिसतात. अन्नही उघडयावर शिजवितात व खातातही. पालावरचं जावन जगताना दुःख, दैन्य, अंधश्रध्दा यामध्ये हा समाज गुंतलेला दिसून येतो. सर्व काही उघडयावर जगणं जगावं लागतं. सर्व उदरनिर्वाह हा वादळ-वाऱ्यात, ऊन-पावसात भटकतच करावा लागतो हे वास्तव विमल मोरे या आत्मकथनातून मांडतात. स्वतःच्या मालकाच्या चार भिंती असतात, त्याला घर म्हणतात हया विचारांपासून ही माणसं खूप लांब असतात. उध्वस्त जगण्याचा प्रवास या आत्मकथनातून अनेक ठिकाणी पहायला मिळतो.

चोरीचे प्रसंग :

गोंधळी समाज हा पोटासाठी भटकंती करतो. त्यामुळे तो अनेक ठिकाणी भीक मागत जगत असतो. ज्यावेळी कोणी भीक वाढत नाही त्यावेळी ही माणसे नविन व्यवसाय शोधतात असाच एक भांडी विकण्याचा धंदा चालू असतानाचा प्रसंग लेखिका सांगते. धंद्यामध्ये खूप घासाघीस करुन दुकानातील दरापेक्षा कमी किमतीला भांडी विकावी लागतात. तेंव्हा ही माणसे भांडयाची मोड घेताना वजनाच्या पारडयाला चुंबक चिटकवतात. नविन भांडयाचे वजन [illegible] पारडयाला चुंबक

Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Be Bhasaheb

चिकटवून लोकांना फसवतात. ही एक प्रकारे चोरीच असते. असे करताना सापडले तर त्यांना मार खावा लागतो. परंतु परिस्थिती तसं वागायला भाग पाडते. म्हणजे नाइलाजास्तव कसंतरी पोटाची भूक भागविण्यासाठी ही माणसं वेगवेगळ्या पध्दतीनं आपली जीवनपध्दती बनवून जगण्याचा प्रवास करतात.

शिक्षणाविषयी अज्ञान :

गोंधळी समाज भटकंती करुन जगणारा समाज आहे. रुढी, परंपरा, अंधश्रध्दा, देवधर्म यामध्ये गुरफटलेला आहे. भीक मागून जीवन जगणे आवश्यक असल्याने हा समाज शिक्षणापासून वंचित राहिलेला आहे. या समाजातील मुले शाळेत न जाता सटवाई घेऊन भीक मागायला जातात. त्यामुळे त्यांचे कसे - बसे पोट भरते. या समाजातील काही मुले शाळा शिकून नोकऱ्या करु लागले आहेत मात्र संख्या फार कमी आहे. मुलींना मात्र शाळेत पाठविले जात नाही. या आत्मकथनामध्ये लेखिकेला ज्यावेळी तिचा भाऊ अशोकदादा, शाळेत पाठवायचे म्हणतो तेंव्हा तिचे बाबा रागाने दादाला म्हणतात, आशा तुज डोस्कबिस्कं फिरलं का काय ? पुरीला शाळंत घालतु म्हणतूस... आमच्या जातात पुरा शाळेत जात्यात का? लय शिकलास म्हंजी शेना झालास व्हय?"[1]"" यावरुन असे दिसते की, त्यांच्या मते मुलगी कितीही शिकली तरी तिला चूल आणि मूल सुटलेले नाही आणि आपल्या जातीत पोरी शाळेत जात नाहीत. आणि शाळा शिकल्या तर त्याच लग्न होणार नाही. त्यांना घरी ठेवून घ्यावे लागेल. यावरुन असे दिसते की, गोंधळी समाजाच्या मुलींच्या शिक्षणाला विरोध आहे. अशाप्रकारे या आत्मकथनात विमल मोरे शिक्षणाविषयी, समाजाकडून आलेले अनुभव व स्वतःचे अनुभव व्यक्त करताना दिसतात. शिक्षण हेच सर्व प्रगतीचे लक्षण आहे हा विचारच अजून यांनी स्वीकारलेला नाही याचे चित्रण या आत्मकथनातून स्पष्ट होते.

गोंधळी समाजातील स्त्री जीवन :

शूद्र वर्णातील लोकांना सामाजिक व्यवस्थेत दुय्यम दर्जाची वागणूक दिली जात होती. या वर्गातील स्त्री ही शूद्राचे जीवन जगतच होती. पुरुषसत्ताक कुटुंबपध्दतीमुळे पुरुषांची दासी म्हणूनही जीवन जगत होती. अशी दुहेरी उपेक्षा भोगणारी स्त्री भटक्या आणि गावकुसाबाहेरच्या समाजरचनेत दिसून येते.

या आत्मकथनामधील स्त्री ही पुरुषांच्या खांदयाला खांदा लावून काम करताना दिसते. चूल आणि मूल यामध्येच अडकलेली दिसत नाही. तरीही तिच्या वाटयाला उपेक्षित असेच जीवन येते.राबराब राबूनही तिच्याबद्दल या समाजातील पुरुषाला जराही आपुलकी वाटत नाही. या समाजातील स्त्री कधीच शाळेची पायरी चढली नाही. लहानपणीच तिचे लग्न केले जाते. 'संसार म्हणजे काय?' हे समजण्याच्या आतच तिला मुलं होतात. अशा परिस्थितीत या समाजातील स्त्री पुढे आयुष्यभर चूल, मूल आणि कष्ट यामध्ये गुरफटलेली दिसून येते. या समाजातील स्त्री ही शिक्षणाविषयी अज्ञानी आहेच तशीच ती अंधश्रध्दाळूही आहे. या आत्मकथनामध्ये विमल मोरे लहान असताना तिला गोवर येतो. अगाला जखमा होतात. तरीही तिला दवाखान्यात घेऊन न जाता देवाधमाचच बघतात. घाडगेमावशी विमलला. गोवर का आला त्याचे कारण सांगते, देव धुवायला घाड पाणी टाक...' ही पानी पीत हुबी हती. हिनं तव्वाचं ताजं पानी टाकायचं सोडून उष्ट पाणी देवावर ओतलं मी लई चिडली होती हिच्यावर.तेंव्हा बोलले सुध्दा देवा आता या पोरीला काय तरी करील आनि थोडयाच दिवसात असं झालं."[2]" अशा प्रसंगातून त्याची दवाकड बघण्याची दृष्टी आणि या समाजातील स्त्री ही अंधश्रध्दाळू आहे, हे ही दिसून येते.या समाजातील स्त्रीचे जीवन हे पुरुषी वर्चस्वाखाली दबलेले असल्याचे दिसते. या समाजातील स्त्री नवयाबरोबरीने घराबाहेर पडून भांडी विकण्याचा आणि पोट भरण्यासाठी धडपडताना दिसते. तरीही या समाजातील पुरुष आपल्या बायकांना मारहाण करताना दिसतात आणि या स्त्रिया हा छळ निमूटपणे सहन करतात.अशा अनेक प्रसंगातून या समाजातील स्त्रियाचं जीवन समजून घेता येते.

जातपंचायत :

भटक्या आणि विमुक्त जमातीमधील लोक हे अंधश्रध्दा, दारिद्रय, लाचारी यामध्येच जीवन जगताना दिसतात. भटक्या विमुक्तांमध्ये प्रत्येक जमातीची जातपंचायत असल्याची दिसते. गोंधळी समाजातही जातपंचायत आहे. या समाजात कोणी रुढी, परंपरा मोडून काही केले तर जातपंचायत बसविली जाते. तसेच प्रकरण मिटवायचे असेल तर दंड भरुन घेतला जातो.

Ambedkar Mahavidyalaya

ISSN : 2581-8848

जातपंचायतच्या निर्णयाविरुध्द जर कोणी गेले तर त्याला सर्व समाज वाळीत टाकतो. म्हणजे त्याला बहिष्कृत केलं.जातं त्यामुळे वाळीत टाकण्याच्या भितीने जातपंचायत जो निर्णय देईल तो निर्णय सर्वजन पाळतात. आणि तो सर्वांसाठी बंधनकारक असतो.

भाषा विशेष :

या आत्मकथनामधील गोंधळी समाज भटकंतीच्या निमित्ताने कोल्हापूर, बेळगांव, बोरगांव, खकई, माळीनगर(सोलापूर), गोंधळयांची वाडी (जत), उमदी, अथणी, बनाटी, उगार, निपाणी, संकेश्वर, सौंदत्ती, मिरज,सांगली, चिकोडी, या परिसराशी त्यांचा संबंध आल्याने या परिसरातील भाषेचा प्रभाव या समाजावर झालेला आहे. संवादासाठी हा समाज वापरत असलेली भाषा पुढीलप्रमाणे दिसून येते.

आमच्या घरातील माणसं वेगवेगळ्या दिशेनं मागून खात फिरत होता. परंतु 'आषाढ' मात्र एकत्रच करत होती.' आई व विमल आषाढाला यशोदाकाकीकडे जातात तेंव्हा आंब्बूआक्का आईला म्हणाली, थोरली आय... त्वा कवा आलास?

आताच आली... त्वा कशी हायीस?

बरंच म्हणायचं... इमल, त्वा बी आलीस व्हय?

मी म्हणाले, व्हय... आकाड बगाया आली."[१३] या संवादासाठी वापरलेल्या भाषेशिवाय या समाजाची सांकेतिक अशी भटक्यांची गुप्तभाषा आहे.

'नामदेवमामा... चिडक कणशी गासका लागत्याती "[१४]" (नामदेवमामा . बघ, माणसं इगडंच येत आहेत) 'पांडुरंग, उगचं खंबडा करवाडू नटी... पाकत्याली... दुसरीकडं खुकानु"[१५]" (पांडुरंग उगीच भांडण करु नकोस... लोक मारतील... दुसरीकड जाऊ...

या आत्मकथनामध्ये कोल्हापूर, सांगली, परिसरात वापरले जाणारे संवाद आले आहेत.पूर्वार्धातील भाषेत सहजता दिसते.पण उत्तरार्धातील भाषेत सहजता दिसत नाही. या आत्मकथनामध्ये विमल मोरे यांनी बोलीभाषेचा वापर केलेला आहे. भाषेतील म्हणी, वाक्प्रचार, उखाणे, लग्नात रुखवताच्यावेळी घ्यायची नावे, गोंधळयांची गीते यांचाही वापर केलेला दिसून येतो.

उदा.:

'घरात नाही दाना आनि हवालदार म्हणा... "[१५]" देव आला द्याला आनं पदर न्हाय घ्याला"[१६]... 'कर न्हाय त्याला डर कसली?"[१७]"... संवादासाठी बोलीभाषेत वापरली जाणारी विरोधात्मक वाक्येही प्रसंगावधानाने वापरली आहेत.

उदा:

१) बाय हाय का कसाबीण...'

२) 'गोरीपान पोरगी काळी ठिक्कर पडली' ...

लग्नप्रसंगाच्या वेळी नवरा-नवरीने घ्यावयाची नावे उखाण्यातून घेण्याची प्रथा असलेली दिसते.

उदा :

'चलती है बस उडती है धूल, शुभांगी के हात मे गुलाब का फूल"[१८]"... रुखवताच्या वेळी घ्यावयाची नावे.

आला आला रुखवत, त्यावर होतं गाजार, आणि ईनबायला पोरं हजार तर नुसता भुतांचा बाजार...."[१९]" इत्यादी उखाण्यातून रुखवताच्या वेळी शाब्दिक टोले मारले जातात. प्रश्नात्मक कुट पध्दतीचे उखाणेही रुखवताच्या वेळी घेतले जातात हा समाज भटका समाज असल्यामुळे त्यांना सतत गावोगावी भटकंती करावी लागते. त्यामुळे प्रादेशिक भाषेचा प्रभाव त्यांच्या भाषेवर दिसून येतो. महाराष्ट्र आणि कर्नाटकच्या सीमावर्ती भागामध्ये बोलली जाणारी भाषा, बोलीचा वापर व्यक्तीच्या नावामध्ये झालेला दिसतो.

उदा:- लिंगाप्पा, मयप्पा, तायाप्पा, यल्लमा इ. चळवळीमधून वापरली जाणारी आक्रमक, ग्रामीण आणि नागरी भाषा दिसते.

'तीन दगडाची चूल' मधील गोंधळी समाज हा सतत भटकंती करत असतो. त्यामुळे त्यांना निश्चित गावं नाही. स्वत:चे असे घर नाही. स्थिरता नाही. अनेक गावी भटकत असतात. आपली पाले, संसार डोक्यावर घेऊनच हा समाज सतत इकडून

तिकडे भटकत असतो. त्यांना तीन ते चार दिवसापेक्षा जास्त एका गावत राहता येत नाही. या भटकंतीतच जन्म, मृत्यू, अंत्यविधी व इतर विधीही पार पाडले जातात. अशा भटक्या आयुष्याची फरपट 'तीन दगडाची चूल' या आत्मकथनातून स्पष्ट होताना दिसते. एक विदारक जगण्याचं प्रभावी चित्रण या आत्मकथानातून समोर आलेले दिसते.

निष्कर्ष :

- फार कमी भटक्या समाजाच्या स्त्रियांनी आत्मकथने लिहिली आहेत.
- सतत भटकंती हा स्थायीभाव दोन्ही आत्मकथनातून स्पष्ट होतो.
- रूढी-प्रथा आणि परंपरा जीवापाड जपणारा हा समाज आहे.
- अंधश्रद्धाळू वृत्तीमुळे स्त्रियांना अनेक दुःखे भोगावी लागतात.
- भटक्या समाजातील स्त्रियांचे जीवन चित्रण प्रभावी आले आहे

संदर्भसूची :

1. जनाबाई गिऱ्हे -'मरणकळा', प्रचार प्रकाशन कोल्हापुर १९९२, पृ. १२
2. जनाबाई गिऱ्हे -'मरणकळा', प्रचार प्रकाशन कोल्हापुर १९९२, पृ. ३३
3. जनाबाई गिऱ्हे -'मरणकळा', प्रचार प्रकाशन कोल्हापुर १९९२, पृ. १७
4. जनाबाई गिऱ्हे -'मरणकळा', प्रचार प्रकाशन कोल्हापुर १९९२, पृ. १४
5. जनाबाई गिऱ्हे -'मरणकळा', प्रचार प्रकाशन कोल्हापुर १९९२, पृ. ७९
6. जनाबाई गिऱ्हे -'मरणकळा', प्रचार प्रकाशन कोल्हापुर १९९२, पृ. ८७
7. जनाबाई गिऱ्हे -'मरणकळा', प्रचार प्रकाशन कोल्हापुर १९९२, पृ. ८
8. जनाबाई गिऱ्हे -'मरणकळा', प्रचार प्रकाशन कोल्हापुर १९९२, पृ. २१
9. विमल मोरे -'तीन दगडाची चूल', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे २०००, पृ. ५९
10. विमल मोरे -'तीन दगडाची चूल', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे २०००, पृ. २
11. विमल मोरे -'तीन दगडाची चूल', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे २०००, पृ. ६६
12. विमल मोरे -'तीन दगडाची चूल', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे २०००, पृ. ३१
13. विमल मोरे -'तीन दगडाची चूल', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे २०००, पृ. १६
14. विमल मोरे -'तीन दगडाची चूल', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे २०००, पृ. ०७
15. विमल मोरे -'तीन दगडाची चूल', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे २०००, पृ. १४
16. विमल मोरे -'तीन दगडाची चूल', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे २०००, पृ. १९९
17. विमल मोरे -'तीन दगडाची चूल', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे २०००, पृ. ८१
18. विमल मोरे -'तीन दगडाची चूल', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे २०००, पृ. ८२

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

SJIF Impact Factor - 5.54

E- ISSN 2582-5429

AKSHARA

Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

November 2021, Special Issue 03, Vol. IV



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

Chief Editor : Dr. Girish S. Koli, AMRJ

For Details Visit To - www.aimrj.com

Akshara Publication

E- ISSN 2582-5429
AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal SJIF Impact- 5.54
November 2021 Special Issue 03 Vol. IV

Index

Sr.No	*Title of the Paper* & Author's Name	Pg.No
1	भटक्या विमुक्तांच्या साहित्याचे स्वरूप - प्रा. डॉ. दत्तात्रय महादेव डांगे	05
2	साठोत्तरी साहित्य प्रवाहांची सामाजिकता - डॉ.रमेश अर्जुन शिंदे	10
3	साहित्यातील भटक्या व विमुक्त जाती जमातींचे चित्रण एक अभ्यास - प्रा. दिलीप महादू कोने	13
4	भटक्या श्रमिक धनगर स्त्रियांचे साहित्य जात्यावरील ओवी - प्रा.डॉ. तानाजी ज्ञानदेव पाटील	16
5	भटक्या विमुक्तांची आत्मकथने सामाजिक वास्तवाचे प्रभावी स्वकथन - डॉ. विद्या विजय नावडकर	20
6	स्त्रीवादी साहित्यातील शोषित वंचित स्त्रियांचे चित्रण - प्रा. डॉ. ज्योती सुबराव माने	25
7	शोषित आणि वंचितांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या दलित कथावाङ्मयासमोरील आव्हाने - प्रा. मोहन चव्हाण	29
8	स्त्री जन्मा तुझी हीच कहाणी एक सामाजिक चिंतन - प्रा. स्वाती मगदूम	32
9	नव्वदोत्तरी ग्रामीण कादंबरी - प्रा. डॉ. सोनू लांडे	35
10	दलित साहित्य : काही विशेष - डॉ. सर्जेराव पद्माकर	40
11	स्त्रियांचे नियतकालिकांतील वैचारिक लेखन - डॉ. तेजस तानाजी चव्हाण	43
12	स्वातंत्र्योत्तर कालखंडातील दलित आत्मकथनाची वैशिष्ट्ये - डॉ. विजय रेवजे	47
13	डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे महिला सक्षमीकरणासंबधीचे विचार - श्री. सुहास बापू मोरे	50
14	अण्णाभाऊ साठे यांच्या फकिरा कादंबरीतील आशयविश्व व समाजदर्शन - प्रा.डॉ.सुभाष दिनकर आहेर	52
15	श्रमिक साहित्याची धगधग : नारायण सुर्वे यांच्या कविता - श्री. गौरीशंकर दत्तात्रय खोबरे	56
16	दलित आंबेडकरी चळवळीचे भाष्यकार डॉ. गंगाधर पानतावणे - प्रा. डॉ. मधुकर गणेश मोकाशी	60
17	सुनील अवचार यांच्या कवितेतील वंचित शोषितांचे चित्रण - डॉ. मगदूम बळवंत	63
18	दिनकर गायकवाड यांच्या साहित्यातील शोषित आणि वंचितांचे चित्रण - प्रा. डॉ. सुनील जगन्नाथराव निगडे	66
19	कृष्णराव भालेकर यांच्या कवितेमधील श्रमिकांचे चित्रण - प्रा. डॉ. तानाजी अंबादास देशमुख	69
20	नामयाची जनी जगण्याचा आधार : अनुभव नव्हे प्रासंगिकता - प्रा. डॉ. विशाल प्रकाश लिंगायत	73
21	'आंदकोळ' आत्मकथेमधील वास्तवदर्शन- प्रा. डॉ. संगीता पैकेकरी	76
22	'निशाणी डावा अंगठा' कादंबरीतील समस्या - प्रा. डॉ.बाबासाहेब पिरंगोंडा नाईक	80
23	'सल ' दलित काव्यसंग्रहातील समाज चित्रण - प्रा. सुहास मुरलीधर उघडे	82
24	'मरणकळा' आत्मकथनातील सामाजिक विषमतेचे चित्रण - प्रा.डॉ.कांचन विजय नलवडे	85
25	हिंदी उपन्यास साहित्य में किसानों का चित्रण- प्रा. विश्वनाथ चंद्रकांत पटेकर	88
26	भगवानदास मोरवाल का साहित्य : शोषित कृषक की दास्ताँ- डॉ. गणेश शेकोकर	91
27	हिन्दी दलित कहानियों में दलित परिवेश का चित्रण- विप्रा जनार्दन राऊल	95
28	जयप्रकाश कर्दम के उपन्यासों में दलित चित्रण ('छप्पर' उपन्यास के विशेष संदर्भ में) - डॉ. भारत श्रीमंत खिलारे	98

E- ISSN 2582-5429
AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal SJIF Impact-
November 2021 Special Issue 03 Vol. IV

10

दलित साहित्य : काही विशेष

सर्जेराव पद्माकर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, पेठ वडगाव,
ता. हातकलंगणे, जि. कोल्हापूर ४१६११२
मो. 8329812012

प्रास्ताविक

मराठी साहित्याच्या प्रांतामध्ये स्वातंत्र्योत्तर कालखंडानंतर विविध वाङ्मयीन घडामोडी घडल्या व त्यांचा परिणाम म्हणून 1960 नंतर विविध वाङ्मयीन प्रवाह उदयास आले. त्यामध्ये दलित साहित्याचा प्रवाह मान्यताप्राप्त आणि जास्त प्रभावशाली ठरला आहे. दलित साहित्य हा एक मराठी वाङ्मय प्रांतातील अत्यंत महत्त्वाचा असा स्वतंत्र प्रवाह आहे. हजारो वर्षे एका विशिष्ट वर्गाला प्रस्थापित समाजव्यवस्थेने शारीरिक आणि मानसिक पातळीवर त्यांचे अवमूल्यन करुन पशूपेक्षाही हीन पातळीवर जगणे भाग पाडले त्यांच्यावर अन्याय, अत्याचार केले, अशा समाजव्यवस्थेला त्याच्या प्रथा, परंपरा, सामाजिक आणि आर्थिक कल्पना यांना दलितांनी नाकारले व समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या तत्वांचा स्वीकार करून फुले आंबेडकरी विचार शिरोधार्य मानून दलित साहित्य मराठी साहित्याच्या दालनात अवतीर्ण झाले.

दलित साहित्याची प्रेरणा

भारतीय समाजाच्या सामाजिक क्रांतीच्या पटलावर समस्त मानवी जातीच्या कल्याणांचे समीकरण मांडणारे, त्या स्वरूपाचं तत्वज्ञान सर्वश्रूत करणारे सर्वज्ञ व्यक्तिमत्त्व म्हणून भारत नव्हे तर सर्व जग ज्या महापुरूषाकडे पाहतं ते म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर व यांच्याच विचारांची प्रेरणा ही दलित साहित्याच्या केंद्रस्थानी आहे. डॉ. आंबेडकरांनी भगवान बुद्धांचे जगप्रसिद्ध मानवतावादी तत्वज्ञान स्वतः आत्मसात केले आणि हेच तत्वज्ञान जगाला एक मार्गदर्शक तत्वज्ञान ठरू शकते हे समजून देवून ते सर्वदूर पसरविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी केलेली अनेक आंदोलने आणि चवळवळी पाहिल्या तर याचे प्रत्यंतर येते. अगदी महाडचा सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेश, किंवा धर्मांतर असो या सर्व चळवळीमागे एक मानवतावादी दृष्टीकोण व माणसाला 'महान' मानणारी जीवनप्रणाली अस्तित्वात यावी हा हेतू ठेवून बाबासाहेब अगदी शेवटपर्यंत झगडले हे वास्तव आहे. साहित्याच्या बाबतीत त्यांची भूमिका लक्षात घेताना 1952 मधील विदर्भ साहित्य संघ, नागपूर येथील मत विचार करण्यासारखे आहे. ते म्हणाले होते, "मला साहित्यकारांना आवर्जुन सांगावयाचे आहे की, उदात्त जीवनमुल्ये व सांस्कृतिक मुल्ये आपल्या साहित्यप्रकारातून अविष्कृत करा. आपलं लक्ष आकुंचित, मर्यादित ठेवू नका, ते विशाल बनवा, आपली वाणी चार भिंतीपुरती राखू नका, तिचा विस्तार होवू दया, आपली लेखणी आपल्या प्रश्नावली बंदिस्त ठेवू नका, तिचं तेज खेडयापाडयातील गडद अंधार दूर होईल असं प्रवर्तित करा, आपल्या या देशात उपेक्षितांचं, दलितांचं, दुःखितांचं फार मोठे जग आहे हे विसरू नका, त्यांचचं दुःख, त्यांची व्यथा निट समजून घ्या आणि आपल्या साहित्याद्वारे त्यांच जीवन उन्नत करण्यास झटा, त्यातच खरी मानवता आहे."1 बाबासाहेबांच्या या भूमिकेचा परिपाक म्हणजेच आजचे दलित साहित्य होय. हीच वैचारिकता, हाच बाबासाहेबांचा उदात्त हेतू प्रेरणास्थानी मानुन दलित लेखक लिहिते झाले कारण बाबासाहेब म्हणायचे 'गुलामाला त्याच्या गुलामिची जाणीव करून दया म्हणजे तो बंड करून उठेल' व निश्चितपणे बाबसाहेबांच्या प्रत्येक कृतिकार्यक्रमातून दलितांची अस्मिता, स्वाभिमान जागृत झाला व त्यातूनच साहित्यनिर्मिती झाली म्हणून बाबासाहेबांची विचारधारा हीच दलित साहित्याच्या प्रेरणास्थानी आहे हे मान्य करावं लागतं.

दलित साहित्याचे स्वरूप

'दलित साहित्य' या संकल्पनेविषयी विविध मते आहेत म्हणजे कोण आंबेडकरवादी, बौद्ध साहित्य, फुले आंबेडकरी साहित्य, बहुजन साहित्य इत्यादी नावे वापरतात मात्र उद्देश हा सर्वांचा एकच आहे. तो म्हणजे माणसाला 'माणूस' म्हणून ओळख प्राप्त करून देणारा विचार केंद्रस्थानी हवा. 'दलित' हा शब्द प्रामुख्याने गरीब, अस्पृश्य, श्रमीक, भूमिहीन, कामगार,

E- ISSN 2582-5429
AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
SJIF Impact- 5.54
November 2021 Special Issue 03 Vol. IV

शोषीत, पिडीत, नाडलेला, विकासाच्या संधीपासून वंचित, आदिवासी, स्त्रिया इत्यादी वेगवेगळ्या अर्थाने वापरला जातो. 'दलित' या संकल्पनेचे मूळ प्रामुख्याने ऋग्वेदाच्या पुरुषसुक्तात शुद्र (अस्पृश्य) हा यवणिकांचा दास आहे असे नमूद केले आहे. म्हणजेच दलित या शब्दाविषयीचे अर्थ वेदांपर्यंत घेवून जातात. डॉ. कृष्णा किरवले यांनी 'दलित संकल्पनेचा प्रारंभ प्रथम स्वीकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वृत्तपत्रीय लेखनातून झालेला असून डॉ. आंबेडकरांच्या वृत्तपत्रात हा शब्द आयोजिल्याने दलित संकल्पना त्यातूनच उदयाला आल्याचे सांगितले आहे. थोडक्यात दलित हा शब्द बाबासाहेबांनी वापरला होता व त्यांचा अर्थ या व्यवस्थेत 'जो सर्वहारा आहे असा तो' या पद्धतीने घेता यईल'.

अशा या दलित साहित्याची सुरूवात 1960 नंतर अगदी दमदारपणे झाली आहे. वेदना, विद्रोह, नकार या वैशिष्टयांनी समृद्ध असणारी ही विचारप्रणाली वैज्ञानिक व मानव्यवादी विचारांचा स्वीकार करणारी ठरते. प्रत्येक साहित्याची सुरूवात ही बव्हंशी कवितेने झाली आहे. दलित साहित्यही त्याला अपवाद नाही. नामदेव ढसाळ, ज.वि. पवार, केशव मेश्राम, यशवंत मनोहर, वामन निंबाळकर, अर्जुन डांगळे, प्रल्हाद चेंदवणकर, त्र्यंबक सपकाळे, हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार, प्रज्ञा पवार, संध्या रंगारी इत्यादी कवींनी हे काव्यदालन समृद्ध केले आहे. दलित साहित्याचा कोणताही अविष्कार हा सामुहिक अविष्कार आहे. तो या कवितेतून पुन्हा-पुन्हा जाणवतो. नवनवीन विषय, आशय आणि रचनेचे वेगवेगळे प्रयोग करताना ती माणूसपणाचं गीत गाताना दिसते. दलित कवितेनंतर संपूर्ण साहित्याच्या प्रांतात चर्चिला गेलेला साहित्यप्रकार म्हणजे आत्मकथन होय. जे भोगलं, जे जगलं तेच शब्दातून बहुतांशी त्याच पद्धतीने. प्रांजळ व तठस्थपणे मांडला गेलेला एका दुःखमय जीवनाचा प्रवास म्हणून या आत्मकथनांकडे पाहिले जाते. प्र.इ.सोनकांबळे, शरणकुमार लिंबाळे, दया पवार, माधव कोंडविलकर, रूस्तम अचलखांब, लक्ष्मण माने, लक्ष्मण गायकवाड, उत्तम बंडू तुपे, शांताबाई कांबळे, बेबी कांबळे, कुमूद पावडे, उर्मिला पवार इत्यादी अनेक आत्मकथनातून लेखकांने आपला भूत आणि वर्तमान अगदी हुबेहुब लेखनबद्ध केला आहे. या आत्मकथा लेखकांनी सर्व माणसांचं त्यातल्या त्यात दलित माणसाचं, दलित स्त्रियांचं आयुष्य किती भयावह पातळीवर जगावं लागतं याचा पट उलघडून दाखविला आहे. तत्कालीन समाज, संस्कृती, परंपरा, प्रथा आणि दलितांना भोगाव्या लागणार्या व्यथा इ.चे चित्रण येते. यातील अनेक आत्मकथनांचा जगातल्या अनेक भाषांत अनुवादही झाला आहे. एकूणच दलित आत्मकथनांनी मराठी साहित्यविश्वाला अनेक शब्द, अनुभव, मांडणी, विषय यांची विविधांगी देणगी दिली आहे. हे सर्वश्रूत झाले आहे.

दलित कादंबरीच्या क्षेत्रात तुलनेने कमी निर्मिती झाली असली तरी तीसुद्धा विलक्षण अधोरेखित करणारी आहे. नामदेव ढसाळ, केशव मेश्राम, ना. रा. शेंडे, बाबुराव बागूल शरणकुमार लिंबाळे, अशोक व्हटकर, जनार्दन वाघमारे इत्यादी लेखकांनी आपल्या जगण्याचा प्रवास लिपीबद्ध केल्याचे दिसते.

दलित नाटकाचा प्रांतसुद्धा अत्यंत प्रभावी ठरलेला आहे. दत्ता भगत, प्रेमानंद गज्वी, रामनाथ चव्हाण, प्रभाकर दुपारे, भि. शि. शिंदे, संजय पवार, टेक्सास गायकवाड, रूस्तम अचलखांब, प्रज्ञा पवार, सिद्धार्थ तांबे इत्यादी नाटककारांनी दलित नाटय विभाग प्रभावी केल्याचे दिसून येते. एकूणच साहित्याच्या सर्व प्रकारांना आपल्या लेखनितून अविष्कृत केले आहे. स्फूट लेख, समीक्षा, वैचारिक लेख इत्यादी अनेक लेखनप्रकारात प्रभावी लेखन केले आहे हे वास्तव लक्षात घ्यायला हवे.

दलित साहित्याचे विशेष

मराठी साहित्याचा वाङ्मयप्रांत ढवळताना स्वांतत्र्योत्तर कालखंड साहित्याच्या क्षेत्रात अनेकपदरी बदल करणारा ठरतो. भारतीय संविधानाने या देशातील मांडलेली 'ब्रोकन मॅन' थेअरी व 'कॉमनमॅन' ला मिळालेली माणूसपणाची श्रेष्ठता साहित्यामध्ये सुद्धा बदल करणेस कारणीभूत ठरल्याचे चित्र डोळ्यासमोर येते भारतीय संविधानाने शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण केले व खेडयापाडयात आणि वाडया-वस्तीत, झोपडपट्टीत, दारिद्रयात जगणार्या माणसाला शिक्षणाचं महत्त्व कळून चुकलं, तळा गाळातला माणूस शिकू लागला, विचार करू लागला व त्यांच्या लक्षात आलं की साहित्यातून जे लिहिलं वाचलं जातंय ते काहीच नाही. यापेक्षा माझं जीवन वेगळं आहे ते मी मांडलं पाहिजे या एका अस्मिता जाणीवेने जागृत होवून 1960 नंतर दलित साहित्याचा प्रवाह कार्यान्वित झाला व फार अल्प काळातच तो मान्यताप्राप्त झाला हे वास्तव आहे.

दलित साहित्याच्या परिघात एका विशिष्ट मर्यादित आयुष्याचंच चित्रण होतं असं नाही तर यामध्ये अनेक जाती समुहाचं चित्रण येते. दलितांसोबतच आदिवासी, भटके विमुक्त, मजुर, शेतमजूर, कामगार आणि स्त्रियांचंसुद्धा जीवनचित्रण होतं.

Dr. Ambedkar Mahavidyalaya

E- ISSN 2582-5429
AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal SJIF Impact- 5.
November 2021 Special Issue 03 Vol. IV

दलित साहित्याची व्याख्या सुद्धा हेच सांगते दलित म्हणजे कोण हे सांगताना नामदेव ढसाळ म्हणतात 'दलित म्हणजे अनुसुचित जाती-जमाती, बौद्ध, कष्टकरी जनता, कामगार, भूमिहीन शेतमजूर, भटक्या जमाती, गरीब शेतकरी, आदिवासी इत्यादी' यावरुन दलित साहित्याचा विषय हा सर्वहारा माणसाचा केंद्रवर्ती विषय असतो हे विशेष आहे. दलित साहित्यातून व्यक्त होणारे अनुभव हे वैयक्तिक न राहता ते समष्टीयुक्त बनतात कारण अनेक वर्षापासून उच्चवर्णियांकडून हा समाज अव्हेरला गेला आहे व त्याविरुद्धची मांडणी हा दलित साहित्याचा गाभा आहे. त्यामुळे बरेच अनुभव हे कमी अधिक प्रमाणात एकसारखी तीव्र भावना व्यक्त करणारे ठरतात. दलित साहित्याची व्याख्या करताना डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात, "दलित साहित्य म्हणजे मूक्तिगीत, दलित साहित्य म्हणजे आत्मशोध, दलित साहित्य म्हणजे नाकारलेल्या जीवनाचे दर्शन, दलित साहित्य म्हणजे मूल्यगर्भ जाणिवांचा नवा अविष्कार" एक अन्यायग्रस्त जीवन नाकारून एका नव्या जगण्याचा अविष्कार करणारे व करायला लावणारे असं दलित साहित्य आहे हे डॉ. पानतावणे सांगताना दिसतात.

दलित साहित्याने मराठी साहित्याला अनेक नव-नवीन परिमाणे दिलीत प्रतिके, प्रतिमा, भाषा, शब्द, वाक्प्रचार, म्हणी, उखाणे, तसेच अपरिचित व धक्क करायला लावणारे जीवनानुभव ही सुद्धा मराठी साहित्यात नव्यानेच आले आहे. विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रातील दलित जीवनपद्धती, भाषा तसेच भटक्या विमूक्तांची जीवन पद्धती, भाषा, अनुभव शिवाय भटक्या, दलित आदिवासी स्त्रियाचं जगणं, त्यांचे जीवनानुभव हे प्रस्थापित मराठी साहित्याचा कधी विषयच झाले नव्हते हे सर्व दलित साहित्याने मराठी साहित्याला दिले, आहे हे मान्य करायला हवं.

दलित साहित्याचा केंद्रबिंदू हा 'माणूस'च राहिला आहे. या साहित्याने गुलामगिरीविरूद्ध बंड पुकारले, अन्यायी व्यवस्थेला लाथाडले व समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या चतुःसूत्रीवर आधारित मानवी आयुष्य उभं ठाकण्यासाठी आपली लेखणी झिजवली म्हणून दलित साहित्याला 'माणसाचं' साहित्य, 'मानवतेचं' साहित्य म्हणून आजही सर्वत्र ओळखलं जातं हे त्याचं यशच म्हणावं लागेल. 1960 नंतर तब्बल या पाच दशकात जवळ-जवळ तीन चार पिढ्यांनी हा दलित साहित्याचा मानवतावादी साहित्यिक दृष्टीकोन सर्वदूर पसरविण्यात मोठे योगदान दिले आहे हे निश्चित.

निष्कर्ष

1. स्वातंत्र्योत्तर कालखंडात अनेक वाङ्मयप्रवाह निर्माण झाले त्यात साठोत्तरी प्रभावी प्रवाह म्हणून दलित साहित्याचा संदर्भ घेतला जातो.
2. सर्वहारा समाजाचे चित्रण करणारे साहित्य म्हणजे दलित साहित्य.
3. दलित साहित्याने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची विचारधाराच प्रेरणा म्हणून स्वीकारली.
4. दलित साहित्यामध्ये कथा, कादंबरी, कविता, नाटक, समीक्षा, आत्मकथन, स्फूट लेख, निबंध इत्यादी वाङ्मयप्रकारांमध्ये अनेक लेखकांचे विपूल लेखन आहे.
5. दलित साहित्याने मराठी वाङ्मयाला शब्द., भाषा, प्रतिके, प्रतिमा, रुपके, अनुभव इत्यादी देणगी देवून मराठी साहित्य समृद्ध करण्यात व राज्य, देशाबाहेर नेवून पोहचविण्यात महत्त्वाचे योगदान दिले आहे.

संदर्भ ग्रंथ

1. डॉ. गंगाधन पानतावणे: साहित्य प्रकृती आणि प्रवृती, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद 1999, पृ. 45.
2. डॉ. कृष्णा किरवले : दलित चळवळ आणि साहित्य, मॅजिक प्रका. पुणे, 1996, पृ.9
3. नामदेव ढसाळ : 'आम्ही' दिवाळी अंक मुंबई 1973. पृ. 77.
4. डॉ. गंगाधर पानतावणे : 'अस्मितादर्श प्रास्ताविक 15 जाने. 1974. औरंगाबाद

■ ■ ■

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

ISSN : 2231 4377
(Peer Reviewed Journal)

ब्दाली प्रकाशन
पुणे-६८

SAKSHAM SAMIKSHA त्रैमासिक

सक्षम समीक्षा

मराठी भाषा-वाङ्मय व संशोधन यासाठी असलेला मंच

संपादक : प्रा. डॉ. शैलेश विश्वनाथ त्रिभुवन

वर्ष : ११ वे अंक : चौथा
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०२२



Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

वितरण क्षेत्र : * राज्य : पश्चिम बंगाल (कलकत्ता), उत्तर प्रदेश (वाराणसी), कर्नाटक, गोवा, गुजरात (बडोदा), तेलंगणा (हैद्राबाद)
* जिल्हा : पुणे, अहमदनगर, नाशिक, मुंबई, ठाणे, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, बयतमाळ, लातूर, परभणी, जालना, औरंगाबाद, नागपूर, अमरावती, नांदेड, जळगाव, धुळे, नंदुरबार, चंद्रपूर, गडचिरोली, वाशिम

अं|त|रं|ग

*	संपादकीय (मनोगत)	प्रा. डॉ. शैलेश त्रिभुवन (पुणे)	०२
१.	व्यापक सत्तासंघर्षाचे चित्रण करणारी कथा : अस्तित्वाची शुभ्रशिडे	प्रा. डॉ. बाळासाहेब लबडे (रत्नागिरी)	०४
२.	बुद्धा इज स्माईलिंग	प्रा. डॉ. सतीश मस्के (धुळे)	०८
३.	डोळस अभ्यासयात्रा	प्रा. रमेश वानखेडे (नाशिक)	०९
४.	फुलोरा : चैतन्य सूत्रांच्या आठवणी	डॉ. श्रीपाल सबनीस (पुणे)	१२
५.	कला संस्कृतीचे उपासक: डॉ. बाबासाहेब आंबेडकर,	प्रा. डॉ. संजय शेजव (अमरावती)	१६
६.	जगदीश खेबुडकरांचे लावणी लेखन	प्रा. अनुराधा गुर्जर साळुंखे (पुणे)	१८
७.	आंबेडकरी साहित्य: समाजशास्त्रीय संशोधनाची गरज	प्रा. डॉ. प्रदीप आगलावे (नागपूर).....	२१
८.	मध्ययुगीन संत काव्य: ओवी आणि अभंग	प्रा. डॉ. संदीप रंगनाथ तापकीर (पुणे)	४१
९.	सेतु कादंबरीतील स्त्री जीवन	प्रगती रघुनाथ पोकळे (बीड)	५८
१०.	ए मॉडेल फॉर डेव्हलपिंग एटरप्रेन्योरियल स्किल्स	प्रा. डॉ. पूजा मोरे (पुणे)	६१
११.	भारतीय प्रतिभावंत महाकवी : अश्वघोष	प्रा. डॉ. प्रदीप सरवदे (मुंबई)	६३
१२.	स्त्रीलिखित वैचारिक गद्य: एक आकलन	प्रा. ज्योत्स्ना एकबोटे (पुणे)	६८
१३.	समतेचा नवा विचार : हॉटेल माझा देश	प्रा. डॉ. सर्जेराव पद्माकर (कोल्हापूर)	७५
१४.	कारवार जिल्ह्यातील चर्मकार समाजाचा इतिहास व विकास	सुधाकर जोगळेकर (बेळगांवी)	७८
१५.	जी. एं. चा पत्रव्यवहार : एक आकलन	प्रा. अपर्णा प्रवीण पांडे (पुणे)	८१
१६.	भौगोलिकता आणि लोकसाहित्य : परस्परसंबंध	प्रा. हेमंत बा. अय्या (गोवा)	८६
१७.	'जय भीम': भारतीय समाजाच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालणारा चित्रपट	प्रा. डॉ. शैलेंद्र धर्मदास लेंडे (नागपूर)	८९
१८.	झुंडमधील सौंदर्यशास्त्र!	डॉ. श्रीमंत कोकाटे (पुणे)	१०१

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

समतेचा नवा विचार : हॉटेल माझा देश



प्रा. डॉ. सर्जेराव पद्माकर
डॉ. बाबासाहेब आंबडेकर महाविद्यालय, पेठवडगाव, जि. कोल्हापूर
पिन : ४१६०१२
दूरभाष : ८३२९८१२०१२

> हीच कवीची काव्यलेखन विषयक भूमिका 'हॉटेल माझा देश'मध्ये समतेचा विचार मांडत विखुरलेली आहे.



हॉटेल माझा देश धम्मपाल रत्नाकर
समृध्दी प्रकाशन, कोल्हापूर
प्रथमावृत्ती : ६ डिसेंबर २००५
किंमत : ८०/-

धम्मपाल रत्नाकर तिसऱ्या पिढीतील दलित कवी होत. लक्तरांची गझल (१९९४) हॉटेल माझा देश (१९९२) सैतानाच्या खांबावर (२००३) असे तीन कवितासंग्रह प्रसिद्ध असून विसावा हे कवितेचे संपादनही त्यांच्या नावावर आहे. १९९२ साली हॉटेल माझा देश या नावाने प्रसिद्ध झालेल्या कवितासंग्रहात काही कवितांची भर घालून हॉटेल माझा देशची सुधारित आवृत्ती२००५ साली प्रकाशित झाली.हॉटेल माझा देशया कवितासंग्रहाचे शीर्षकापासून अर्पणपत्रिकेपर्यंत वेगळेपण जाणवते. कवीने आपला हा कवितासंग्रह हॉटेलमध्ये काम करणाऱ्या तमाम कामगारांच्या दुःखाला, वेदनेला, अगतिकतेला आणि व्यवस्थेने वेश्या बनविलेल्या बाईमाणसांना अर्पण केला आहे. तर शीर्षकाचा उच्चार केल्याबरोबर लहानपणी पांढरा शर्ट, खाकी चड्डी आणि डोक्यावर गांधी टोपी परिधान करून समूह सुरात उच्चारलेल्या "भारत माझा देश आहे, सारे भारतीय माझे बांधव आहेत" या प्रार्थनेची आठवण होते. या कवितासंग्रहाचे दोन विशेष नोंदवावे लागतील ते म्हणजे हा कवितासंग्रहातून आलेलं हॉटेल व्यवस्थेचे चित्रण आणि दुसरे कवीने या हॉटेल व्यवस्थेतून पाहिलेले नवे समतेचे स्वप्न.प्रत्येक कवीची कविता हे त्याचे आत्मचरित्र असते. धम्मपाल रत्नाकरही त्याला अपवाद नाहीत. कवीने आपले सारे शिक्षण हॉटेलात काम करून पूर्ण केल्याने या कवितासंग्रहातील धम्मपाल रत्नाकर यांच्या कविता अस्सल अनुभवाच्या कविता आहेत. "गेल्या दहा - वीस वर्षांत मराठी कविता जी नवी वळणे घेत आहे, त्याच्या काही खुणा धम्मपाल रत्नाकर यांच्या कवितेत स्पष्ट दिसतात. 'हॉटेल माझा देश' या कवितासंग्रहात बदलत्या वळणाची नोंद दिसते. हॉटेल कामगारांच्या दैन्य - दारिद्र्याच्या आणि शोषणाचे प्रभावी चित्रण करणाऱ्या या कवितेने मध्यमवर्गीय संवेदनशीलतेचे पारंपरिक संकेत तर बाजूला सारलेच, पण दलित - पीडितांच्या कवितेला नव्या मुकामावर आणून ठेवल" आहे. 'क्लिनर ते वेटरपासून ते व्यवस्थेने वेश्या बनविलेल्या बाईमाणसापर्यंत' चित्रण करणारी कवितासंग्रहातील सर्वच कविता ही हॉटेल लाईनविषयी आहे. समतेचं नवं तत्त्वज्ञान मांडणारी आहे. या सर्व कवितेच्या केंद्रस्थानी माणूस आहे. याविषयी कवी प्रस्तावनेत लिहितो की "माणूस केंद्रस्थानी असलेली माझी कविता ... माणसापासून सुरू होऊन थेट माणसाजवळच संपते आणि जिथं कविता संपते जिथूनच ती सुरू होते असे म्हणतात. माझी कविता माणसाजवळ जाऊन तिथे संपून पुन्हा नव्याने तिथूनच सुरू होते. कारण माझी कविता माणसाचं माणूसपण अबाधित राखण्यासाठी धडपडणारी आहे" हीच कवीची काव्यलेखनविषयक भूमिका 'हॉटेल माझा देश'मध्ये समतेचा विचार मांडत विखुरलेली आहे.

संपूर्ण दलित कवितेची परंपरेत तपासली तर नामदेव ढसाळ यांच्या १९७१ साली प्रसिद्ध झालेला गोलपिठा आणि धम्मपाल रत्नाकर यांचा हॉटेल माझा देश या दोन्ही कवितासंग्रहातील कविता आणि कवी यांच्यामध्ये बरेच वैचारिक साम्य दिसते. ढसाळांच्या इतकी व्यापकता, गंभीरता जरी धम्मपाल रत्नाकरांच्या कवितेत नसलीतरी वैचारिक साम्याच्या काही खुणा सापडतात. नामदेव ढसाळ यांची रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यांनो आणि धम्मपाल रत्नाकर यांची दादा, दोघीच्या कळा व विधवा शहर या कवितामध्ये हे साम्य शोधण्यासारखे आहे.

रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यांनो
तुमची
बायाना
आयबहीण

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

ठेवून झबूनवापर फेकून मारून
आजही बिटंबली जाते हाटाहाटातून[1]
(गोलपिठा. पृ. १३)

टाकणारे मालक
(हॉटेल माझा देश पृ.५५)

किंवा

रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यांनो
आता या शहराशहराला आग लावत चला![2]
पाहायचेय मला
(नामदेव ढसाळ)

हे शहर
विधवा झालेले

(धम्मपाल रत्नाकर)

कवितासंग्रहाच्या सुरूवातीला आलेली ढसाळाची कविता, कलम न झालेली अस्मिता या कवितेत आलेला ढसाळाचा संदर्भ ढसाळ आणि रत्नाकर यांचे वैचारिक साम्याचा निर्देश करते. वेश्याव्यवसाय, जातपातीवरून अस्तित्वात आलेली शोषित आणि शोषकांची ही व्यवस्था, इथले अधोवास्तव नामदेव ढसाळ यांच्या जून १९७१ मध्ये प्रसिद्ध झालेल्या गोलपिठातून जरी काही अंशी वाचक भेटीला आले तरी संबंध हॉटेल लाईन धम्मपाल रत्नाकर यांच्यामुळे मराठी वाचकांना ज्ञात झाली. हे धम्मपाल रत्नाकरांचे मराठी कवितेला लाभलेलं योगदान आहे.

कवीने या कवितासंग्रहातील पानापानावर शोषित आणि शोषक ही संबंध व्यवस्था मांडली आहे. ही व्यवस्था मांडून कवी थांबत नाही तर किबंहुना 'हॉटिलातील समतेसारखी सर्वत्र समता प्रस्तापित व्हावी' हे कवीचे ध्येय आहे. या दृष्टीने या संग्रहातील 'हॉटिल माझा देश' व 'टॉवेल' या कविता विचारात घेण्यासारख्या आहेत.कवी म्हणतो.

मी निर्माण करतोय
एक नवा देश
समतेचं शुभ वस्त्र पांघरलेला (पृ.२)

यापुढे जाऊन कवी लिहितो...

हा देश हॉटिल बनवायचाय मला
जिथं नसते जात
जिथं नसतो धर्म
जिथं नसतो पंथ
फक्त असतात माणसं
त्या माणसांचा देश
हॉटिल माझा देश
हॉटिल माझा देश (पृ.३)

कवीला नेहमीच हॉटिलविषयी आकर्षण आहे. कारण इथं जातपात अस्तित्वात नाही. कवीचा हाच समतेचा विचार या संग्रहातील टॉवेल या कवितेत व्यक्त होतो.

बाँश बेसिनच्या स्टील नळीवर लटकणारा
सेवाभावी टॉवेल
जात – पात न मानता
शोषून घेतो हरेकांची घाण (पृ.८)

अशी टॉवेलसारखी घाण शोषून घेणारी माणसं साऱ्या दिशांना जन्मावी असे कवी वाटते. कारण इथल्या व्यवस्थेनं काळानुरूप माणूस नाकारण्यासाठी वेगवेगळ्या संकल्पना, संकेतावली जन्माला घालून माणूस नाकारला आहे. पूर्वी खालच्या जातीचा माणूस म्हणून माणूस नाकारला जात होता. आता एड्स, कुष्ठरोग, कर्करोग यासारखे आजार झाले म्हणून माणूस नाकारला जातोय. यामुळे कवी दु:खी होतोय. माणसानं माणसाच्या जातीपेक्षा माणूस म्हणून प्रेमाच्या साऱ्या सीमा उधळून लावून मनापासून एकमेकावर प्रेम करावं अशी कवीची इच्छा आहे. असाच एक प्रेमाच्या साऱ्या सीमा उधळून कवीवर प्रेम करणाराबारमन मित्र कवी इथं रेखाटतो.कवी जेव्हा आपली जात आपल्या बारमन मित्राला सांगतो तेव्हा बारमन मित्रही रागवतो.आणि म्हणतो...

जात न पूछो दोस्त की
पूछो उसका प्यार (पृ.२४)

हॉटिल व्यवस्थेचा घटक असणारा, मित्राच्या जातीपेक्षा त्याच्या स्वभावावर प्रेम करणारा बारमन मित्र. खरा माणूस होता. अशी ही बारमनसारखी हॉटिलमधील माणसं समताभाव जपणारी, माणसाशी माणसासारखं वागणारी आहेत आणि कवीला त्याचा अभिमान आहे कारण या हॉटिल व्यवस्थेतील किचनरूमपासून स्टाफरूमपर्यंत आणि

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

बाथरूमपासून मुतारीपर्यंत समता नांदत असते....

हॉटेल लाईन एक देश : सार्वभौम ऐक्याचा
हॉटेल लाईन एक राष्ट्र : सार्वभौम माणसाचं (पृ.९२)

कवीची ही समता हॉटेल कामगारापूरती मर्यादित न राहता हॉटेलमध्ये गिऱ्हाइक म्हणून येणाऱ्या माणसांना इथ घरच्या व्यक्तीसारखी प्रेम मिळतं.

बिघडलं बिस्कटलं
तुटलं फाटलं
गोळ्या औषध सूईदोर होणारी
हॉटेलची माणसं (पृ.३३)

म्हणून स्टॅअर्ड जॉन स्वत:चे कुटुंब अपघात गेल्यावर हॉटेलच्या आश्रयाला येतो. वर्ग विरहीत, वर्ण विरहीत समाजनिर्मिती हे कवीचे स्वप्न आहे. याबाबतची आणखी एक नोंद म्हणजे "तिसऱ्या पिढीचे नेतृत्त्व करणारी धम्मपाल रत्नाकर यांची कविता ही दलित जाणिवेच्याही पुढे गेलेली आहे. तिचा केंद्रबिंदू माणूस आहे. म्हणून खऱ्या अर्थाने महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानाला पचवून ती बुद्धत्त्वाकडे निघालेली आहे. म्हणून ही कविता फुले - आंबेडकरी प्रेरणेची कविता आहे. कवी धम्मपाल यांची कविता ही दुसऱ्या पिढीतील दलित कवितेसारखी आक्रमक विद्रोह पुकारत नाही. तर या कवितेतील विद्रोह हा चिंतनाच्या पातळीवर आत्मभान शोधत येतो. त्यामुळे जहाल वाटत नसला तरी त्याची तीव्रता कमी आहे असे नाही." ती आपल्या मर्यादेच्या कक्षेत समतेची स्वप्न पाहणारी आहे.माणसाने माणसासारखे वागावे ही कवीची अतिव इच्छा आहे. भले ती या व्यवस्थेतील स्त्री असली तरी तिलाही तितकीच समतापूर्ण मानवतेची वागणूक मिळायला हवी. म्हणून कवी एका कवितेत लिहतो 'स्त्रीला गुलाम बनविणाऱ्याच्या विरोधी मी'.(पृ.५२) त्याच्या दृष्टीने कुठल्याही क्रांतीचं स्वप्न पाहणं वावग नाही. आपण स्वप्न पाहावीत आणि ती आपल्या मर्यादित पूर्ण करण्यासाठी धडपड करावी. असे कवीला वाटते. मग त्यासाठी कधी ज्यांनी जाती पातीची व्यवस्था रूजवली, वर्गवारी निर्माण केली त्या भांडवलदारांना शिव्या देतो तर कधी कवी फक्त शिव्या देऊन थांबतो, कृतीही करतो.

कवीची क्रांतीची स्वप्ने वाझं नाही म्हणून त्याला फक्त काठावर उभे राहून पाणी ढवळणारे, माणसाच्या अस्मितेला मारणारे यांची चीड येते आहे.

सरकार
कुणाचीही माय वाचवू शकते
किंवा कुणाचीही माय झवू शकते (पृ.६७)

किंवा

एकात्मतेच्या वावड्या उडविणारा हा देश
संतती नियमनांशी समागम करून
विषमतेची पिलावळ पसरवणारा हा देश
जात धर्म पंथ यांना
स्तनासारखं जपणारा हा देश (पृ.९१)

असाच कमालीचा उपरोध खेड्यावर येणाऱ्या नंदीबैलवाल्याच्या माध्यमातून जागतिकीकरणाच्या संदर्भातील तिखट प्रतिक्रिया हॉटेल ग्लोबल इंडिया :१ व हॉटेल ग्लोबल इंडिया :२ या कवितेतून देतात. या देशातले जातपात विरहीततेच स्वप्न किती तकलादू आहे यांचा प्रत्येय या दोन्ही कविता वाचताना येतो.

मावशी व माणसाजवळ जाणं या कविता समतेच तत्त्वज्ञान मांडणाऱ्या आहेत. स्व-कष्टाने, अनेकदा दुसऱ्याच्या सहकार्याने माणसं मोठी होतात आणि आपली मागची परिस्थिती विसरून जातात. आपल्या घरच्यानाही विसरून जातात. पण हॉटेल व्यवस्थेतला कामगार तसा नाही. जरी त्यांची परिस्थिती बदलली तरी तो मागच्या लोकांची ओळख विसणारा नाही. यांचा प्रत्येय व्हय लेक्रा कवितेतून इथली मावशी कवीशी जो संवाद साधते आहे त्यातून येतो.

व्हय लेक्रा
तू वळख दाखीवतूस माणसाला
असावी वळख अशीच
माणसाची माणसाला (पृ.२९)

किंवा हॉटेल लाईनीत वेश्या आणि इथले यांचा संबंध अपरिहार्य असूनही. इथं येणारी वेश्या ही अनेकांच्या दृष्टीने भोगदासी असली तरी हॉटेलच्या कामगारांच्या दृष्टीने ती त्यांची बहीण असते.पोटं भरणारी असते. इतकी इथं समता आहे. वेश्या आणि हॉटेल कामगार यांच्या संबंधाबाबत शंका घेणाऱ्याविषयी कवी लिहितो..

सगळ्या वेश्याबाया मला
दादा म्हणायच्या
अन् मी त्यांना ताई
भाऊ कधी बहिणीसंग पान नं. ८० वर

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

ISSN- 2349-638x

Impact Factor 7.149

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

Peer Reviewed and Indexed Journal

Special Issue
Natural Resources and Sustainable Development

29th July 2021

Special Issue - 95

Chief Editor:
Mr. Pramod P. Tandale

Executive Editor
Dr. Arjun Rajage
Principal
Rajarshi Shahu Arts and Commerce College, Panhala
Tal-Panhala, Dist-Kolhapur (Maharashtra, India)

Co-Editor
Dr. V. B. Desai
Dr. A. S. Patil
Shri. A. A. Bulle
Dr. K. A. Shinde

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

Principal,
Babasaheb Ambedkar Mahavidyalaya
Maharashtra

No part of this Special Issue shall be copied, reproduced or transmitted in any form or any means, such as Printed material, CD – DVD / Audio / Video Cassettes or Electronic / Mechanical, including photo, copying, recording or by any information storage and retrieval system, at any portal, website etc.; Without prior permission.

Aayushi International Interdisciplinary Research Journal

ISSN 2349-638x

Special Issue No.95

29th July 2021

Disclaimer

Research papers published in this Special Issue are the intellectual contribution done by the authors. Authors are solely responsible for their published work in this special Issue and the Editor of this special Issue are not responsible in any form.



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

115.	Mali H.H. and Magare S.R.	Study of Diversity of Freshwater Molluses from Dried water reservoirs in Taloda Tahesil District Nandurbar (MS) India.	447
116.	Mr.Rahul Namdev Bhaskar Mr.Sachin Prabhakar Kamat	Nature In Lord Of The Flies	450
117.	डॉ. सर्जेराव पवाकर	मराठीतील निसर्ग कविता	1
118.	डॉ. शर्मिला अशोक सावळे	नवी मुंबईचे शिल्पकार-- वसंतराव नाईक	4
119.	प्रा.प्रदीप सावंत	महाराष्ट्रातील कृषी विकास व शासकीय धोरण	7
120.	डॉ.प्रकाश आप्पासो हुलेनवर	'वनगरवाडी'कादंबरीतील 'लोकजीवन' आणि 'निसर्ग'परस्पर संबंध	13
121.	डॉ.संजीव कोळपे	वातावरणातील बदल आणि भारतीय शेती : एक चिकित्सा	16
122.	डॉ. साळवे संदिप गोरख	अनुसूचित जाति के छात्रो के पिता कि व्यावसायिक और शैक्षिक स्थिती स्थिती का अध्ययन	21
123.	डॉ. गिरीश मोरे	मध्ययुगीन मराठी साहित्यातील निसर्गतत्त्व	24
124.	प्रा.डॉ.सुनील लोखंडे	नैसर्गिक साधन संपत्तीचे संरक्षण	28
125.	प्रा. सुरेश जोति पाटील	पर्यावरण आणि शाश्वत विकास	31
126.	Dr.Prakash Pawar	पर्यावरणीय बदलांचा कृषीक्षेत्रावर होणारा प्रभाव	35
127.	प्रा.डॉ. संतोष तुकाराम कदम	शिक्षणातून सामाजिक परिवर्तन करणारा द्रष्टा शिक्षणतज्ञ : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे	39
128.	प्रा. डॉ. लक्ष्मी दादासो भोसले	देशभक्त रत्नाप्पा कुंभार यांचे स्वातंत्र्य चळवळीतील आणि सहकार चळवळीतील कार्य	43
129.	डॉ.श्वेता एन.दवे	जीवन पद्धति	47
130.	डॉ. गोदावरी आत्माराम गोरकर	चंद्रपूर जिल्हा: तालुकानिहाय लोकसंख्या घनतेचा अभ्यास	54
131.	केदार सुदामराव गरड	शाश्वत विकास आणि भारत	58
132.	प्रा. रमेश कचरू शिंदे	शाश्वत विकासासाठी शाश्वत शेतीची गरज	63

मराठीतील निसर्ग कविता

डॉ. सर्जेराव पडावकर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,पेठ वडगाव, जि. कोल्हापूर.

मराठी वाङ्मयाच्यायशस्वितेचा विचार करता या साहित्यातील अनेकविध कंगोरे दृष्टीक्षेपात येतात. अगदी प्राचीन काळापासून या मराठी वाङ्मयाने यशाची अनेक दालने आपल्या स्वतःच्या अंगभूत वैशिष्ट्यांनी समृद्ध केली आहेत हे सर्वांना ज्ञात आहे. भाषेतील माधुर्य, तिची सहजता हेच तिचे सौंदर्य व याच तिच्या वैशिष्ट्यांमुळेच अनेक समृद्ध भाषांपैकी एक भाषा झाली आहे. या मराठी वाङ्मयाच्या सुरुवातीच्या कालखंडामध्ये ज्या साहित्य प्रकारातून वाङ्मय निर्मिती झाली तो म्हणजे कविता मराठीतील सर्व माहिती, उपदेश, तत्वज्ञान, मार्गदर्शन हे पद्यमयरूपातच सांगितल्या जात होते. पुढे तर साहित्याच्या विविध कला प्रकारांचा विकास होत गेला, त्यामध्ये कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, प्रवास वर्णन, लघु निबंध, व्यक्ती लेख इत्यादी वाङ्मयप्रकार निर्माण झाल्याचे दिसून येते. मात्र मराठी वाङ्मय विस्तार पावले ते सर्वप्रथम काव्याच्या रुपानेच हे मात्र मान्य करावेच लागते.

मराठी कवितेच्या या विकास प्रवासात अनेक प्रकारच्या विषयांची मांडणी करण्यात आली आहे. तथापि या विविधांगी विषय मांडणीमुळे सुद्धा कविता विस्तृत आणि यशस्वी झाली आहे. प्रत्येक साहित्याचा केंद्रबिंदू हा माणूसच राहिलेला आहे. आणि त्याच्या सभोवतालच्या अनुभवविश्व आता प्रत्येक साहित्याचा विषय झालेला आहे आणि म्हणून अनेक विषयांपैकी या सृष्टी मध्ये ज्या निसर्गाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे अशा निसर्ग कवितेचा विषय न होईल तरच नवल?

आपल्या लहानपणापासूनच निसर्गाशी निगडीत असणाऱ्या कविता मात्र प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे त्यातील आशय हा तुमच्या-माझ्या जीवनाचा म्हणजेच मानवी जीवनाचा भाग झाल्याचे दिसून येते.मग त्यामध्ये 'नाच रे मोरा आंब्याच्या वनात, अरे खोप्यामधी खोपा, सुगरणीचा चांगला, हिरवे हिरवे गार गालिचे, हरित तृणाच्या मखमालीचे, गार गार वारा, अंगावर शहारा, गारवा... अंगावर भिर-भिर करी पारवा..... इत्यादी. अनेक कविता निसर्ग आणि माणूस यांच्यातीलपरस्परसंबंधांचे शब्द चित्र आणि त्यामधूनच भावना, विचार आणि तत्त्वज्ञान अभिव्यक्त करताना दिसतात. कमल मराठी कविता निसर्ग यांचे नाते अनन्य साधारण आहे.

जगाचा पोशिंदा म्हणून ज्याच्याकडे बघितले जाते असा माणूस मधील शेतकरी, या शेतकऱ्याचे आणि निसर्गाचे नाते जास्त प्रमाणात जुळते म्हणजे इतर सर्व माणसांच्या तुलनेत शेतकरी हा निसर्गाच्या जास्त सान्निध्यात असणारा व ते एकमेकांचा परस्पर भाग असणारा असा प्रकार दिसून येतो त्याचे वर्णन करताना ना. धो. महानोर म्हणतात-

'या शेताने लळा लाविला असा असा की,
सुख दुःखालापरस्परांशी हसलो-रडलो,
आता तर हा जीवन अवघा असा जखडला,
मी त्याच्या हिरव्या बोलीचा शब्द जाहलो.'१

शेतकरी आणि निसर्ग यांच्यातील अतूटपणा (नात्याचा) कवी या ओळीतून स्पष्ट करताना स्वतः हिरव्या बोलीचा शब्द झालो, हे सांगून स्वतः ची या निसर्गाशी असणारा घट्ट नातं सहज बोलून जातो. हे यावरून दिसून येते. या शेतकरी आणि निसर्गाच्या नात्याचं वर्णन करताना पुन्हापुन्हा वर्णन येते ते पावसाचं. कारण शेती आणि पाऊस या दोन गोष्टी शेतकरी आणि निसर्ग त्यांच्या नात्यातील सातत्य टिकवून ठेवतो. शेतकरी हा गरीब माणूस तो कुणाचेही वाईट चिंतित नाही त्याला खोटे बोलणे, 'फसवेगिरी अथवा विविध बागणे जमत नाही आणि म्हणून त्याच्या या गोष्टीचा गैरफायदा व्यवस्था आणि परिस्थिती घेत असते, त्यामुळे तो उध्वस्त होत चाललेला आहे मात्र त्याकडे कोणाचेही लक्ष नाही. दासू वैद्य एका कवितेत म्हणतात –

'लांब टाळ-मृदुंगाच्या गजरात,
पंढरपुराकडेनिघालेली दिंडी
आणि इथ काळ्या शेतात
मरून पडलेला हिरवा पाऊस'२

या चार ओळीतील शेवटची शेतकऱ्यासाठी वापरलेली बोलकी प्रतिमा शेतकऱ्याच उध्वस्त झालेलं आयुष्य आपल्या डोळ्यासमोर आणताना दिसते. तरीही माणूस नावाचा प्राणी हा आशावादी आहे त्यामुळे शेतकरी सुद्धा जास्त आशावादी आहे, कारण त्याचे संपूर्ण जीवन म्हणजेच शेती संबंधी हे निसर्गावर अवलंबून असल्याने तो निसर्गाविषयी जास्त आशावादी असतो.ललित अन्वये हा त्याचा आशावाद व्यक्त करताना म्हणतात.

'फेकलातरी पुन्हा एक
नवा पाऊस पडेल

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

Special Issue Theme :-Narural Resources and sustainable Development (Special Issue No.95)
ISSN 2349-638x Impact Factor 7.149 29th July 2021

'कालचा पाऊस आमच्या गावात
अलाच नाही
सदरहू पीक आम्ही आसवांवर
काढले आहे.'७

निसर्गसुद्धा कधी कधी त्याच्या लहरीप्रमाणे वागतो आहे की काय असे वाटते. कारण पावसाचाच विचार केला तर तो एका ठिकाणी बरसत जाईल असा बरसतो सर काही ठिकाणी त्याचा दर्शन सुद्धा दुर्लभ असतं. दुष्काळी भागात पाऊस नाही मग आम्ही शेती पिकवायची कशी? या विदारक अवस्थेचे चित्रण कवी यशवंत मनोहर वरील कवितेतून अभिव्यक्त करताना दिसतात.

थोडक्यात या निसर्गातील एक सजीव घटक म्हणून माणसाकडे बघितले जाते त्यामुळे माणसाने आपल्या बुद्धीच्या जोरावर अनेक प्रगतीची शिखरे गाठली आहेत. त्याच्या सर्व कृती -उक्तीचं प्रकटीकरण करण्याचं माध्यम म्हणजे साहित्य आहे. या साहित्यातून त्याने निसर्ग आणि आपल्या नात्याचा एक अनुबंध शब्दबद्ध केल्याचे दिसते.

निष्कर्ष-

१) निसर्ग हा मानवी जीवन प्रवाहित करणारा आहे.
२) माणूस आणि निसर्ग यांचे अतूट नाते आहे.
३) वाङमयाच्या सर्व प्रकारातून निसर्ग वर्णन येते.
४) मानवी जीवन हे निसर्ग प्रतिमांमधून अधिक अधिक प्रभावीपणे प्रवाहितहोताना दिसते.
५) सुख,दुःख, समस्या,मानवी मन ,भावना,विचार,प्रेम इत्यादी विषय निसर्गातील प्रतिमांद्वारे मराठी कवितेतून आलेले आहेत.

संदर्भ-

१) रानातल्या कविता - ना.धो.महानोर
२) तूर्तास - दासू वैद्य
३) कुणची बाप - ललित अधाने
४) हिरवे ऋतू उतरुन - मोतीराम कटारे
५) काही उन्हातले काही वनव्यातले - अविनाश बनसोडे
६) उत्थान गुंफा - यशवंत मनोहर

Principal,
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya
Peth Vadgaon, Dist. Kolhapur, Maharashtra

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्‌मानित त्रैमासिक

शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025
(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)
वर्ष दहावे : अंक पंचवीस - सव्वीसावा
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, एप्रिल-मे-जून २०२१

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार" -
शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित
पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव
• Accredited B++ with CGPA 2.76 by NAAC • ISO 9001:2015 •
ता. तासगाव, जि. सांगली



लोकसंस्कृतीची आविष्कार रूपे



लोकसंस्कृतीचा प्रयोगरूप आविष्कार: गोंधळ	माणिक नामदेव बनकर	४२४
लोकसाहित्य – संकल्पना, स्वरुप व व्याप्ती एक दृष्टिक्षेप	सुवर्णा रामचंद्र शिंगाडे	४२८
लोकसाहित्या प्रयोग आविष्कार : तमाशा	डॉ. चंद्रकांत शंकर कांबळे	४३१
लोकसंस्कृतीतील स्त्रियांची समृद्ध लोकगीतगंगा	दादासाहेब ईश्वर गायकवाड	४३५
लोकसाहित्याचे संशोधन : स्वरूप व व्याप्ती	डॉ. डी. आर. गायकवाड	४३९
लोक नाट्य तमाशा : लोकल ते ग्लोबल	गुंडोपंत पाटील	४४३
तमाशा कलावंतांचे सामाजिक जीवन आणि संस्कृती	डॉ. सुनील चंदनशिवे	४४८
लोकसंस्कृतीचे उपासक–वाघ्या–मुरळी	डॉ.प्रशांत गायकवाड	४५१
तमाशाचे बदलते स्वरूप	डॉ. नितीश पांडूरंग सावंत	४५५
लोकसाहित्य एक कला प्रकार : उखाणा	डॉ. शर्मिला घाटगे	४५९
लोककथेची निवेदन तंत्रे	डॉ. सुरेश बा. शिंदे	४६२
बंजारा समाजाचे लोकगीतातून प्रकट होणारे संस्कृती दर्शन	भारतबाई भिमराव पवार	४६५
लोकसंस्कृतीचा आविष्कार: स्त्री गीते	सचिन पोपट सवने	४७२
लोकसाहित्यातील विविध संप्रदाय आणि संशोधन	साधना सुखदेव जाधव	४७९
लोकव्यवहारातील लोकसमजुती	डॉ. सर्जेराव पद्माकर	४८३



ISSN No. 2319-6025

लोकव्यवहारातील लोकसमजुती

डॉ. सर्जेराव पदमाकर
डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय
पेठ वडगाव. जि. कोल्हापुर.

प्रास्ताविक

मराठी साहित्याच्या वाङ्मयीन प्रवाहाचा विचार करताना अनेकविध विचारव्युहांचा अंतर्भाव झाल्याचे निदर्शनास येते अर्थात साहित्यांचा केंद्रबिंदू हा माणूस आणि त्याच्या सभोवतालचे जीवनव्यवहार हाच असतो. त्या अनुषंगानेच साहित्याचे भरण-पोषण होत असते तथापि साहित्यामध्ये लिखित साहित्य आणि मौखिक साहित्य असे प्रकारही निदर्शनास येतात त्यामध्ये ललित आणि ललितेतर साहित्य हे लिखित साहित्यामध्ये येते आणि मौखिक साहित्याचा विचार करता लोकसाहित्य हे यामध्ये प्रामुख्याने महत्त्वाचे मानले जाते

लोकसाहित्य म्हणजे काय व त्याचे महत्व

लोकसाहित्याचा विचार करताना मौखिक साहित्यातील अत्यंत प्रभावी साहित्यप्रकार म्हणून लोकसाहित्याचा विचार केला जातो. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हे साहित्य प्रभावीपणे संक्रमित होत असते. समुहमनाचा अविष्कार करणारा उत्कृष्ट साहित्य म्हणून ही लोकसाहित्याचा संदर्भ घ्यावा लागतो. विविध श्रद्धा,परंपरा, नीतीकल्पना, रूढी, व्रतवैकल्ये,सण,समारंभ, चालीरीती इत्यादी. अनेक मानव्यपातळीवरील मनोरंजन आणि उदबोधनस्तरावरील कलाव्यवहार म्हणूनही लोकसाहित्य सर्वपरिचित आहे. मॅक्झिम गॉर्कीचे लोकसाहित्या संबंधी मत अत्यंत सूचक आहे ते म्हणतात- ङ्ककोणत्याही राष्ट्रातील समाजाचे जीवन तपासून घ्यावयाचे असेल तर त्या राष्ट्रातील लोकवाङ्मय अभ्यासले पाहिजेङ्घ. गॉर्कीच्या या निरीक्षणावरून लोकसाहित्याचे महत्व प्रकर्षाने जाणवते. म्हणजेच समूहमनाचा पर्यायाने समाजमनाचे प्रतिबिंब अधोरेखित करणारा वाडमयप्रकार म्हणजे लोकसाहित्य होय. ह्या लोकसहित्याचा उदगमबिंदु हा आदिवासी आणि अस्पृश्य समाज हा आहे असे लोकसाहित्याचे अभ्यासक शरद व्यवहारे सांगताना दिसतात ते म्हणतात. म ङ्कलोकसाहित्याचा पहिला ध्वनी स्फुरला तो आदिवासींच्या मुखातून असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. जाती-जमातीचे मूळचे दोन स्तर होते. ते म्हणजे आदिवासी किंवा वन्य आणि अन्त्यज किंवा अतिशूद्र होय.लोकसाहित्याचा उदगम याच जाती - जमातीत झाला. लोकसाहित्य धनाचे तेच खरे वारसदार होत.लोकसाहित्याच्या या जनकांनी प्राचीन जीवनविशेषांचे आणि संस्कृतीचे अबाधित्व राखलेङ्घ.लेखकाच्या या विवेचनातुन सुरुवातीचे संस्कृतीवाहक म्हणून

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

आदिवासी आणि अस्पृश्यांना विशेषत्वाने सहभाग अधोरेखित करावा लागतो. लोकसाहित्य अनेकविध कला,नृत्य,संगीत,कथा,गिते,म्हणी,उखाणे,भारुडे इत्यादी. कथात्म तसेच काव्यात्म गोष्टींचा अंतर्भाव केला जातो. पूर्वापार चालत आलेल्या मानव्यव्यवहाराचे प्रतिबिंब या सर्व लोककला प्रकारातून अविष्कृत होताना दिसते.विविध रूढी,प्रथा,परंपरा,संकेत,प्रतिके, समजुती,श्रद्धा-विश्वास इत्यादी अनेक मानवी जीवनव्यवहारसदृश्य गोष्टींचे दर्शन वा लोकसाहित्यातून पहायला मिळते.थोडक्यात आपल्या प्राचीन संस्कृतीचे कमी-अधिक प्रमाणात स्मरण होते असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. यासंबंधी डॉ. शरद व्यवहारे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उद्गार अधोरेखित केलेले आहे. ते पुढीलप्रमाणे-ङ्कलोकसाहित्य ही आमच्या संस्कृतीची संपत्ती आहे.व तिचे जतन व संवर्धन आम्हाला केले पाहिजे. ती तर अत्यंत प्राचीन काळापासून हृदयपुर्वक सांभाळून ठेवलेली मुल्यवान ठेव आहे.ङ्क बाबासाहेबांच्या या विधानावरून लोकसाहित्य म्हणजे प्राचीन संस्कृतीचा उत्तम ठेवा आहे. असे म्हणावे लागते यावरून लोकसहित्यांचे महत्व अधोरेखित होताना दिसते.

लोकव्यवहार आणि लोकसाहित्य-

लोकसाहित्य या शब्दातच मलोकफ हा आहे. अर्थात तो मत्रेश्रज्ञङ्क या इंग्रजी शब्दावरून जरी आला असला तरी लोकांचे दैनंदिन जीवनव्यवहारांचे अवलोकन प्रतिबिंबित करणारे म्हणूनच लोकसाहित्याकडे पाहिले जाते. माणूस जगत असताना त्याच्या अवती भोवती व त्याच्या बाबतीतसुद्धा घडणाऱ्या मानव्यव्यवहाराचे स्पष्टीकरण कमीअधिक प्रमाणात लोकसाहित्यातून दृगोच्चर होत असते अर्थात यामध्ये बहुतांशवेळा समुहमनाचा अविष्कार होताना दिसतो मात्र लोकांचे जीवनव्यवहार त्यांच्या बाबतीत घडणाऱ्या सर्व घटना प्रसंगाचे, सुख-दुख, श्रद्धा - संकेत, प्रतिक, प्रतिमा,निती,भ्रम, सत्य, माया, प्रेम, भावना, विचार, मन इत्यादी त्यांच्या बाबतीतील रोजचा लोकव्यवहार जो घडतो आहे त्याचे दार्शनिक मूल्यमापन म्हणावे असा प्रवास लोकसाहित्यातून घडत असतो. यामुळे लोकसाहित्याचा आणि लोकव्यवहाराचे अतूट असे नाते आहे अन हे वास्तव आहे ते नाकारून चालत नाही. लोकजीवनाचा म्हणजेच परंपरागत चालत आलेल्या लोकजीवनाचा अविष्कार म्हणजेच लोकसाहित्य असते हे सर्वमान्य झाले आहे.

लोकसमजुती

माणूस हा भावनिक आणि वैचारिक असा प्राणी आहे अर्थात तो भावनिक जास्त आहे याची कारण हि त्याच्या आयुष्यात घडणाऱ्या विविध घटना प्रसंगाचे परिणाम त्याच्या मन: पटलावरती होत असतात व त्याचाच परिणाम म्हणून त्याच्यामध्ये होणाऱ्या हालचालीद्वारे त्याचे होणारे वर्तन त्याला प्रवाहीत करीत असते. असे हे मानवी जीवन ज्याला आपण लोकजीवन म्हणतो ते विविध बाबींनी युक्त असे आहे, ते जसे सरळ आहे तितकेच ते व्यामिश्रसुद्धा आहे. असे हे लोकजीवन वरती उल्लेख केल्याप्रमाणे अने

ISSN No. 2319-8125

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University

रूढी, प्रथा, श्रद्धा, इत्यादीने व्यापलेले आहे त्यामध्येच लोकसमजुतींना महत्व असल्याचे दिसते. हे लोकसमज विविध प्रकारचे आहेत. विविध जाती धर्मानुसार सुद्धा याचे स्वरूप वेगळे आहे अर्थात हा प्रथ, आचार-विचार आणि श्रद्धेचा भाग म्हणून हे दैनंदिन व्यवहारात इतके रूढ झाले आहेत की त्यांच्याकडे बघताना कोणताही वेगळा विचार मात्र मनात येत नाही अशा विविध लोकसमजुती लोकजीवनात आपलं स्थान पक्क करून बसलेल्या दिसतात. या लोकसमजुती लोकजीवनामध्ये विविधप्रकारच्या आहेत त्यांचा अभ्यास पुढीलप्रमाणे.

दृष्टीबाधा विषयक लोकसमजुती

दृष्टीबाधा होणे म्हणजे कोणाची तरी दृष्ट लागणे लहान मुलं, सुंदर नववधू, सुंदरी, प्राणी इत्यादींना दृष्टीबाधा होऊ शकते असा लोकसमज गेल्या अनेक कालखंडापासून आताच्या विज्ञान युगातसुद्धा रूढ आहे. उदा. लहान मूल आजारी पडल्यास, गाय, म्हैस, शेळी इत्यादी प्राण्यानासुद्धा दृष्टीबाधा होते. इतकेच नव्हे तर इमारतींना सुद्धा दृष्टीबाधा होते अशा लोकसमजुती आहेत व त्या आजही बऱ्याच ठिकाणी मानल्या जातात हे वास्तव आहे यावर उपायसुद्धा आहे उदा. लहान मुलांना दृष्ट लागू नये म्हणून काजळ लावणे, गळ्यात काळा दोरा किंवा केसाळी बांधणे, लिंबू, अंडी, कोंबडी, ओवाळून टाकणे इत्यादी उपाय करतात शिवाय दृष्टीबांधा फडयांने,केरसुनीने किंवा खेटराने काढली जाते असा समजही लोकजीवनात रूढ असलेला दिसतो.

शुभ-अशुभविषयी लोकसंस्कृती

माणुस हा प्राणी सुख-दुःखाच्या साखळीतून आपला जीवंनप्रवास गतिमान करणारा प्राणी म्हनुन ओळखला जातो. अर्थात प्रत्येक माणूस हा सुखासाठीच धडपडत असतो हे वास्तव आहे. म्हणून आपल्या आयुष्यात नेहमी शुभच घडावे अशा प्रकारची मनिषा तो नेहमी बाळगत असतो. त्यावरून त्याने काही शुभ व अशुभ अशा समजुती तयार केल्या आहेत व त्यासोबत तो आपला जीवनप्रवास व्यथीत करताना दिसतो. उदा. झोपेत हसणे, मांजर आडवे जाणे, रात्रीचे घुबड ओरडणे, पाल अंगावर पडणे, कुत्रे दारासमोर रडणे, टिटवी ओरडणे इत्यादी त्याने अशुभ संकेत मानले व यासोबतच मुंगसाचे तोंड दिसणे, झोपेत रडणे, पाचचा आकडा, पिंपळाची झाडाची पूजा, शिवाय घुबडाला उम्बरठयात पुरल्यास समृद्धी इत्यादी त्याने शुभ संकेत मानलेत व या संकेतानुसारच तो कमी-अधिक प्रमाणात आपल्या मनाची समजुत घालूनच आपल्या आयुष्यात घडणाऱ्या गोष्टीकडे तो पाहत असताना दिसतो.

मसणजोगीविषयक लोकसमजुती-

मसणजोगी ही एक जमात आहे. तिच्या नावामध्येच स्मशानाचा संदर्भ येताना दिसतो. अर्थात माणूस हा आपल्या संपूर्ण आयुष्यात एकाच गोष्टीला घाबरतो ती म्हणजे

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

मृत्यू, आणि हा मृत्यू झाल्यावर जिथे प्रेत जाळतात ती स्मशानभूमी, या स्मशानभूमीच्या शेजारी राहणारे हे मसणजोगी,यांच्याविषयी काही लोकसमजुती रूढ असलेल्या पहावयास मिळतात.उदा. ते जादूटोणा करतात, ते भुतासोबत बोलतात, पुरलेले प्रेत उकरून काढतात, त्यांची बाळतीन बाईवर वाईट नजर असते इत्यादी. अर्थात अत्यंत वाईट परिस्थितीमध्ये जगणारी ही जमात की ज्यांना लोकमानसात राहायलासुद्धा जागा नसते.मात्र त्यांच्याविषयी किती विचित्र लोकसमजुती समाजमनात रुढ आहेत हे आपल्या लक्षात येते.

सापाविषयक लोकसमजुती–

माणूस आपले जीवनव्यवहार प्रवाहित करत असताना त्याच्या प्रवासामध्ये ज्या ज्या गोष्टी आलेल्या आहेत. त्याचा प्रभाव आणि परिणाम त्यांच्या दैनंदिन अथवा एकूण जीवनप्रवासावर झालेला आहे. त्यासंबंधीचा विचार तो मांडताना आपल्याला दिसतो. त्यामुळे अनेक प्राण्यांविषयी सुद्धा त्यांच्या समजुती आहेत उदा. घोडा, गाय, मुंगूस, घुबड, कुत्रा इत्यादी. त्याचबरोबर सापाविषयकसुद्धा काही लोकसमजुती रूढ असलेल्या दिसतात उदा. नाग पाताळात राहतात, नागाच्या डोक्यावर पृथ्वी असते, साप डूख धरतात, पंचमीला साप दूध पितात, सापाचे मिलन पाहणे भीतीदायक असते, किंवा सापाची कात जवळ बाळगल्यास तो दंश करीत नाही इत्यादि म्हणजेच वरती उल्लेख केल्याप्रमाणे माणूस हा स्वतःच्या अस्तित्वासाठी किंवा त्याच्या बाबतीत घडणाऱ्या दुःखद घटना प्रसंग यांविषयी त्याने अनेक संकेतप्रणाली अथवा लोकसमजुती बनवून ठेवलेल्या आहेत. साप हा विषारी प्राणी आहे, तो चावला की माणूस मरतो या भीतीपोटीसुद्धा कदाचित त्याच्यापासून दूर राहण्यासाठी की काय सापाविषयी या लोकसमजुती जनमानसामध्ये कमी अधिक प्रमाणात वावरताना दिसतात.

आचरणविषयक लोकसमजुती

दैनंदिन जीवन प्रवासामध्ये वावरत असताना आपणास बऱ्याच सवयी या सांगण्याने, बघण्याने, व काही संकेतप्रणालीने अंगवळणी पडत असतात त्यामुळे एखादी कृती किंवा आचरण, वागत असताना काय करू नये याविषयीसुद्धा काही लोकसमजुती असलेल्या आपणास पहावयास मिळतात उदा. दाराची कडी वाजवू नये, विस्तवावर थुंकु नये, उंबरठ्यावर शिंकु नये, झोपलेल्या माणसाला ओलांडू नये, पालते झोपू नये, हळदीच्या अंगाने बाहेर जाऊ नये इत्यादी अनेक वर्तन प्रणालीविषयी लोकसमजुती आजही जनमानसात रूढ असलेल्या दिसतात.

उपरोक्त सर्व लोकसमजुतींचा विचार करता आत्ताच्या या विज्ञानयुगामध्ये यासंबंधी कोणता निष्कर्ष काढावा हा जरी प्रश्नांकित भाग असला तरी लोकसहित्याचा विचार करताना आणि प्रामुख्याने लोकजीवनाचा आणि त्यातल्या त्यात समूहमनाचा विचार करताना या लोकसमजुतीनी लोकमाणसांमध्ये आपले अस्तित्व कमी-अधिक प्रमाणात का असेना टिकवून ठेवले आहे. असेच एकूण चित्र पहावयास मिळते. महानगर,शहराच्या

ISSN No. 2319-6025

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

भागात याचे प्रमाण कमी असले तरी आपला समाज हा जास्त प्रमाणात खेड्यात, वाड्या-वस्त्यांमध्ये जगताना दिसतो व या लोक समजुती अशा ठिकाणी अधिक प्रमाणात आढळताना दिसतात की ज्यांना लोकजीवनामध्ये महत्वाचे स्थान असल्याचे दिसुन येत

निष्कर्ष-

-लोकजीवनामध्ये लोकसमजुतींना महत्त्वाचे स्थान आहे.
-लोकसमजुतीमुळे माणसाच्या स्वभाव, चालीरीतींचा अभ्यास करता येतो.
-माणसांच्या श्रद्धा, आचार - विचार इत्यादींचा अभ्यास करता येतो.
-लोकसमजुतीमागे प्राचीन परंपरा, रूढी ,प्रथा असतात.
- लोकसमजुतीमुळे विविध प्रकारचे मानवीजीवन स्वरूप पहावयास मिळते.

संदर्भसूची-

१)लोकसाहित्य:उगम आणि विकास-शरद व्यवहारे-विश्वभारती प्रकाशन,नागपूर,पृ-२
२)लोकसाहित्य:उगम आणि विकास-शरद व्यवहारे-विश्वभारती प्रकाशन,नागपूर,पृ-२
३)लोकसाहित्य: उगम आणि विकास -शरद व्यवहारे - विश्वभारती प्रकाशन,नागपूर,पृ-११५

Principal,
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya
Peth Vadgaon, Dist. Kolhapur, Maharashtra

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Peth Vadgaon Dist. Kolhapur

Impact Factor-7.675 (SJIF)

ISSN-2278-9308

153

B.Aadhar


Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

September-2021


ISSUE No- (CCCXIV) 314

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Peth Vadgaon





Principal
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya
Peth-Vadgaon, Dist. Kolhapur, Maharashtra



Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

Executive Editor:
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

B.Aadhar

This Journal is indexed in :
- **Scientific Journal Impact Factor (SJIF)**
- **Cosmos Impact Factor (CIF)**
- **International Impact Factor Services (IIFS)**

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar PUBLICATIONS

INDEX

No.	Title of the Paper — Authors' Name	Page No.
1	भारतीय अर्थव्यवस्थेवर लोकसंख्येचा दबाव — डॉ.सतिश हरलाल पारधी	1
2	पश्चिम विदर्भातील इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाचा योजना निहाय कर्ज वाटपामधील सहभाग — प्रा.डॉ.अमोल स. राऊत	6
3	गांधीवादी विचारांची उपुयक्तता — प्रा.डॉ.वैशाली शांताराम बागुल	11
4	संत कबीरांचे सामाजीक विचार — रविंद्र पि. सोनकांबळे	17
5	म. बसवेश्वरांच्या वचनांतील तत्वविचार — डॉ. प्रवीण कारंजकर	23
6	साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कादंबरीतील नायक व खलनायक — प्रा.डॉ.प्रदीप राऊत	30
7	भाषांतर संकल्पना, स्वरूप आणि विशेष — प्रा. डॉ. सर्जेराव पद्माकर	34
8	आलोचनाका अर्थ, परिभाषाऔरस्वरुप — डॉ शिवाजी नागोबा भदरगे	41
9	वातावरणातील फेरबदलाचा पर्यावरणावर परिणाम : एक अध्ययन — प्रा.डॉ.सुरेश बन्सपाल	46
10	महात्मा गांधीजींना अभिप्रेत असलेली भारतीय लोकशाही — प्रा.एकनाथ ज्ञानदेव खरात	50
11	अनुराधा पाटील यांची स्त्रीवादी जाणिवांची कविता — डॉ सुनंदा बोरकर जुलमे	59
12	बचत गटाच्या माध्यमातून स्त्रियांचे आर्थिकदृष्टया सबलीकरण — कु.गायत्री ग. कडवे	65
13	जागतिकीकरणानंतरच्या काही मराठी कादंबऱ्यांची आशयसूत्रे — प्रा.लक्ष्मण व्यंकटराव बिराजदार	69
14	दक्षिण चीन समुद्राचे सामरिक महत्व — डॉ. उपेंद्र धगधगे	72
15	यवतमाळ जिल्ह्यातील जलसिंचन तिव्रतेतील बदलाचे कालनिहाय व अभिक्षेत्रीय अध्ययन — प्रा.डॉ.निलिमा देवरावजी अंबाडकर	75
16	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार — डॉ. रामदास निहाळ	81
17	राजकीय व्यवस्था आणि दबावगट :— एक विश्लेषणात्मक अभ्यास — डॉ.निलेश र. निंबाळकर	84
18	राम जोशींच्या लावणीचे स्वरुप — प्रा. डॉ. गौतम ढवळे	91
19	भारतातील आरोग्य विमा एक गरज — प्रा.डॉ. जया सवाईथूल	93
20	गिरोली बु. येथील शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन — डॉ.नरेंद्र हरीभाऊ शेगोकार	97

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

B.Aadhar International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675 Issue NO, 314 (CCCXIV)
ISSN : 2278-9308
September, 2021

155

भाषांतर संकल्पना, स्वरूप आणि विशेष

प्रा. डॉ. सर्जेराव पद्माकर.
डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, पेठ वडगाव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर
भ्रमणध्वनी —८३२९८१२०१२.चलभाष sarjerao9227@gmail.com.

प्रास्ताविक :

मानवाने आपले जीवन जगत असताना भाषेचा वापर करणे म्हणजेच भाषांतर होय. भाषांतराच्या या प्रक्रियेमध्ये भाषा बोलणारा, लिहिणारा आणि ऐकणारा अशा सर्व घटकांचा समावेश होतो. भाषांतराच्या संदर्भात सर्वसामान्य मानवाची धारणा मजकूर तोच ठेवायचा फक्त एका भाषेचा पोशाख उतरवून त्याला दुसऱ्या भाषेचा पोषाख चढवायचा अशाप्रकारची असते. वास्तविक पाहता भाषांतर हे अन्य भाषिक व्यक्तींचे विचार, कल्पना जाणून घ्यावयाचे एक साधन आहे, ही बाब दुर्लक्षून चालणार नाही. थोडक्यात अन्य भाषिक अनुवादाला भाषांतर म्हणता येईल. जेव्हा दोन भिन्न भाषिक व्यक्ती एकमेकांना भेटतात तेव्हा दुभाषिकाची गरज भासते. हा दुभाषि व्यक्ती या दोन भिन्न भाषिक व्यक्तींमधला दुवा बनून कार्य करीत असतो.

भाषांतराची प्रक्रिया वरवर जरी सहज आणि सोपी वाटत असली तरी भाषांतराचे विशिष्ट अशाप्रकारचे एक शास्त्र आहे.समाजामध्ये ज्यावेळी एखाद्या घटकाकडून अबोध, कामचलाऊ स्वरूपाचे भाषांतर होते अशावेळी अर्थाचा अनर्थ होण्याचा संभव असतो. उदा : अमेरिकेने जपानला पाठविलेल्या खलित्याचे जपानी भाषांतर चुकल्यामुळे त्याची परिणती अनुबॉब टाकण्यात झालेली आपणा सर्वांस ज्ञात आहेच. वास्तविक पाहता पहिल्या मजकुराचा शब्दशः अनुवाद करावा लागतो. अशाप्रकारचा अनुवाद करीत असताना अर्थहानी होणारा नाही याची विशेष खबरदारी घेतली जाणे अत्यावश्यक असते. याकरिता चांगल्या भाषांतरकाराजवळ संबंधित दोन्ही भाषेविषयीची उत्तम जान असणे आवश्यक ठरते. याबरोबरच त्याच्याजवळ सर्जनशीलता हा गुणदेखील असणे आवश्यक आहे. वर्तमान युगामध्ये जग अतिशय जवळ आल्याने प्रत्येक क्षेत्रात दुभाषिकाची गरज निर्माण झालेली आहे. त्यामुळे हल्लीच्या युगात भाषांतरकारास विशेष स्थान प्राप्त झाल्याचे दिसून येते. परकीय भाषेतील विचार भारतीय भाषेत आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करण्यासाठी भाषांतर हे एक कौशल्य, कला आणि उत्तम कारागिरी असल्याचे प्रत्यंतर येते. त्यासाठी भाषांतर ही काळाची गरज या दृष्टिकोणातून या प्रक्रियेकडे पाहणे आवश्यक ठरते.

भाषांतर : संकल्पना व स्वरूप :

सर्वसाधारनपणे १८१८ ते १८७४ या कालखंडात भारतीय समाजजीवनामध्ये 'भाषांतरित वाङ्मयाचे उदंड पीक आल्याचे दिसून येते. त्यामुळेच या कालखंडास 'भाषांतरयुग' असे संबोधले जाते. भाषांतर हे भाषेच्या प्रगत नैपुण्यांपैकी एक अशाप्रकारचे नैपुण्य आहे. वास्तविक पाहता समजणे, बोलणे, लिहिणे, वाचणे ही प्राथमिक नैपुण्ये झाली. याबरोबरच रूपांतर करणे, विस्तार करणे, संक्षेप करणे, पुनर्लेखन करणे आणि भाषांतर करणे ही प्रगत नैपुण्ये होत. त्यामुळे केवळ मातृभाषेची नैपुण्ये संपादन केल्याने मनुष्य साक्षर होत नाही. तर सुशिक्षित होण्यासाठी भाषेची प्रगत नैपुण्ये आत्मसात करणे आवश्यक ठरते. भाषांतर करणे हे वैशिष्ट्यपूर्ण नैपुण्य आहे. भाषांतर करण्यासाठी किमान दोन भाषा अवगत असणे आवश्यक आहे. वर्तमान युगात जागतिक पातळीवरती मानवाचा संपर्क वाढल्याने भाषांतराची मोठ्याप्रमाणात आवश्यकता निर्माण झाली आहे. आजच्या युगात संपर्कमाध्यमांची संख्या वाढल्याने देशांच्या सीमा जवळजवळ येऊ लागल्या

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

आहेत. त्यामुळे भिन्न भाषा बोलणारी, भिन्न देशातील, भिन्न वंशाची, वर्णाची माणसे आज एकत्र उठ–बस करू लागली आहेत.

वर्तमान समाजजीवनाचा विचार करता संज्ञापन हे केवळ एका भाषेपुरते मर्यादित नाही. तिच्या कक्षा निश्चितपणे विस्तारल्या असल्याचे दिसून येते. त्यामुळे आजच्या युगात सुशिक्षित होणे म्हणजे बहुभाषिक असणे अशाप्रकारचा व्यापक अर्थ गृहित धरला जात आहे. म्हणूनच कधी नव्हते इतके महत्त्व भाषांतराला प्राप्त झाले आहे.सर्वसाधारनपणे भाषांतराच्या व्याख्या पुढीलप्रमाणे करता येईल, ''भाषांतर म्हणजे एका भाषेतून दुसऱ्या भाषेत केलेली विचारांची अभिव्यक्ती होय.'' इंग्रजीमध्ये 'भाषांतर' या संकल्पनेला 'ज्तदेसंजपवद' हा शब्द वापरला जातो. यापैकी 'ज्तदे' म्हणजे पलीकडे, 'संजपवद' म्हणजे घेऊन जाणे. थोडक्यात 'ज्तदेसंजपवद' म्हणजे वाहून नेणे अथवा च्या पलीकडे जाणे अशाप्रकारचाव्यापक अर्थ यामाध्यमातून अभिव्यक्त होतो. लॅटिन भाषेतील 'ज्तदेसंजपवद' पासून 'ट्रान्स्फर' हा शब्द तयार झाला आहे. भाषांतर या संकल्पनेचा उगम सर्वसाधारणपणे इ.स.पहिल्या ते तिसऱ्या शतकाच्या दरम्यान झाला अशाप्रकारचा अंदाज व्यक्त केला जातो. एरिक कोलमनच्या मते, ''भाषांतर ही रोमन लोकांनी शोधलेली कला आहे.'' ज्यू लोकांच्या धर्मग्रंथात ''भाषांतर'' शब्दाचा सर्वप्रथम उल्लेख आढळतो. त्यासंदर्भातील दस्तऐवज 'अलेक्झांड्रिया' येथे सापडला. या ग्रंथाचा प्रमुख उद्देश लोकांना धर्मग्रंथांचे आकलन व्हावे हा होता.

मध्ययुगीन कालखंडाचा विचार करता, 'ग्रीक' ही पुस्तकांची प्रचलित भाषा होती. त्यामुळे सर्वाधिक भाषांतरे ही अरबी लोकांच्या ऐतिहासिक व वैज्ञानिक मजकुरांची होती. सर्वसाधारनपणे चौदाव्या शतकात बायबलचे इंग्रजीत भाषांतर 'विक्लिफ बायबल' या नावाने झाले. याशिवाय लॅटिन व अनेक देशी भाषेमध्येही भाषांतरे झालेली दिसून येतात. परंतु या भाषांतरापाठीमागचा प्रमुख उद्देश धर्मप्रसार हाच होता. आठराव्या शतकानंतर भाषांतर प्रक्रियेमध्ये बदल झाला आणि यामध्ये पुर्वीपेक्षा झापाट्याने भाषांतरे होऊ लागली. या काळामध्ये प्रामुख्याने विषयनिष्ठ स्वरूपाची भाषांतरे अधिक प्रमाणात झाल्याचे दिसून येते. एकोणिसाव्या शतकामध्ये मात्र भाषांतर प्रक्रियेस एकप्रकारची शिस्त प्राप्त झाली. त्यामुळे आपोआपच भाषांतरामध्ये अचूकतादेखील निर्माण झाल्याचे प्रत्यंतर येते. यामध्ये एखादे पुस्तक, संपूर्ण पुस्तक आणि पुस्तकाशिवाय दुसरे काहीही नाही हे सूत्र अवलंबिले असल्याचे दिसते. वर्तमान कालखंडात भाषांतराला मौलिकता व व्यावसायिकता प्राप्त झाली आहे. कारण जागतिक लोकसमूह खूप झपाट्याने एकत्रित येत आहे. परिणामी इथून पुढच्या कालखंडामध्ये भाषांतर प्रक्रियेस आणखी महत्त्व प्राप्त झाल्यास आश्यर्य वाटण्याचे कारण नाही. आतापर्यंतच्या भाषांतरप्रक्रियेचा विचार करता विविध प्रकारची असंख्य पुस्तके भाषांतरित झाल्याचे पहावयास मिळते. त्यामुळेच भाषांतरास साहित्य आणि वाङ्मयीन पातळीवर महत्त्व प्राप्त झाले आहे. वास्तविक पाहता भाषंतर हा मूळ मजकूर व लेखक यांच्यातील दुवा आहे. आधुनिक काळात संगणक क्रांतीमुळे संगणकीय भाषांतराला महत्त्व प्राप्त झाले आहे, ही बाब मान्य करावी लागेल.

भाषांतर ही अशी प्रक्रिया आहे की ज्यामध्ये शब्द किंवा मजकूराचे एका भाषेमधून दुसऱ्या भाषेमध्ये रूपांतर केले जाते. त्यामुळेच ''लिखित किंवा मौखिक स्वरूपातील शब्दांचे, भाषणांचे, पुस्तकांचे किंवा इतर मजकुरांचे एका भाषेतून दुसऱ्या भाषेत केलेले रूपांतरण म्हणजे भाषांतर होय.'' अशाप्रकारची व्याख्या केली जाते. थोडक्यात ज्या भाषेतला मजकूर दुसऱ्या भाषेत आणायचा त्या भाषेला मूळ भाषा किंवा उगम भाषा असे संबोधले जाते. आणि ज्या भाषेत तो मजकूर आणला जातो त्या भाषेला लक्ष्य भाषा असे म्हणतात. त्यामुळे स्वाभाविकच भाषांतरामध्ये मूळ मजकुराला महत्त्व प्राप्त होते. त्यामुळे भाषांतराची आणखी एक व्याख्या पुढीलप्रमाणे करता येईल, ''एका भाषेतील मजकूर नेमकेपणाने दुसऱ्या भाषेत व्यक्त करण्याचा प्रयत्न म्हणजेच भाषांतर होय.'' भाषांतर करताना मूळ मजकूरातील अर्थ न बदलता त्याचे दुसऱ्या

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

भाषेत भाषांतर करणे ही बाब देखील भाषांतरामध्ये महत्त्वपूर्ण ठरते. म्हणजेच एका भाषेतील अर्थाची दुसऱ्या भाषेत फेरमांडणी करणे अशाप्रकारची व्याख्यादेखील बऱ्याचवेळेस ग्राह्य धरली जाते. वास्तविक पाहता भाषांतर हे द्विमुखी कार्य आहे. यामध्ये पहिला मुद्दा मूळ मजकुराचे अर्थांतरण न करता, अर्थहानी होऊ न देता भाषांतर करणे. याबरोबरच दुसरा महत्त्वपूर्ण मुद्दा आहे तो म्हणजे, ज्याप्रमाणे आरशात स्वत:चे प्रतिबिंब दिसते त्याप्रमाणेच भाषांतर प्रक्रियेमध्ये मूळ मजकुराचे प्रतिबिंबि उमटणे अपेक्षित असते. त्यामुळे एखाद्या घटकाचे भाषांतर करताना सर्वसाधारानपणे पुढील प्रकारे मांडणी होणे अपेक्षित आहे. भाषांतराचे टप्पे : मूळ भाषेतील आशय — मजकुराचे विश्लेषण —स्वभाषेतील पुनर्निर्मिती.

भाषांतराचे विविध प्रकार :

वर्तमान स्थितीत भाषांतर ही संपूर्ण जागतिक पातळीवर एक महत्त्वपूर्ण गरज बनून राहिली आहे. केवळ भारतामध्येच नव्हे तर जागतिक पातळीवरील विविध देशामध्ये त्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्यामुळे भाषांतर करण्याकरिता आवश्यक असणाऱ्या प्रकारांचा याठिकाणी आढावा घेणे आवश्यक ठरते. भाषांतराचे प्रकार पुढीलप्रमाणे,

भाषांतराचे सर्वसामान्य प्रकार :

• मूलनिष्ठ भाषांतर :

'मूळ भाषेतील मजकुराचे शब्दश: अथवा मूळ स्वरूपात केले जाणारे भाषांतर म्हणजेच मूलनिष्ठ भाषांतर होय'. मूलनिष्ठ भाषांतराचे शब्दक्रमनिष्ठ भाषांतर आणि शब्दनिष्ठ भाषंतर अशाप्रकारचे उपप्रकार पडतात. यापैकी शब्दनिष्ठ भाषांतर म्हणजे,'मूळच्या शब्दांचे शब्दश: केलेले भाषांतर होय'. तर शब्दक्रमनिष्ठ भाषांतर म्हणजे,'मूळच्या शब्दाच्या शब्दश: भाषांतराबरोबरच मूळ शब्दाच्या क्रमालाही महत्त्व देऊन केले गेलेले भाषांतर होय'. मूलनिष्ठ भाषांतरामध्ये मूळ भाषेला महत्त्व दिले जाते. त्यामुळे आशयाकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता असते. त्यामुळे अशाप्रकारचे भाषांतर नीरस अथवा कंटाळवाणे होण्याची शक्यत असते. याप्रमाणेच अशाप्रकारच्या भाषांतरामध्ये कृत्रिमपणा जाणवतो. उदा : कायद्याच्या शिक्षणामध्ये अशाप्रकारच्या भाषांतराचा उपयोग केला जातो.

• लक्ष्यनिष्ठ भाषांतर :

लक्ष्यनिष्ठ भाषांतरामध्ये मूळ भाषेतील आशय, गाभा किंवा लक्ष्य याला प्राधान्य दिले जाते. त्यामुळे लक्ष्यनिष्ठ भाषांतराची व्याख्या पुढीलप्रमाणे केली जाते, ''मूळ भाषेतील मजकुराचा आशय, सार्थक अभिव्यक्ती ज्या भाषांतरात केली जाते ते लक्ष्यनिष्ठ भाषांतर होय.'' अशाप्रकारच्या भाषांतरामध्ये मूळ आशयाशी एकनिष्ठ राहून भाषांतर केले जाते त्यामुळे त्या भाषांतरामध्ये एकप्रकारची सहजता निर्माण होते. लक्ष्यनिष्ठ भाषांतर केल्यानंतर हे भाषांतर आहे अशाप्रकारचा भास वाचकाला न होणे यामध्येच खऱ्या अर्थाने श्रेष्ठता आहे. थोडक्यात लक्ष्यनिष्ठ भाषांतर म्हणजे मूळ मजकुराची पुनर्निर्मिती होय. लक्ष्यनिष्ठ भाषांतरामुळे ज्ञानाबरोबरच विचार आणि संस्कृती याचे रक्षण केले जाते. प्रामुख्याने ललित साहित्यात हा प्रकार विशेष प्रचलित आहे. अशाप्रकारच्या भाषांतरामध्ये भाषांतरकर्त्याच्या स्वैर आविष्काराला, कल्पनेला आणि विचारांना एकप्रकारची मुक्तता प्राप्त होते. रसिक वाचक अशाप्रकारच्या भाषांतराला विशेष पसंती देतो. या भाषांतराचा मूळ हेतू हा भाषेतून व्यक्त होणारा आशय, आविष्कार वाचकांच्या निदर्शनास आणून देणे हा आहे.

Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Pune Vadgaon Dist. Kolhapur

भाषा व्यवहारानुसार प्रकार :

• ललित साहित्य :

तात्विकदृष्टया एखादया वाङ्मयीन कलाकृतीचे भाषांतर करणे ही प्रक्रिया क्लिष्ट आहे. कारण कवितेसारख्या वाङ्मयप्रकारामध्ये शब्द कमी मात्र त्याचा अर्थ व्यापक असल्याचे दिसून येते. त्यासाठी साहित्याची आणि मानवी व्यवहारांची उत्तम जान असलेल्या व्यक्तींची आवश्यकता असते. याबरोबरच कादंबरी, नाटक, कथा यासारख्या ललित साहित्यप्रकारांमध्ये प्रामुख्याने वर्णन, विश्लेषण, स्पष्टीकरण आणि चर्चा यामाध्यमातून लेखकाच्या कल्पनाशक्तीला व प्रतिभेला वाव देण्यासाठी भाषांतर उपयुक्त ठरते. ललित साहित्यामध्ये साहित्यिक, सामाजिक व सांस्कृतिक असे सर्व संकेत पाळले जात असतात त्यामुळे ललित साहित्याचे एखादया भाषेमध्ये भाषांतर करणे अत्यंत कठीण काम असते.

• वैचारिक ग्रंथ अथवा साहित्य :

विचारप्रवर्तक असे साहित्य भाषांतरित करीत असताना भाषांतरकर्त्याला खूपच काळजी घ्यावी लागते. कारण वैचारिक ग्रंथामध्ये मांडला गेलेला विचार नेमकेपणाने मांडला जातो. याबरोबरच तो आशय लक्ष्य भाषेमध्ये मांडला जातो. त्यामुळे या ग्रंथामध्ये मांडला गेलेला विचार हा प्रगल्भ भाषेमध्ये आणि ग्रांथिक भाषेमध्ये मांडला गेलेला असतो. परिणामी अशाप्रकारच्या सर्वसंमत साहित्याचे भाषांतर करताना भाषांतरकर्त्याकडे अभ्यासू वृत्ती असणे अनिवार्य आहे.

• धार्मिक ग्रंथ :

धार्मिक ग्रंथांचे भाषांतर करताना भाषांतरकर्त्याला संज्ञा आणि संकल्पनांचा काटेकोर आणि परिपूर्ण अभ्यास करणे अनिवार्य आहे. कारण मानवी समाजामध्ये धर्म ही बाब अत्यंत संवेदक आहे. त्यामुळे धर्माचे कट्टर पुरस्कर्ते त्या धर्माविषयीची कोणतीही बाब स्विकारायला तयार होत नाहीत. धार्मिक ग्रंथातील मुळ मजकूर भाषांतरित करताना अनेक प्रकारच्या अडचणी निर्माण होतात. त्यामुळे सहसा भाषांतर करण्याकडे बरेच लोक वळत नाहीत.

• शास्त्रीय ग्रंथ :

शास्त्रीय ग्रंथांच्या भाषेमध्ये पारिभाषिक शब्दांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. अशावेळी पारिभाषिक शब्दांचे अर्थ शोधण्यासाठी शास्त्रीय शब्दकोशांचा वापर करावा लागतो. या ग्रंथातील नेमका आशय सांगण्याचा प्रयत्न केला जातो. अल्पज्ञानी व अभ्यासू प्रवृत्ती नसणारी व्यक्ती या ग्रंथांचे अचूक भाषांतरण करूच शकत नाही. यामध्ये अलंकारिक, रसयुक्त भाषा न वापरता शास्त्रात वापरतात तशी मोजकी भाषा वापरून भाषांतर करणे अभिप्रेत असते.

व्यावहारिक संदर्भानुसार प्रकार :

भाषांतराचे व्यावहारिक संदर्भ वेगवेगळे असू शकतात. भाषांतर हे मौखिक वा लेखी, त्वरित वा सावकाश, संगणकीय अशा स्वरूपाचे असू शकतात.

१. मौखिक भाषांतर :

जेव्हा अन्य भाषिक व्यक्ती एकत्र येतात तेव्हा त्यांच्यात विचारविनिमय व संपर्क स्थापला जावा या दृष्टिने दुभाषिक भाषांतराचे कार्य करतो हेच मौखिक भाषांतर होय. भिन्न भाषिकांच्या सभेमध्येही मौखिक भाषांतरासाठी दुभाषिकाचे साहाय्य घेतले जाते. शासकीय, आंतरराष्ट्रीय व पर्यटन अशा विविध क्षेत्रात मौखिक भाषांतराला महत्त्व प्राप्त झालेले आहे.

२. लिखित भाषांतर :

साहित्यिक क्षेत्रात अन्य भाषिक वाङ्मय, त्यातील श्रेष्ठतम साहित्यकृती यांचे भाषांतर केले जाते. हेच लिखित भाषांतर होय. शैक्षणिक पातळीवरही अभ्यासक्रमामध्ये अशाप्रकारच्या भाषांतराचा समावेश करण्यात आलेला आहे.

Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

३.संगणकीय भाषांतर :

संगणक आणि सॉफ्टवेअर क्षमतांचा विकास झाल्याने अनेक भाषांचे दुसऱ्या भाषांमध्ये झटपट भाषांतर करणे सहजसुलभ झाले आहे. मानवी भाषांचे विश्लेषण व भाषांतर कार्यात संगणक सहाय्यभूत ठरतो. पर्यायी शब्द शोधणे, शब्दांचे अर्थ शोधणे, या कामी संगणक मदतनिसाची भूमिका बजावतो. त्यामुळेच सद्यस्थितीत संगणकीय भाषांतराला महत्त्व प्राप्त होत आहे. मानवी चुका टाळण्यासाठी यंत्राचा उपयोग भाषांतर क्षेत्रातही प्रभावी ठरू शकतो.

• भाषांतराच्या वेगवेगळ्या संधी:

वाङ्मयीन प्रांतामध्ये भाषांतर हे विस्तृत अशाप्रकारचे क्षेत्र आहे. त्यामुळे मानवी जीवनव्यवहारात साहित्याबरोबरच इतर क्षेत्रामध्ये देखील भाषांतराची गरज मोठ्याप्रमाणात निर्माण झाली आहे. भाषांतराची आवश्यकता आणि गरज पुढीलप्रमाणे विवेचित करता येईल.

१.विश्व पातळीवरील संधी :

वैश्विकीकरणामुळे आणि इंग्रजीच्या वाढत्या वापरामुळे इंग्रजीचे महत्त्व निश्चितच वाढले आहे. इतकेच नव्हे तर जगातील कोणतीही अद्ययावत माहिती इंग्रजीमध्ये सहज उपलब्ध होऊ शकते त्यामुळे इंग्रजी ही जगाची राजभाषा बनली आहे. हे जरी वास्तव असले तरीदेखील स्वभाषेला प्राधान्य देणाऱ्या प्रगत राष्ट्रांमध्ये त्या त्या भाषांमध्येच लेखन केले जाते. मात्र इंटरनेटच्या युगात जग परस्परांच्या अतिशय जवळ आले आहे. अशावेळी ज्ञान, विज्ञान, कला, साहित्य अशा विविध क्षेत्रांमध्ये माहितीची उपलब्धता व्हावी यासाठी भाषांतराला महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे स्वभाषेतील साहित्य इंग्रजी भाषेत याबरोबरच परकीय भाषेतील इंग्रजी ग्रंथांचे मराठी बरोबरच हिंदी सारख्या स्वभाषेमध्ये होणे आवश्यक आहे. त्यामुळे एका देशातील साहित्य, संस्कृती, विचार, कल्पना दुसऱ्या देशात पोहचविण्यासाठी भाषांतराला निश्चितच महत्त्व प्राप्त होत आहे.

२.व्यावसायिक संधी :

• सरकारी क्षेत्र :

भारत देशामध्ये विविध स्वरूपाच्या भाषा बोलल्या जातात. यापैकी महाराष्ट्र राज्याच्या सरकारी व्यवहारात प्रशासनिक भाषा म्हणून मराठीचा आवर्जून वापर केला जातो. विधिमंडळाच्या कामकाजातही मराठी भाषा प्रचलित असल्याचे दिसून येते. त्यामुळे मराठी भाषेचे महत्त्व कमी होत नसून याउलट असंख्य नोकरीच्या संधी उपलब्ध होताना दिसून येत आहेत. ज्या लोकांचे इंग्रजी भाषेवर प्रभुत्व आहे, मराठी भाषेचा पदव्युत्तर अभ्यासक्रम ज्यांनी पूर्ण केला आहे अशा लोकांना भाषा संचालनालय, विधान मंडळ यासारख्या ठिकाणी अनुवादक म्हणून खूप मोठ्या प्रमाणात व्यावसायिक संधी उपलब्ध होऊ शकतात.

• न्याय व्यवहार :

संपूर्ण भारताची न्यायप्रक्रिया अत्यंत प्रभावी अशाप्रकारची आहे. त्यातही महाराष्ट्रातील न्यायालयेदेखील तितकीच प्रभावी असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील अनेक खटल्यांचा विचार करता न्यायप्रक्रियाही निश्चितच विश्वासार्ह असल्याचे पहावयास मिळते. या न्यायप्रक्रियेमध्ये देखील मराठीचा वापर सर्वत्र होताना दिसून येतो. परंतु इतर भाषिकांचा खटला असल्यास त्याठिकाणी अनुवादकांना महत्त्व प्राप्त होते. त्यामुळे नोकरी नाही म्हणून नैराश्य पदरी न बाळगता अनुवादकाचे कार्य करून अर्थार्जन करण्यासाठी भाषांतरासारखे उत्तम क्षेत्र मराठी भाषिक तरूणांपुढे असल्याचे दिसून येते.

• प्रसार माध्यमे:

वर्तमान समाजजीवनामध्ये तंत्रज्ञानाला अत्यंत महत्त्व प्राप्त होत आहे. त्यामुळे मराठी भाषिक लोकांची सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रांशी संबंधित माहिती लोकांच्या

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

समोर जाण्यासाठी अनुवादकाची खूप मोठ्या प्रमाणात मागणी निर्माण झाली आहे. त्यामुळे वृत्तपत्रे, नियतकालिके, रेडिओ, दूरदर्शन यासारख्या वाहिण्यांमध्ये अनुवादकाला खूप मोठ्याप्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. याबरोबरच सध्याच्या युगात प्रत्येक वस्तुंमध्ये प्रचंडमोठ्या प्रमाणात स्पर्धा निर्माण झाली आहे. त्यामुळे आपलीच वस्तू जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचण्यासाठी प्रत्येक उद्योगपती आपापल्या वस्तूच्या जाहिरातीसाठी मोठ्याप्रमाणात पैसा लावण्यास तयार आहे त्यामुळे जाहिरात क्षेत्रामध्ये देखील अनुवादकाची गरज निर्माण झालेली पहावयास मिळते.

• लेखन / भाषा क्षेत्र :

तंत्रज्ञानाच्या युगात तांत्रिक प्रगतीबरोबरच लेखन विषयाला देखील महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे स्वाभाविकच वैज्ञानिक व तांत्रिक विषयाचे लेखन, कायद्याचे लेखन, प्रकाशन यासारख्या व्यवसायामध्ये भाषांतराला महत्त्व प्राप्त झाले आहे. मात्र भाषांतर ही सहजसाध्य गोष्ट नाही. त्यासाठी पारिभाषिक संज्ञांचे अचूक ज्ञान असणे, याबरोबरच अचूक मांडणी करण्याचीकौशल्ये अंगी असणे आवश्यक आहे. या सर्व गोष्टींचे अचूक ज्ञान असणाऱ्यांना भाषांतरकर्त्यास खूप मोठ्या प्रमाणात व्यावसायीक संधी उपलब्ध आहेत.

• साहित्य क्षेत्र :

सध्याच्या युगात जग अतिशय जवळ आलेले दिसते ते भाषेमुळेच. परंतु त्यासाठी जागतिक भाषा म्हणून इंग्रजीचे आणि भारतीय भाषा हिंदी किंवा तत्सम प्रांतिक भाषेचे अचूक ज्ञान असणे आवश्यक आहे. असे असल्यास विदेशी अथवा अन्य भाषेतील श्रेष्ठतम साहित्यकृती स्वभाषेमध्ये वाचकांपर्यंत पोहचविण्यासाठी भाषांतरणप्रक्रियेला महत्त्व प्राप्त होते. याबरोबरच शैक्षणिक स्तरावर देखील भाषांतर लेखन हा एक वेगळा प्रांत होऊ शकतो. आज जागतिक पातळीवरील सर्व इत्यंभूत माहिती इंटरनेटमध्ये उपलब्ध आहे. परंतु त्यासाठी इंग्रजी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. इंटरनेटवरील उपलब्ध माहिती स्वभाषेमध्ये भाषांतरित करण्यासाठी भाषांतरकाराची गरज निर्माण होते.

• पर्यटन क्षेत्र :

संपूर्ण जगामध्ये खूप मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध प्रेक्षणीय स्थळे उपलब्ध आहेत. विविध देशातील खास आकर्षणे व पर्यटन स्थळे पाहण्यासाठी पर्यटक येत असतात. संबंधित स्थळांची इत्यंभूत माहिती पर्यटकांसमोर पोहचविण्यासाठी दुभाषिक असतो. इतकेच नव्हे तर दोन देशांचे प्रमुख किंवा विविध क्षेत्रातील प्रतिनिधी जेव्हा एकत्र येतात तेव्हा देखील भाषांतरकाराची गरज निर्माण होते. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे, योग्य भाषांतर योग्य परिणाम साधते. भाषांतर जर योग्य झाले नाही तर नुकसान किंवा अनर्थ ओढवण्याची देखील शक्यता असते. याउलट काही चांगल्या बाबी देखील घडण्याची शक्यता आसते. उदा : चीनचे राष्ट्राध्यक्ष जेंव्हा भारत भेटीवर आले होते त्यावेळी त्यांचे स्वागत चिनी भाषेमध्ये केले गेले. त्यामुळे चीनच्या राष्ट्राध्यक्षांच्या मनामध्ये आपल्या देशाविषयी आपुलकीची भावना निर्माण होण्यास मदत झाली.

समारोप :

सर्वसाधारनपणे १८१८ ते १८७४ या कालखंडात भारतीय समाजजीवनामध्ये 'भाषांतरित वाङ्मयाचे उदंड पीक आल्याचे दिसून येते. त्यामुळेच या कालखंडास 'भाषांतर — युग' असे संबोधले जाते. भाषांतर ही अशी प्रक्रिया आहे की ज्यामध्ये शब्द किंवा मजकूराचे एका भाषेमधून दूसऱ्या भाषेमध्ये रूपांतर केले जाते. त्यामुळेच ''लिखित किंवा मौखिक स्वरूपातील शब्दांचे, भाषणांचे, पुस्तकांचे किंवा इतर मजकुराचे एका भाषेतून दुसऱ्या भाषेत केलेले रूपांतरण म्हणजे भाषांतर होय.'' मात्र इंटरनेटच्या युगात जग परस्परांच्या अतिशय जवळ आले आहे. अशावेळी

Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

ज्ञान, विज्ञान, कला, साहित्य अशा विविध क्षेत्रांमध्ये माहितीची उपलब्धता व्हावी यासाठी भाषांतराला महत्त्व प्राप्त झाले आहे. परिणामी स्वभाषेतील साहित्य इंग्रजी भाषेत, याबरोबरच परकीय भाषेतील इंग्रजी ग्रंथांचे मराठी बरोबरच हिंदीसारख्या इतर स्वभाषेमध्ये भाषांतर होणे आवश्यक आहे. त्यामुळे एका देशातील साहित्य, संस्कृती, विचार, कल्पना दुसऱ्या देशात पोहचविण्यासाठी भाषांतराला निश्चितच महत्त्व प्राप्त होत आहे.

• **संदर्भ:**

१. गोविलकर लीला व जयश्री पाटणकर : 'व्यावहारिक मराठी' स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, २००४, पृ — १३५.

२. कडूमाळी संदीप, : 'भाषा आणि कौशल्य विकास', प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव,प्रथमावृत्ती, २०१९, पृ — ८८.

३. जोशी प्रभाकर व पाटील किशोर : 'उपयोजित मराठी', प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, प्रथमावृत्ती, २०१५, पृ — १११.

४. सांगळे संदीप,(संपा.):'व्यावहारिक, उपयोजित मराठी व प्रसारमाध्यमांची कार्यशैली', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती, २०१३, पृ — १६८.

Principal,
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya
Peth Vadgaon, Dist. Kolhapur, Maharashtra

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905
SJIF 2021 - Impact Factor: 6.91

162

Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)

Year - 7, Vol.I, Issue-XXXVI, September 2021



Editor : Mrs. Pallavi Laxman Shete

Principal,
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya
Peth Vadgaon, Dist. Kolhapur, Maharashtra

Quarterly Research Journal

(Arts - Humanities - Social Sciences - Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical, Ayurveda, Pharmaceutical, Journalism, Mass Communication, Library Science Faculty's)

Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Referred) ISSN – 2454 - 7905

16.	जैव विविधता संरक्षण का पारिस्थितिकीय महत्व एवं इस दिशा में वैश्विक प्रयास की आवश्यकता	डॉ. धर्मेन्द्र कुमार शर्मा	82
17.	भूत–वर्तमान और भविष्य के परिप्रेक्ष्य में भारत भारतीय संस्कृति व समाज नीति	डॉ. रोहताश जमदग्नि	91
18.	ऑनलाइन शिक्षा और महाविद्यालयीन छात्र–छात्राएँ एक समाजशास्त्रीय अध्ययन : बिछुआ ग्राम के विशेष संदर्भ में	डॉ. फरहत मंसूरी	97
19.	संचार माध्यम और अनुवाद	डॉ. राम सदाशिव बडे	101
20.	अनुसूचित जाति के छात्रो को पुस्तकालय और वाचनालय कि सुविधा प्राप्त करने में आनेवाली समस्याओं का अध्ययन"	डॉ. साळवे संदिप गोरख	105
21.	'बिलासपुर जिला (छत्तीसगढ़) के वन्यग्राम "टिंगीपुर" में बैगा जनजाति के सामाजिक, आर्थिक दशा का अध्ययन"	डॉ. संगीता शुक्ला	107
22.	दलित चेतनाकी सार्थक अभिव्यक्तिः यथा-प्रस्तावित	प्रा. निर्मला ल. जाधव	110
23.	बुद्ध द्वारा अनुमोदित यज्ञ परम्परा तथा वैदिक यज्ञ परम्परा : एक मूल्यांकन	विशाखानन्द बन्सोड	112
24.	वृत्तपत्रीय भाषिक विशेष	डॉ. सर्जेराव पद्माकर	117
25.	पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर...	डॉ. देवकाते बी. एन.	121
26.	महाराष्ट्रातील भूमिहक्क विषयक कायदे व तरतूदी	प्रा. सुनिल ताकतोडे डॉ. संजय गायकवाड	124
27.	डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्र आणि राष्ट्रवादासंबंधीचे विचार	प्रा. डॉ. एस. के. तांदळे	126
28.	पाथरी विधानसभा सदस्यांचे विकासात्मक कार्यः (२०००-२००४)	डॉ. भालचंद्र वै. धर्मापुरीकर	130
29.	औरंगाबाद जिल्ह्यातील जलसिंचन - एक भौगोलिक अभ्यास	अनुराधा संजय भारद्वाज	135
30.	म. गांधींनी सांगितलेल्या नागरिकांच्या कर्तव्याची वर्तमानकालीन आवशकता	प्रा. डॉ. एन. जी. अडकिने	139
31.	भारतातील दारिद्र्य : एक ज्वलंत समस्येचे प्रारूप	सुधाकर बाळू चव्हाण	146
32.	मराठा आरक्षण काळाची गरज व त्यापुढील आव्हाने	डॉ. रामदास बाबाजी निहाळ	149
33.	ब्रिटीशकालीन महाराष्ट्रातील चलन : एक अभ्यास	प्रा. डॉ. जि. एस. पिसे	153
34.	राजश्री शाहू महाराज यांचे समाजकार्य यावरील विचार...	प्रा. चित्रा दिगंबर साळुंखे	156
35.	आदिवासींच्या उपेक्षित इतिहासाचे मंडन	डॉ. कुंदा बाळासाहेब कवडे	160

Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Referred) ISSN – 2454 - 7905

वृत्तपत्रीय भाषिक विशेष

डॉ. सर्जेराव पद्माकर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, पेठवडगाव, जि.कोल्हापूर ४१६११२.

प्रास्ताविक:

मानवी जीवन व्यवहारामध्ये भाषा हा घटक अपरिहार्य स्वरूपाचाआहे. त्यामुळे भाषेशिवाय मानवी जीवन परिपूर्ण रूप धारण करू शकत नाही. 'ध्वनी आणि अर्थ' याची विशिष्ट रचनेद्वारा सांगड घालणारी यंत्रणा म्हणजे भाषा अशी भाषेविषयीची सर्वसाधारण व्याख्या केली जाते. जीवनाचा सर्व क्षेत्रातील व्यवहार पूर्ण करण्याकरीता मानवाला भाषेचा आधार घेणे भाग पडते.इतकेच नव्हे तर मानवाला स्वप्न पडते ते सूत्र भाषा माध्यमातूनच, तो दिवसरात्र विचार करतो.भाषेच्या सहाय्याने निसर्गसृष्टीमध्ये वास्तव्यास असलेल्या प्राणीमात्रांच्या तुलनेने मानव प्राण्याने स्वत:ची जी प्रगती करून घेतली आहे, त्याचे मूळ भाषा माध्यम हेच असल्याचे दिसून येते.मानवी जीवनाच्या प्रत्यक्ष व्यवहारामध्ये भाषा हेच माध्यम वेगवेगळया पातळीवरती वापरले जाते. भाषेची संकेतप्रणाली स्पष्ट करताना, मु. श्री. कानडे संपादित, 'मराठीचा भाषिक अभ्यास या ग्रंथामध्ये पुढील विवेचन केले आहे, ''भाषा ही देखील एक संकेत प्रणालीच आहे.ध्वनी हे भाषेचे माध्यम आहे.म्हणजे भाषेची संकेतव्यवस्था ध्वनीसंकेतांवर आधारलेली असते.इतर संकेतप्रणालींच्या तुलनेने भाषा ही अधिक सुटसुटीत, लवचिक, वैविध्यपूर्ण, उपयुक्त आणि केव्हाही सहज वापरता येणारी संकेतप्रणाली आहे. भाषेचे माध्यम असलेला ध्वनी अनेक गुणवैशिष्टयांनी युक्त असतो.ध्वनीच्या गुणकारकतेमुळे भाषा ही सर्वाधिक उपयुक्त संकेत व्यवस्था झाली आहे."१अशाप्रकारे ध्वनी संकेतांच्या माध्यमांतून बच्या झालेली मराठी भाषा वेगवेगळी गुणवैशिष्टये अंगी बाणून मानवी जीवन व्यवहारामध्ये व्यापक भूमिका बजावताना दिसते.वास्तविक पाहता मानव हा इतर प्राण्यांपेक्षा खूप प्रगत आहे. त्यामुळे त्याने इतर प्राण्यांना दावणीला बांधून एक अभिमानास्पद अशा प्रकारची स्वत:ची स्वतंत्र संस्कृती विकसित केली आहे.पत्रकारिता ही या संस्कृतीची एक महत्त्वपूर्ण निर्मिती आहे. माणसाला निव्वळ जीवन व्यवहारासाठी आवश्यक असणा—या माहितीचे उगमस्थान म्हणून ती कार्य करते. याबरोबरच पत्रकारितेच्या माध्यमातून संस्कृती वापरण्याचे, आत्मसात करण्याचे व विकसित करण्याचे कार्य केले जाते. त्यामुळे वर्तमानपत्रातून प्रकाशित होणाऱ्या वेगवेगळया प्रकारच्या बातम्यांतील भाषेचे स्वरूप नेमके कसे आहे हे स्पष्ट करण्याचा हेतू प्रस्तुत शोधनिबंध लेखनापाठीमागचा आहे.

वृत्तपत्रीय भाषेचे स्वरूप :

वृत्तपत्राच्या अंतरंगामध्ये प्रामुख्याने बातमी, स्फुटे, स्तंभलेखन, फिचर चूषलेखन', मथळे, अग्रलेख, फोटोखालील विधाने, व्यंगचित्रातून घडणारा संवाद इत्यादी घटक असतात.या सर्व प्रकारच्या लिखाणातून भाषा हा घटक महत्त्वपूर्ण भूमिका बजावताना दिसतो.वास्तविक पहाता, बातमी लेखनामध्ये बातमीदाराला स्वत:च्या मतदर्शनाला वाव नसतो.कमीत कमी शब्द माध्यमातून जास्तीत जास्त आशय व घटनेचे वास्तव प्रकट करण्यावरती भर दिला जातो. बातमी ही नेहमी निरपेक्ष व संक्षेपशील असल्याने समाजातील 'आज' ला कमीत कमी शब्दांच्या सहाय्याने प्रतिबिंबित करीत असते. बातमी लेखनामध्ये वाचकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी वेगवेगळया प्रकारची शब्दरचना केली जाते.उदा : भारत पाकिस्तान वन डे क्रिकेट मॅच असेल तर आतापर्यंतचा पारंपरिक भारत पाकिस्तान संघर्षाचा इतिहास मागे ठेवून बातमीचे प्रयोजन केले जाते. यामध्ये हिंदीत सरावलेल्या मराठीत 'धो डाला' या शब्दांच्या सहाय्याने व्यक्त केला जातो. बातमीकडे सर्वसामान्य वाचकांप्रमाणेच समाजाच्या वरच्या थरातील लोक व अगदी ग्रामीण भागातील एका सर्वसामान्य शेतक—याला डोळयासमोर ठेवून शब्दरचना केली जाते. बऱ्याच वेळेस असंख्य शब्दांचा भडीमार करण्याऐवजी परिपूर्ण अशा संयुक्त क्रियापदांच्या सहाय्याने एकाच शब्दाचे प्रयोजन केले जाते.त्यामुळे

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Referred) ISSN – 2454 - 7905

बातमीलेखन करण्यासाठी वापरली जाणारी भाषाही व्याकरणिक रचनेत बंदिस्त न करता शब्दांची मोडतोड करून वाक्यरचना केली जाते जेणेकरून संबंधित घटक समाजाच्या सर्व थरातील लोकांना त्यांचे सहज आकलन होवू शकेल. बदलत्या समाजवास्तवाचे पृष्टस्तरीय व अंतस्तरीय चित्र कवेत घेवून बातमीलेखन केले जाते.वास्तविक पहाता, बातमीचे सामर्थ्य वाढते ते तिच्या वेचक नीटस्, संक्षेपशील शब्दरचना व वाक्यरचनेमुळे. बातमी ही समाजवैविध्य व्यक्त करणारी असते, कारण त्या माध्यमातून अनेकांची मते असतात याबरोबरच त्यातील बातम्या या निरपेक्ष असतात.

मथळ्यांमध्ये वापरली जाणारी भाषा:

वृत्तपत्रातील मथळ्यांच्या सहाय्याने ठळक गोष्टींना प्राधान्य दिले जाते. याबरोबरच समाजभावना मथळ्यांच्या सहाय्याने तीव्र शब्दात व्यक्त होतात. मथळ्याचे नेमके स्वरूप 'व्यावहारिक मराठी' या ग्रंथामध्ये ल. रा. नसिराबादकर यांनी पुढीलप्रमाणे व्यक्त केले आहे, ''वाचकांचे लक्ष वेधून घेईल असा मथळा –स्मंक' बातमीला देणे अत्यंत आवश्यक असते, किंबहुना बातमीची यशस्विता ही मथळ्यावरच अवलंबून असते. अगदी थोडक्या शब्दांत बातमीचा महत्त्वाचा अंश मथळ्यात यावा. शक्यतो चार पाच शब्दांपेक्षा त्याची लांबी अधिक असू नये. शिवाय मथळा सोप्या भाषेत असावा. मथळ्यामुळेच वाचक बातमी वाचायला प्रवृत्त होतात. मथळा सामान्यत 72 पॉईंट टाइपात –सुमारे अडीच सेंटीमीटर' दिला जातो. टाईपाच्या पॉईंटवरून वाचकाला बातमीचे महत्त्व/गांभीर्य लक्षात येते."[2] यावरून मथळा लेखनासाठी वापरली जाणारी भाषा व तिचे नेमके स्वरूप आपल्या लक्षात येते. वाचकांच्या मनावरती मथळा ठसावा यासाठी इतर मजकुरापेक्षा त्याची जाडी तर मोठी असावीच याबरोबरच भाषादेखील सोपी व सुटसुटीत असावी हे या माध्यमातून स्पष्ट करता येईल.

वृत्तपत्रामध्ये वापरली जाणारी भाषा ही बातमीदाराची भाषा असते. हा बातमीदार समाजाच्या वेगवेगळ्या थरातील लोकांच्या समस्या शब्दमाध्यमांच्या सहाय्याने प्रतिबिंबित करीत असतो. त्यामुळे एखादी बातमी सिध्द करण्यासाठी त्याच्याकडे भाषाप्रभुत्त्व असणे ही बाब अत्यंत आवश्यक आहे. एखादया ललित लेखकाची भाषा आणि बातमीदाराची भाषा यामध्ये जरी अंतर असले तरी देखील समाज हा घटक दोघांच्यासाठी संयुक्तिक स्वरूपाचा असल्याने लोकांची नेमकी भाषाशैली दोघांनाही माहिती असणे अत्यावश्यक आहे. वास्तविक पहाता, लेखकाप्रमाणे ललित्यपूर्ण, अलंकारिक, प्रतिमाबध्द अशा प्रकारचे लेखन करण्याची आवश्यकता बातमीदाराला नसते. याबरोबरच काल्पनिक लेखन करणे ही त्याच्या दृष्टीने अनर्थकारक असते.कमीत कमी शब्दात, जास्तीत जास्त आशय आणि सत्य प्रकट करणे हे प्रत्येक बातमी लिहिणा–या बातमीदाराचे कर्तव्य असते. कारण बातमी ही समाजाच्या दृष्टीकोनातून महत्त्वाची असते. सामाजिक वर्तनाची, कृतीची, भावनेची, परिस्फोटाची, विचारांची क्रियाप्रतिक्रियांची परिपूर्ण माहिती बातमीच्या सहाय्याने समाजापर्यंत जात असते. त्यामुळे प्रत्येक बातमीला 'ह्युमन टच□ असावा लागतो.

मानवी मनाचे स्पंदन जिथे जिथे आहे, तिथे तिथे परिवर्तन व बदल हे अपरिहार्य ठरते.अशा सर्वच ठिकाणी बातम्याचे अस्तित्त्व असते. बातमी लेखनासाठी निसर्गातील चमत्कार, गूढ रहस्ये, बदल जास्त महत्त्वाचे ठरतात. त्याचप्रमाणे पशू, पक्षी, प्राणी आणि मानवाच्या कृती उक्तीशी त्यांच्या चांगल्या वाईट प्रवृत्तींशी, वर्तनाशी, सुसंगत, विसंगत आचारविचारांशी त्यांच्यातील सुसंवादी, विसंवादी, आणि संपर्कांशी बातम्या निगडीत असतात. त्यामुळे बातमी लेखनासाठी वापरली जाणारी भाषा ही देखील सर्वसमावेशक अशा स्वरूपाची असणे आवश्यक ठरते.

अग्रलेखांसाठी वापरली जाणारी भाषा:

अग्रलेखांच्या माध्यमातून समाजातील महत्त्वपूर्ण घटनाप्रसंगावर भाष्य केले जाते.हे भाष्य दैनिकाचा संपादक ज्या सामाजिक बांधिलकीतून करतो आहे ते देखील महत्त्वाचे असते. त्यामुळे त्यांचे व्यक्तीमत्त्व, दृष्टीकोन, समाजाला वळण देण्याची, समृध्द करण्याची त्याची क्षमता, हेतू, बांधिलकी यासारख्या गोष्टी अग्रलेखांसाठी महत्त्वाच्या असतात अग्रलेख लिहिण्यासाठी वापरली जाणारी भाषा ही जोरकस प्रभावी

Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Referred) ISSN – 2454 - 7905

आणि परिणामकारक हवी कारण 'अग्रलेख' हे वर्तमानकाळातील महत्त्वाच्या सामाजिक घटनांचे दैनंदिन साक्षीदार असतात. तरीही वैचारिक व व्यापक बदल घडवत तात्कालिकतेला बाजूला टाकीत, स्थिर संग्राहय जे जे ते ते अधोरेखित करण्याचे कार्य हे अग्रलेख करतात. यामुळे स्वाभाविकच अग्रलेख हा त्या समाजाचा गाळीव इतिहास असतो. हा इतिहास प्रभावीपणे व्यक्त करण्यासाठी भाषा हा घटक महत्त्वपूर्ण ठरत असतो. त्यामुळे अग्रलेखांची भाषा ही जोरकस आणि परिणामकारक असते. संपादक ही एक व्यक्ती वर्तमानपत्रांच्या माध्यमातून प्रातिनिधीक स्वरूपात भाष्य करीत असल्याने अग्रलेख हा काळाशी समांतर असतो. त्यामुळे स्वाभाविकपणे संपादकाला हे कार्य रोजच्या रोज करावे लागत असल्याने झटपट व्यवहार करणा–या व्यवहारी भाषेला तो आपलेसे करतो. अग्रलेखांच्या माध्यमातून अभिव्यक्त होणाऱ्या भाषेशी संपादकाचा संबंध असल्याने थोडक्यात एका जबाबदार, विचारवंतांचा आविष्कार असल्याने प्रमाण, प्रौढभाषेचा बाज हा संपादक सांभाळतो.

वृत्तपत्रातील प्रादेशिक भाषेचे स्वरूप:

तुकोबा म्हणतात की विनाकारण मी ताठपणा घेऊन जगलो असतो, कुणबी केलस हे फार बरं झालं हे सांगून विनाकारण वर्णन अथवा जातीचा अभिमान बाळगणे व्यर्थ आहे हे सूचन ते करतात व वेदांचा अर्थ हा फक्त काहींनाच माहिती असतो हा संकेत फोल ठरवून छातीठोकपणे ते सांगतात की,

'वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा ।

येरांनी वाहवा भार माथा ।'९

नाहक एखाद्या गोष्टीविषयीची मक्तेदारी कुणी घेऊ नये असा इशाराच या योगे तुकोबा देताना दिसतात. तुकोबांच्या आयुष्यात अनेक घटना प्रसंग घडले ज्यातून त्यांनी सर्वसामान्य माणसांना जगत असताना कोण कोणत्या गोष्टींना सामोरे जावे लागते या विषयीचे चिंतन ते मांडताना दिसतात. काही मंडळी साधुत्वाच्या नावाखाली भोंदूपणा कसा करतात याविषयी ते सांगतात.

ऐसे कैसे झाले भोंदू । कर्म करुनी म्हणती साधू ।।
अंगा लावूनिया राख । डोळे झाकून करिती पाप ।।
दावुनी वैराग्याची कळा । भोगी विषयाचा सोहळा ।।१०

मूळ साधुत्व अथवा संतत्व कशाला म्हणतात याची माहितीही नसणाऱ्या फसव्या साधुंकडून सर्वसामान्य माणूस कसा नाडला जातो हे तुकोबा सांगतात व त्यांच्यापासून सावध राहायला सांगतात. याच बरोबरच देवाच्या नावे वेगळया उपास-तापास, नवस-सायास याविषयी सुद्धा लोकांना खडेबोल सुनावताना म्हणतात.

'सेंदराचे दैवत केले । नवस बोलले तयासी ।।
नवसे कन्यापुत्र होती । तरि का करणे लागे पती ।।'११

Mahavidyalaya ★ Dr. Babasaheb Ambedkar

कुठल्याही दगडाला शेंदूर फासून त्याला देव बनवण्याचा व त्याच्या नावावर आपले पोट भरायचे हा भोंदूपणा उघड करून नवसाच्या नावाखाली पुत्रप्राप्ती होत असेल तर लग्नच का करावे लागते ? असा वैज्ञानिक प्रश्न तुकोबा विचारून लोकांना फसवू नका असा संदेश देऊन जातात.

तुकाराम महाराज हे संवेदनशील मनांचे आहेत, साधेपणा त्यांचा स्थायीभाव आहे. मात्र याचा कोणी गैरसमज करून घेऊ नये असे ते सांगतात. कारण 'आम्हाघरी धन शब्दांचीच रत्ने शब्दांचीच शस्त्रे यत्न करू' असा शब्दांवर हुकूमत गाजवणारे आम्हीच आहोत असे सांगतात व आम्हाला वेगळे समजून त्रास देण्याचा प्रयत्न करू नका हे सांगताना म्हणतात-

मऊ मेणाहून आम्ही विष्णुदास । कठीण वज्रास भेदू ऐसे ।
मेले जित असो निजोनिया जागे । जो जो जे जे मांगे ते देऊ ।।
भले तरी देऊ गांडीची लंगोटी । नाठाळाच्या काठी देऊ माथा ।।
मायबापाहूनी बहु मायवंत । करू घातपात शत्रूहुनी ।।'१२

आम्ही खूप मऊ आहोत पण प्रसंग पडला तर कठीण दगडही फोडू शकतो. चांगल्या माणसाबरोबर चांगलेच वागतो. मग त्याच्यासाठी काहीही करायला लागो मात्र नाटाळपणा केल्यास डोक्यात काठी सुद्धा घालायला मागेपुढे बघणार नाही असेही सांगतात. शिवाय मायबापा इतकेच कृपावंत जरी असलो तरी शत्रु सोबत घातपातही करू इतके बळकट आम्ही आहोत. असा गर्भित इशारा तुकोबा देताना दिसतात. थोडक्यात तुकोबांनी आपल्या परखड शब्द प्रयोगातून तत्कालीन दांभिकपणा, भोंदूपणा, अंधश्रद्धा, जातीयता, भेदभाव इत्यादी गोष्टींना नामशेष करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. त्यामुळे त्यांना 'विद्रोही तुकाराम' की बिरुदावली चपखल बसते.

एकूणच माध्ययुगीन कालखंडातील संतांनी आपल्या अभंगरचनेतून परखड शब्दांच्या सहाय्याने मानवघातकी असणाऱ्या गोष्टी, वर्तनप्रणाली याचे चित्रण करून सामान्य जनतेचे दुःख अधोरेखित केले आहे असे म्हणावे लागेल. या सर्व संतांनी त्यांच्या शब्दांचा माध्यमातून मांडलेल्या विद्रोहामागे एक सम्यक विचार, परिवर्तनवादी दृष्टी कार्यरत असलेले प्रत्ययास येते.

निष्कर्ष:

१. मध्ययुगीन कालखंडातील अत्यंत प्रभावी चळवळ म्हणून संतसाहित्याचा संदर्भ द्यावा लागेल.
२. विषमतामूलक समाजरचनेत मानवता प्रस्तापित करण्यासाठी सर्व जातीधर्मातील संतांनी अभंगरचना केली आहे.
३. माणसाला माणूसपण नाकारणाऱ्या व्यवस्थेविरुद्ध संतांची लेखणी आवाज उठवताना दिसते.

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

४. संत कबीर बसवेश्वरांपासून तुकोबापर्यंत विद्रोही रचनेच्या रूपाने परिवर्तनवादी व सम्यक विचारसरणी अविष्कृत होताना दिसते. (139)

५. संतांना अस्पृश्यता, भोंदूपणा, अंधश्रद्धा, अमानुषता इत्यादी विषयांवर अभंग रचना द्वारे प्रकाशझोत टाकलेला दिसून येतो.

संदर्भ:

१. संत साहित्य आणि दलित संवेदना, संपादक- प्राचार्य रा.तू.भगत, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, पृ. ५६

२. संत साहित्य आणि दलित संवेदना, संपादक- प्राचार्य रा.तू.भगत, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, पृ. १२५

३. संत साहित्य आणि दलित संबेदना, संपादक- प्राचार्य रा.तू.भगत, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, पृ. १२४

४. संत साहित्य आणि दलित संबेदना, संपादक- प्राचार्य रा.तू.भगत, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, पृ. १४९

५. चोकोबाचा विद्रोह , शंकरराव खरात, सुगावा प्रकाशन, पुणे पृ. ३१

६. चोकोबाचा विद्रोह , शंकरराव खरात, सुगावा प्रकाशन, पुणे पृ. ३६

७. चोकोबाचा विद्रोह , शंकरराव खरात, सुगावा प्रकाशन, पुणे पृ. ३६

८. तुकारामांचे निवडक अभंग, डॉ. प्र.न.जोशी, स्नेहवर्धन पब्लिसिंग हाऊस, पुणे पृ.४७

९. विद्रोही तुकाराम, डॉ. आ.ह.साळुंखे, सदाशिव बागायतकार स्मृतिमाला, पुणे पृ . ३३४

१०. विद्रोही तुकाराम, डॉ. आ.ह.साळुंखे, सदाशिव बागायतकार स्मृतिमाला, पुणे पृ . ३५०

११. विद्रोही तुकाराम, डॉ. आ.ह.साळुंखे, सदाशिव बागायतकार स्मृतिमाला, पुणे पृ . ३४३

१२. मध्ययुगीन मराठी वाङ:मयाचा इतिहास (प्रारंभ ते १६००) प्रा. नरेंद्र मारवाडे, प्रा. सुशीला सोलापुरे, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, पृ. १०९

Principal
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya
Peth Vadgaon, Dist. Kolhapur, Maharashtra

ISSN 2278-3199
Volume - 09, Issue - 02, July - December, 2020

A Half Yearly Peer Reviewed Multidisciplinary
National Research Journal of Social Sciences & Humanities...

National Journal on ...

SOCIAL ISSUES AND PROBLEMS



Gondia Education Society's

SETH NARSINGDAS MOR ARTS, COMMERCE &
SMT. GODAVARI DEVI SARAF SCIENCE COLLEGE
TUMSAR, DIST. BHANDARA - 441912.

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

'Social Issues and Problems'

- CONTENTS –

	Title of Paper	Author Name	Page
1.	Annihilation of caste, Modernity, and changing trend	Varsha Bhujbal	...1
2.	The Mill on the Floss: An Autobiographical Novel	Kaneezbanoo Quraishi	...5
3.	Mistry's Women: Microcosm of Indian Society	Radheshyam Dipte	...8
4.	Customer Problems in Insurances Scheme and Companies	Amritanjali Singh	...12
5.	The Problems of Water Management and Possible Strategies	Siddharth Nisargandha	...14
6.	Mass Communication in Ancient and Medieval India	Mubaraque Quraishi	...16
7.	Covid-19 and Social Development	Kedarsingh Rotele	...18
8.	Academic Content on Internet and Access to It!	Hemangi Kulkarni	...21
9.	Protection of Women Against Domestic Violence	M. Dharmapurikar	...24
10.	Anti-Human Trafficking Laws in India: Challenges and Strategies	S. Vijay Kumar	...28
11.	Awareness and Level of Utilization of Agritourism Centre's y	Prachiti Bagaday	...32
12.	Cashless Economy – Challenges and Opportunities in India e	P. W. Ramteke	...36
13.	Covid-19, Muslim Community and Indian Media	Shivaji Jadhav	...40
14.	Use of ICT in the Teaching of English Language at UG Level	Ganesh M. Pathode	...44
15.	Amendment and Protection of Children from Sexual Offences	Devendra Sontakke	...47
16.	The Contribution of 'Swadhar' in Childhood Development	Vidya Avachat	...50
17.	Hegemonic Masculinity in Indian Media and Films	Amol M. Khandwe	...54
18.	Domestic Violence against Women	Vinayak Sakharkar	...56
19.	Reading Revolution, Vision & Mission	Prashant S. Pagade	...60
20.	खेल का महत्व और संस्थागत प्रमुख की भूमिका	मोहम्मद ऐजाज शेख	...62
21.	दहेज प्रथा एक गंभीर समस्या	अनिलकुमार गुप्ता	...66
22.	वर्तमान सामाजीक समस्या और कबीर की प्रासंगिकता	वेदिका बनोठे	...69
23.	जैवविविधतेचा परिस्थितीकी मधील सहभाग	अल्का दुधबुरे	...71
24.	'बलात्कार' गुन्हयांचे समाजशास्त्रीय विश्लेषण	प्रमिला भुजाड	...75
25.	विदर्भातील लोकसंख्येचे प्रक्षेपण – २०२१	अरूणा बावनकर	...78
26.	कवी गोविंदसुतांची 'गुरुजी' एक आकलन	जयश्री सातोकर	...80
27.	मर्ढेकरांच्या कवितेतील अध्यात्मिक जाणिवा	राजेश आर. दिपटे	...82
28.	कोव्हिड–१९ उगम, प्रसार, प्रतिबंध आणि भारतीय समाज	जयंत घाटगे	...84
29.	अण्णाभाऊ साठेंना अभिप्रेत असलेले समाजपरिवर्तन आणि सद्यकालीन वास्तव	मा. म. गायकवाड	...89
30.	प्रवासी मजुरांच्या समस्या	बंडू पाटेकर	...92
31.	नवीन शैक्षणिक धोरण	निशा कळंबे	...93
32.	दिल्लीच्या गादीवर शासन करणारी पहिली महिला – रझिया सुलतान	प्रमिला डी. भोयर	...96
33.	सामाजिक प्रश्न आणि समस्या	प्रमोद पौनिकर	...99
34.	वृध्दांकडे समाजाचा बघण्याचा दृष्टिकोण, समस्या व उपाय	राजेंद्र बारसागडे	..103
35.	भंडारा जिल्हयातील ग्रामीण महिलांच्या आर्थिक विकासात बचतगटांची भुमिका.....	राजेंद्र बी. कापसे	..106
36.	वर्धा शहरातील स्त्रियांची उच्च शिक्षणातील सहभागीता	वासंती अर्जापुरे	..108
37.	आदिवासी महिलांचे शिक्षण एक चिकित्सक अध्ययन	ए. आर. वागडवे	..111

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

कोव्हिड–१९ उगम, प्रसार, प्रतिबंध आणि भारतीय समाज

प्रा. घाटगे जयंत चंद्रकांत, सहयोगी प्राध्यापक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, पेठ वडगांव

प्रास्ताविक : समस्त मानवजात एका विचित्र व अघटित कालखंडातून जात आहे. मानवी जीवनात असे व इतके अडथळे येतील अशी कोणीही कल्पना केली नव्हती. आज कोव्हिड–१९ ने जे थैमान घातले आहे ते मानवी इतिहासात प्रथमच घडत आहे, कारण सुमारे अडीच हजार वर्षांपूर्वी ग्रीस देशात उगम पावत महामारीत रूपांतरीत झालेल्या टायफॉईड सदृश्य आजाराने जगातील जवळजवळ दोन तृतियांश लोकसंख्या गिळंकृत केली होती. चौदाव्या शतकात चीन मध्ये उगम पावलेल्या व अर्ध्या जगात पसरलेल्या प्लेगच्या महामारीने सुमारे बौस कोटी इतकी प्रचंड लोकसंख्या मृत्यमुखी पडली होती. शतकभरापूर्वी जगभर थैमान घातलेल्या स्पॅनिश फ्ल्युमुळे जवळजवळ पाच कोटी लोकांचा बळी घेतला होता. भारतात या महामारीमुळे सर्वात जास्त जिवित हानी झाली होती. यानंतर टप्याटप्याने आलेल्या इबोला, मर्स, झिका, निपा या सर्व साथरोगांच्या पार्श्वभूमीवर महामारीची टांगती तलवार लटकवत ठेवली आहे. आजघडीला जगभरातील सगळे देश सार्स कोव्हिड व्हायरस–२०१९ मुळे पसरलेल्या आजाराने चिंताग्रस्त झाले आहेत. या आजाराने महामारीचे रूप घेतल्याने विकसीत आणि विकसनशील देशांच्या आर्थिक व आरोग्य व्यवस्थेच्या मर्यादा जगासमोर उघड केल्या आहेत. या सर्व बाबींचा विचार करता अशी चिंता निर्माण होते की आजअखेर भरतात कालगणना करत असताना स्वातंत्र्यापूर्व व स्वातंत्र्योर काळ असा शब्दप्रयोग केला जात होता. आज मात्र अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, भारतात कालगणना करताना यापुढे 'कोव्हिड १९ पूर्व' व 'कोव्हिडोत्तर' अशी करावी लागेल की काय अशी शंका मनात निर्माण होऊ लागली आहे.

कोरोनाचा प्रसार : कोव्हिड विषाणूसाठी आता जागतिक आरोग्य संघटनेच्या निर्देशांनुसार, 'कोव्हिड–१९' अशी संज्ञा वापरली जाते. कोव्हिड मधील 'को' म्हणजे 'कोरोना', 'व्हि' म्हणजे 'व्हायरस', आणि 'डी' म्हणजे 'डिसीज' आणि १९ म्हणजे २०१९ या वर्षात उद्भवलेला संसर्गजन्य आजार. डिसेंबर २०१९ मध्ये चीनच्या हुबेई प्रांतातील वुहान मध्ये उगम पावलेल्या कोव्हिड–२ कुटुंबातील सातव्या विषाणूने जगभर अक्षरश: थैमान घातले आहे. याची तिव्रता इतकी भयावह आहे की जागतिक आरोग्य संघटनेने २०१९–२० हे वर्ष कोरोना विषाणूचा उद्रेक, आंतराष्ट्रीय चिंताजनक आपत्ती म्हणून ३० जानेवारी २०२० रोजी जाहीर केले व ११ मार्च २०२० रोजी हा जागतिक संसर्गजन्य आजार 'महामारी' म्हणून घोषित केला. आज जगभरातील १९६ देशापैकी सुमारे १७५ पेक्षा अधिक देशात या महामारीने आपली पाळेमुळे रोवली आहेत. श्वसनमार्गातून आणि संपर्कातून या विषाणूचे संक्रमण होऊ शकते. दिनांक २४ ऑक्टोंबर २०२० रोजीच्या गुगलवरील आकडेवारी नुसार कोव्हिड बाधीतांची जगाच्या पातळीवरील संख्या ४२,५२१,०३६ इतकी असून या आजाराने बळी घेतलेल्या रोग्यांची संख्या ११,४९,५३५ इतकी आहे. यापैकी ९,८५१,९९५ रोगी बाधीत असून त्यातील अत्यवस्थ अवस्थेत असलेल्यांची संख्या ७६,५४३ इतकी आहे. या विषाणूच्या अल्पवधीतच जगभर झालेल्या प्रसारामुळे इतका जनक्षोभ उसळला आहे की, सर्वशक्तीमान मानल्या जाणाऱ्या अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनाही लोकक्षोभापुढे आपले व्हाईट हाऊस सोडून बंकराचा आसरा घ्यावा लागला, यावरून ही महामारी किती भयावह आहे याची जाणीव सर्वांना होईल. भारतात सर्वात पहिली कोरोना विषाणूबाधित व्यक्ती केरळ राज्याच्या त्रिसुरमध्ये, जिचा संबंध चीनमधील वुहान प्रांताशी आला होता, ती ३० जानेवारी २०२० रोजी सापडली, तर सौदी अरेबियातून आलेल्या ७६ वर्षीय वृध्दाचा पहिला बळी गेला होता. आज भारतात कोरोना बाधीतांची संख्या ७,८१४,८६२ असून या आजाराने बळी पडलेल्यांची संख्या १,१७,९९२ इतकी आहे. भारतातील बहुसंख्य राज्यांमध्ये कोरोनाचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला असून त्यामध्ये मुख्यत: महाराष्ट्र, दिल्ली, आंध्रप्रदेश, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, गुजरात, पंजाब व हरियाणा यांचा समावेश करता येतो. भारतात एकुण कोरोनाबाधीत रूग्णापैकी ७० टक्के रूग्ण महाराष्ट्र, तामिळनाडू, दिल्ली, गुजरात आणि उत्तर प्रदेश या पाच राज्यात केंद्रीत आहेत.

सुरूवातीला या महामारीच्या प्रसाराला रोखण्यासाठी योग्य उपायांचा शोध घेण्याएवजी भारतातील सत्ताधाऱ्यांकडून टाळ्या आणि थाळ्या वाजवून, मेणबत्या प्रज्वलित करून, विमानातून पुष्पवृष्टी करून कोरोनाचा प्रसार आपल्याला रोखण्यात यश मिळवता येईल असा भावडा आशावाद लोकांच्या मनात निर्माण करण्याचा आचरटपणा केला. पण या तकलादू मार्गांनी कोरोनाला आपण हरवू शकणार नाही हे वास्तव भारतीयांच्या लक्षात यायला फारसा वेळ लागला नाही. पण या दिरंगाईमुळे कोरोनाचा प्रसार जलद गतीने संपूर्ण भारतभर झाला ही वास्तवता आपल्याला मान्य करावी लागेल. नंतरच्या काळात जाग आलेल्या सराकारने या महामारीला आळा घालण्याच्या हेतूने, आपण घेत असलेल्या निर्णयाचा कसा आणि किती परिणाम समाजजीवनार होईल याचा विचार न करताच, मन मानेल त्याप्रमाणे काही उपाय जाहिर करण्याचा सपाटाच लावला. यापैकी सर्वात महत्वाचा निर्णय म्हणजे टाळेबंदीचा: या तात्काळ पुकारण्यात आलेल्या निर्णयाचा फटका म्हणजे केवळ चार तासात सर्व देश बंद, कोणीही जागेवरून हलायचे नाही, परिणामी बाहेरगावी व परराज्यात कामधंदा करून पोटापाण्याची तरतूद करण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करणारे लोक झटक्यात आहे त्या ठिकाणीच बंदिस्त झाले. अशांची संख्या सुमारे आठ ते दहा कोटी होती. त्यांच्यावर लादण्यात आलेली स्थलांतर न करण्याची बंदी किती कालावधीसाठी असेल हे ही स्पष्ट नव्हते. परिणामी चुकीच्या पध्दतीने केलेल्या या पहिल्या लॉकडाऊनच्या वेळी कोरोना बाधितांची अवघी पाचशेच्या आसपास असलेली संख्या लाखाच्या जवळ पोहचली.

कोरोनाचे सामाजिक परिणाम:– १ बेकारीत झालेली वाढ : कोरोनाच्या झपाट्याने झालेल्या प्रसाराचा फटका सर्वात जास्त

Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Peth Vadgaon Dist Kolhapur

विकायचा हा प्रश्न निर्माण झाला, तर 'शहरातील लोक' 'ताजा भाजीपाला व दूध' अशा जगण्यासाठी अत्यंत आवश्यक गोष्टींपासून वंचित व्हायला लागले आहेत. प्रवासाची सर्व व्यवस्था पूर्णपणे कोलमडून पडल्याने अशा विविध ठिकाणी छोटे–मोठे व्यवसाय करून चरितार्थ चालवण्याचा प्रयत्न करणाऱ्या लोकांमध्ये असंतोषाच्या ज्वाला भडकू लागल्या, समाजात अशांतता निर्माण व्हायला सुरुवात झाली, परीणामी समाजाच्या तळातील समाजगटामध्ये खदखदत असलेला असंतोष ही एक प्रमुख सामाजिक समस्या म्हणून उदयाला आली आणि वाढीस लागली.

देव देवळात बंदिस्त झाले : या अवस्थेत चंदाचा दसरा साजरा करण्याची धडपड भक्तांकडून केली गेली. सर्व देवळांच्या आणि धार्मिक स्थळांच्या बाहेर लागणाऱ्या भक्तांच्या रांगा दिसेनाशा झाल्या आणि सर्वत्र बंदीच्या अवस्थेतच गणेशोत्सव, दसरा व दिपावली हे धार्मिक सण व उत्सव कसे साजरे करायचे असा शासनाने आदेशच जारी केला. परीणामी सर्वांसामोरच हे उत्सव कसे साजरे करायचे हा प्रश्न आज 'आवासून' उभा राहिला आहे. गणेशोत्सव तर अगदी साधेपणाने साजरा केला गेला. गणेशोत्सव व दसऱ्यासाठी विविध प्रकारच्या मुर्ती तयार करणाऱ्या कारागिरांचा धंदाच संपुष्टात आला. दसरा दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर ग्राहकांकडून मोठ्या प्रमाणत होणारी विविध गोष्टींची खरेदी पैशाच्या अभावाने थंडावली. याचा फटका वर्षभर अत्यंत आतुरतेने वाट पाहणाऱ्या मोठ्या दुकानदारांपासून ते स्वत: दिपावलीसाठी विविध प्रकारच्या मेणबत्या, आकाश कंदिल निर्माण करून चार पैसे गाठीशी बांधण्याचा प्रयत्न करणाऱ्या लोकांच्या कामावर व या वस्तूची दारोदार विकी करणाऱ्या विकेत्यावर झाला. या कालावधीत विविध कामात गुंतून राहणाऱ्या असंख्य तरूणांवर व या परंपरागत पध्दतीने वस्तूंच्या निर्मीतीवर जीवन निर्वाह चालवण्याची धडपड करणाऱ्या छोट्या कारागिरांवर पडला आहे. देवालयेही सक्तीने बंद करण्यात आली असल्यामुळे देवळांच्या आजूबाजूला काही ना काही व्यवसाय करून आपली व आपल्या कुटुंबियांची रोजची भूक कशीबशी भागवण्यत धन्यता मानत असलेल्या विविध लोकांचे छोटे–छोटे व्यवसायही बंद पडले, परीणामी देवळाचे पूजारी व देवळांशी संबंधित लोकांवर या सर्वांचा विपरीत परीणाम व्हायला सुरुवात झाली. देवालये उघडण्यात यावीत या आग्रही मागणीसाठी शासनावर दबाव आणायला सुरुवात झाली. त्यासाठी वेगवेगळ्या मार्चाचे आयोजन करण्यात येऊ लागले. राजकीय नेतृत्वानेही यावर आपली सत्तेची राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी अशा मोर्च्यांना पाठींबा द्यायला सुरुवात केली.

कायदा व सुव्यवस्थेची समस्या : या कालावधीत कायदा व सुव्यवस्थेची समस्या महत्वाची बनत गेली. हाताला काहीच काम नाही, पोटाला काय खायचे व घरातील लोकांची उपासमार कशी थांबवायची या चिंतेने सतत ग्रस्त झाल्यामुळे अवैध धंद्यांना प्रचंड प्रमाणात ऊत आला, जुगार, आकडा लावणे, देशी दारू अगर मद्याची अवैध वाहतुक रोखणे, रस्त्यावर नागरिकांची चौकशी करणे, कागदपत्रांची तपासणी करणे, त्यांनी मास्कचा वापर केला आहे की नाही पाहणे, या बरोबरीनेच मद्याचा अवैध साठा शोधून काढण्यासाठी विविध ठिकाणी छापे टाकणे, शासनाने जरी मद्य विकायला परवानगी दिली असली तरी विकी केंद्राजवळ एकत्र येणारे ग्राहक सामाजिक अंतर पाळण्याच्या नियमांचे पालन करतात की नही, त्यांनी मास्कचा वापर केला आहे की नाही याकडे जातीने लक्ष देणे, वापरला नसेल तर त्यांच्यावर गुन्हे दाखल करणे अशा असंख्य कामात पहिल्या टाळेबंदीपासून स्वत:ला गुंतवून घेतलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांवर हल्ल्याच्या एकूण १८४ घटना घडल्याची नोंद पोलीस चौकीत झाली असून या अंतर्गत ८१ हजार गुन्ह्यांची नोंदही झाली आहे तर १८ हजार ७२२ गुन्हेगारांना पोलिसांकडून अटकी करण्यात आली आहे. शिवाय अशा घटना ना आव्हा चालण्याची जबाबदारी पार पाडत असताना कोरोना पॉजिटिव्ह आल्याने कित्येक पोलिसांना आपला जीवही गमवावा लागला आहे. याप्रमाणेच समाजातील लोकांमध्ये असंख्या व्यसनांचे प्रमाण सातत्याने वाढत गेले आहे. अशा सर्व बाबींना राजभर स्वत:ची अगर कुटुंबियांची चिंता न करता पोलिसांना तोंड द्यावे लागत आहे.

या सर्व चक्रावून टाकणाऱ्या बाबीमुळे टाळेबंदीच्या कालावधीत लोकांच्या मनात कायद्याविषयी काही धाक उरला आहे की नाही, कायद्याचे रक्षण करणाऱ्या पोलिसांच्या वर्दीला हात घालण्याचे धडस समाजातील लोकांत का व कसे निर्माण झाले आहे. असा रास्त प्रश्न माझ्यासमोर उभा राहिला आहे. आरोग्य कर्मचाऱ्यांना तर या कालावधीत वेळ पडेल त्यावेळी कार्यरत राहावे लागले. पोलिस कर्मचाऱ्याबरोबरच आरोग्य सुविधा पोहचवण्याची स्वत:हून स्विकारलेली जबाबदारी पार पाडणाऱ्या आरोग्य सेवक सेविका, अशा कर्मचारी व महिला बचत गटातील सदस्यांपर्यंत, सर्वांकडे एका बाजूला अभिमानाने तर दुसऱ्या बाजूला संशयाने पाहण्याचे प्रमाण वाढत गेले. हे सर्व अगदी झोपडपट्ट्यांपासून सोसायटी, कॉलनी, अपार्टमेंट, वाड्या–वस्त्यांपर्यंत सर्वत्र दिसून येऊ लागले आहे. याचाच अर्थ समाजामध्ये सर्वत्र संशयाचे वातावरण वाढीस लागले व यातून सामाजिक समस्यांत भर पडली.

आरोग्य सेविका महिला बचत गट व आशा कर्मचाऱ्यांची भूमिका : आरोग्य सेवकांच्या बरोबरीनेच ग्रामिण भागातील अशा वर्कर्सस आणि महिला बचत गटाच्या योगदानाचा थोडक्यात आढावा घेणे आवश्यक आहे. देशपातळीवर कार्यरत असलेल्या महिला बचत गटांकडून आपल्या परीने सुरुवातीपासूनच कोव्हिड रोखण्यासाठी प्रयत्न केले आहेत. उदाहरणार्थ राजस्थानमधील सुमारे ३९ कोटी लोकांपर्यंत कोव्हिड संदर्भात विविध सूचना देण्याचे प्रभावी कार्य आशांकडून केले. मेघालयामध्ये सुमारे ६७,००० अशा कार्यकर्त्यांनी कोव्हिड प्रसाराविरोधी राज्य सरकारच्या लढाईमध्ये आरोग्य जनजागृती मोहिमेमध्ये प्रभावी भूमिका पार पाडली. ओरीसामध्ये ४६,७२७ अशा कार्यकर्त्यांनी स्थानिक आरोग्याच्या गरजांची पूर्तता करण्याच्या कामी राज्यशासनाला व आरोग्य विभागाला मोलाची मदत केली. याकामी त्यांना घराबाहेर पडताना मास्कचा वापर करणे, सातत्याने साबणाचा वापर करून हात धुणे, सामाजिक अंतर पाळण्यासाठीच्या नियमांचे

Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

जगासमोरील कोरोनारूपी महामारीचे संकट आटोक्यात येईल. या आजाराशी दोन हात करताना अपयशी ठरून मृत्यूमुखी पडलेल्या, प्रत्यक्ष संपर्क आलेल्या व्यक्ती, त्यांचे कुटुंबिय आजूबाजूच्या व्यक्ती व संपूर्ण समाजातील व्यक्तींच्या मनातील कोरोना विषयी निर्माण झालेली भिती, गैरसमज नष्ट करण्यासाठी, घसरलेली अर्थव्यवस्थेला रूळावर आणण्यासाठी, नेमकी काय उपाययोजना करणे गरजेचे आहे. हे शोधून काढण्यासाठी व कोरोनावर खात्रिलायक लस शोधून काढण्यासाठी शासनाने केवळ घोषणाबाजी न करता अगर या भितीचा आपल्या राजकीय फायद्यासाठी (भारताच्या अर्थमंत्री निर्मला सितारमन यांनी बिहारच्या मतदारांसमोर ' तुम्ही मला मत द्या, मी तुम्हाला लस देते' असे जाहिर आवाहन आपल्या पक्षाच्या उमेदवाराच्या प्रचारासाठी आयोजित केलेल्या सभेत केले होते) वापर करण्याच्या जुमलेबाजीत न पडता पुढे संभवणाऱ्या धोक्यांपासून जागृत होऊन सतत संशोधनावर आपले पूर्ण लक्ष केंद्रीत करणे गरजेचे आहे. हे साध्य झाले तरच आपल्याला 'कोव्हिड १९' च्या रूपात समाजासमोर उभा ठाकलेल्या महामारीच्या समस्येपासून संपूर्ण भारतीय समाजाचे काही प्रमाणात संरक्षण करणे शक्य होणार आहे. अन्यत: या विषाणूच्या प्रसारावर काही प्रमाणात नजिकच्या काळात यश मिळाले त्यातच समाधान माणून अजचे मरण उद्यावर ढकले जाईल असेच वातावरण संपूर्ण जगात व भारतीय समाजात निर्माण होईल कारण प्लेगच्या बाबतीत जसे घडू शकते तसेच कोव्हिड बाबत घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

युरोपमध्ये कोव्हिड १९ च्या प्रसाराच्या दुसऱ्या लाटेमुळे कोव्हिड बाधित झालेल्या रूग्णांची संख्या २ लाख ५ हजार ८०९ इतकी झाल्याचे विशद केले गेले आहे. यामध्ये फ्रान्समधील ५४ हजार आणि ब्रिटनमधील २३ हजार लोकांचा समावेश असल्याचे दिसून आले आहे. भारतातील कोरोनाच्या प्रसारची दुसरी लाट सुरू होण्याचा इशारा एम्सच्या संचालकांनी दिला असून २ व ३ नोव्हेंबर २०२० या दोन दिवसातच कोरोनाच्या नव्या रूग्णांच्या देशातील संख्येत ४८ हजाराची भर पडल्याचे ५६३ रूग्णांचा मृत्यु झाल्याचे दिसून आल्याचे मत एम्सचे संचालक डॉ. गुलेरीया यांनी मांडले आहे. शिवाय यांनी सर्व भारतीयांना योग्य ती खबरदारी वेळीच घेण्याचा सल्लाही दिला आहे. या प्रसाराला वेळीच आळा घालता यावा यासाठी पूर्वीच्या कोव्हिड १९ च्या प्रसाराचा व त्यानंतर उद्भवलेल्या जनक्षोभाचा विचार करून युरोपीयन राष्ट्रातील शासनांनी पुन्हा एकदा कडक लॉकडावून पाळण्याची देशातील लोकांवर सक्ती केली आहे. शिवाय चंडीच्या दिवसात कोव्हिडच्या संक्रमणाची संख्या सर्वात मोठ्या प्रमाणात वाढण्याची शंका तज्ञांकडून व्यक्त करण्यात आली असून केवळ युरोपच नव्हे तर अन्य देशांनाही याचा फटका बसणार असल्याचे संकेत दिले आहेत. याची प्रचिती म्हणून की काय भरताच्या राजधानीत 'दिल्लीत' नव्याने कोरोना लाट सुरू झाल्याचे सुतोवाच दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी नुकतेच केले आहे. ही वास्तवता विचारात घेता आता खरी गरज आहे, ती शासनावरोबरच सर्व भारतीयांनी संघटित होऊन कोव्हिड विरूध्दचा लढा अधिक तिव्र स्वरूपात उभा करण्याची.

संदर्भ सूची: :

१. *डॉ. निता वाटवे, 'कोविड–१९ एक नया खौफ' योजना मे २०२० पान नं ३० ते ३४*
२. *डॉ. चाटे नितीन नारायण, 'कोविड–१९ आणि सेवकांची भूमिका' योजना मे २०२० पान नं. ४२ ते ४७*
३. *डेना नकवी, 'कोरोना काल मे स्वयंसहायता समूहोका प्रभाव अर्थव्यवस्था मे योगदान' कुरुक्षेत्र ऑगस्ट २०२० पान नं. ४४ ते ४७*
४. *दक्षिता, स्वास्थ्य और परिवार कल्याण मंत्रालय 'कोविड खोजा आशा कार्यो' कुरुक्षेत्र ऑगस्ट २०२० पान नं. ४८*
५. *मैसिक आरोग्य योजना मे २०२०*
६. *प्रबोधन प्रकाशन ज्योती एप्रिल ते सप्टेंबर २०२०*
७. *सुजा लोकमत दि. २४ नोव्हेंबर २०२०*
८. *दै. पुढारी २७ दि. २७ ऑक्टोबर २०२० संपिक पान नं. ७*
९. *दै. सकाळ दि. ०५ नोव्हेंबर २०२० पान. नं. १ व ४*

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

Estd. 6 Jan. 1979
Reg.No.:MAH/1184/Kop.
E-mail : bacpvd@yahoo.co.in

UGC (2 f & 12 B) dt. 23 June 2006
Perm. Affi.No.Affi/T.2/SGB/10780 dt.16 Feb.2005
Jr.College Index No.23-06-004 J







Jayprakash Education Society's
DR. BABASAHEB AMBEDKAR MAHAVIDYALAYA
Barrister Tatyasaheb Mane Vidyanagar, Peth Vadgaon - 416112.
Dist. Kolhapur (Maharashtra) Ph.Office : 0230-2471086

(Affiliated to Shivaji University, Kolhapur)

Founder Chairman : **Hon. Adv. Nanasaheb S. Mane** B.A., LLB., Ex.MLA
Chairman : **Shri. Satish S. Mane** M.A., M.Phil
Principal : **Dr. S. D. Disale** M.Sc. Ph.D Mob. : 7709880950

Research papers published per teacher in the Journals notified in UGC Care list during the year (2019-20)

Particulars

Sr. No.	Name of the Teacher	Title of the paper
1.	Dr. A. D. Attar	फातिमा शेख आणि राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक योगदान
2.	Dr. A. D. Attar	महाराष्ट्रातील स्थलांतर प्रश्न आणि उपाय
3.	Dr. S. A. Tavandkar	संशोधन अहवाल
4.	Dr. S. A. Tavandkar	Information Technology & Economic Development
5.	Dr. S. A. Tavandkar	Tourism Industry & Economic Growth (2010-18)
6.	Mr. A. D. Powar	भारतीय अर्थव्यवस्थेचे कॅशलेस मधील स्थान
7.	Mr. A. D. Powar	डिजीटल इंडियाचे भारतातील स्थान

Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Estd. 1979 * Peth Vadgaon

Principal,
Babasaheb Ambedkar Mahavidyalaya
Peth Vadgaon, Dist. Kolhapur, Maharashtra

विद्यावार्ता®

MAH/MUL/02251/2012
ISSN-2319-9318

SPECIAL ISSUE-2020 02


Peer Reviewed International Refereed Research Journal





शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम व
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
यांच्या संयुक्त विद्यमाने

"राजर्षी शाहू, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान" या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

प्राचार्य
डॉ.श्रीकृष्ण चंदनशिव

Scanned with CamScanner

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

विद्यावार्ता™

शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम

व

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

यांच्या संयुक्त विद्यमाने

एक दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय परिषद

२७/०२/२०२०

राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान

समन्वयक

प्रा. तानाजी बोराडे

डॉ. दयानंद शिंदे

डॉ. किशोरकुमार गव्हाणे

प्राचार्य

डॉ. श्रीकृष्ण चंदनशिव

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Bhoom Dist. Osmanabad

Scanned with CamScanner

Date of Publication
27 Feb. 2020

Vidyawarta™

International Multilingual Research Journal

www. विद्यावार्ता .कॉम

YouTube Channel

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

Vidyawarta is peer reviewed research journal. The review committee & editorial board formed/appointed by Harshwardhan Publication scrutinizes the received research papers and articles. Then the recommended papers and articles are published. The editor or publisher doesn't claim that this is UGC CARE approved journal or recommended by any university. We publish this journal for creating awareness and aptitude regarding educational research and literary criticism.

The Views expressed in the published articles,Research Papers etc. are their writers own. This Journal dose not take any libility regarding appoval/disapproval by any university, institute, academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Publicaton is not necessary.

If any judicial matter occurs, the jurisdiction is limited up to Beed (Maharashtra) court only.

Indexed

IMPACT 7.041 iijif FACTOR

Govt. of India,
Trade Marks Registry
Regd. No. 2611690

http://www.printingarea.blogspot.com

Scanned with CamScanner

Editorial Board & review Committee

- **Chief Editor**
  Dr Gholap Bapu Ganpat
  Parli_Vaijnath,Dist. Beed Pin-431515 (Maharashtra)
  9850203295, 7588057695
  vidyawarta@gmail.com

- **M.Saleem**
  salen Ghulam street
  Fatehgarh Sialkot city
  Pakistan. Phone Nr. 0092 3007134022
  saleem.1938@hotmail.com

- **Dr. Momin Mujtaba**
  Faculty Member,Dept. of Business Admin.
  Prince Salman Bin AbdulAziz University
  Ministry of Higher Education,Kingdom of Saudi Arabia, Tel No.: +966-17862370 Extn: 1122

- **N.Nagendrakumar**
  115/478, Campus road,
  Konesapuri, Nilaveli (Postal code-31010),
  Trincomalee, Sri Lanka
  nagendrakumarn@esn.ac.lk

- **Dr. Vikas Sudam Padalkar**
  vikaspadalkar@gmail.com
  Cell. +91 98908 13228 (India),
  + 81 90969 83228 (Japan)

- **Dr. Wankhede Umakant**
  Navgan College, Parli –v Dist. Beed
  Pin 431126 Maharashtra
  Mobi.9421336952
  umakantwankhede@rediffmail.com

- **Dr. Basantani Vinita**
  B-2/8, Sukhwani Paradise,
  Behind Hotel Ganesh, Pimpri,
  Pune-17 Cell: 09405429484,

- **Dr. Bharat Upadhya**
  Post.Warnanagar, Tq.Panhala,
  Dist.Kolhapur-4316113
  Mobi.7588266926

- **Jubraj Khamari**
  AT/PO - Sarkanda, P.S./Block - Sohela
  Via/Dist. - Bargarh, Pin - 768028 (Orissa)
  Mob. No. – 09827983437
  jubrajkhamari@gmail.com

- **Krupa Sophia Livingston**
  289/55, Vasanthapuram,
  ICMC, Chinna Thirupathy Post,
  Salem- 636008 +919655554464
  davidswbts@gmail.com

- **Dr. Wagh Anand**
  Dept. Of Lifelong Learning and Extension
  Dr B A M U Aurangabad pin 431004
  Mobi. 9545778985
  wagh.anand915@gmail.com

- **Dr. Ambhore Shankar**
  Jalna,Maharashtra
  shankar296@gmail.com
  Mobi.9422215556

- **Dr. Ashish Kumar**
  A-2/157, Sector-3, Rohini, Delhi -110085
  Ph.no: 09811055359

- **Prof. Surwade Yogesh**
  Dept. Of Library, Dr B A M U Aurangabad , Pin 431004
  Cell No: +919860765499
  ysgeshps85@gmail.com

- **Dr.Deepak Vishwasrao Patil,**
  At.Post.Soundane, Near
  Kalaishwa Computer, Tq.Dist.Dhule-424002.
  Mobi. 9923811609
  patildeak22583@gmail.com

- **Dr.Vidhya.M.Patwari**
  Vanshree Nagar,Behind Hotel
  Dawat, Mantha Road, Jalna-431203
  Mobi.9422479302
  patwarivm@rediffmail.com

- **Dr.Varma Anju**
  Assistant Professor, Dept. of Education,
  Sikkim University 6th Mile, Samdur Tadong-737102
  GANGTOK - Sikkim, (M.8001605914)
  anjuverma2009@rediffmail.com

- **Dr.Pramod Bhagwan Padwal**
  Associate Professor,Department of Marathi
  Banaras Hindu University,
  Varanasi-221005.(Uttar Pradesh)
  Mobi. 9450533466
  pbpadwal@gmail.com

Scanned with CamScanner

37) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जातिअंतासंबंधी विचार
श्री. समाधान विठ्ठल लोंढे, बार्शी ||116

38) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचार
माने परमेश्वर मुक्तीराम, औरंगाबाद ||119

39) म. जोतीबा फुले यांचे साहित्यातील योगदान
प्रा. पोकळे आबासाहेब नवनाथ, बीड ||121

40) महात्मा जोतीराव फुले यांचे आधुनिक मराठी साहित्यविषयक विचार
सचिन बाबुराव मुंडे, औरंगाबाद ||125

41) ऊर्जा व जलनीतीचे उद्गाते : डॉ. बाबासाहेब आंबेडकर!
प्रा. वाघमारे हरी साधु, लातूर ||129

42) म. ज्योतीबा फुले यांची सामाजिक चळवळ
प्रा. प्रविण अजबराव ठपरे, चंद्रपूर ||135

43) महात्मा ज्योतीराव फुले यांचे शैक्षणिक विचार
प्रा. अंकुश बुध्दिवंत गरुड ||139

44) राजर्षी शाहू महाराज यांचे जलव्यवस्थापन विषयचा आढावा
हुंबे भाऊसाहेब हौसेराव, साबळे पी. अ., पाटोदा ||143

45) फुले – शाहू – आंबडेकर यांचे स्त्री–शिक्षण विषयक विचार
प्रा.डॉ. चारूशिला रा. रूमाले, अकोला ||145

46) डॉ. बाबासाहेब आंबेडकर याचे स्त्रीविषयक विचार
डॉ. प्रकाश बाबुराव तितरे, चंद्रपूर ||148

47) फातिमा शेख आणि राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक योगदान
अस्लम द. अत्तार, कोल्हापूर ||153

48) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषीविषयक योगदान
डॉ. रत्नाकर बाजीराव म्हस्के, उस्मानाबाद ||157

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

Scanned with CamScanner

47

फातिमा शेख आणि राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक योगदान

अस्लम द. अत्तार
संशोधक विद्यार्थी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

गोशवारा :—

महात्मा फुले यांना सर्वसामान्य माणसांची शिक्षणाची सोय करण्याचे श्रेय दिले जाते. शिक्षणाची गंगा खऱ्या अर्थाने बहुजन, वंचित घटकापर्यंत पोहचविण्यासाठी त्यांना त्यांची पत्नी सावित्रीबाई व फातिमा शेख हया दोन्ही महिलांचे सहकार्य लाभले. बहुजन व वंचित कुटूंबांना साक्षर करण्याचे तसेच त्यांना शिक्षणाचे महत्व पटवून देण्याचे काम केले. प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी शिक्षण प्रसाराचे काम जोमाने केले. बहुजन घटकाबरोबर मुस्लीम समाजात देखील शिक्षणाची अनास्था लक्षात घेऊन महात्मा फुले यांनी आपले मित्र उस्मान शेख यांची बहिण फातिमा शेख यांना पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. १८४८ च्या कालखंडात बहुजन समाजाची शिक्षणाची जबाबदारी घेऊन रोप पत्करला होता. तर दुसरीकडे फातिमा शेख यांनी बहुजन समाजाबरोबर मुस्लीम समाजाचा ही रोप पत्करला होता. आपण स्वत: शिक्षित होऊन फातिमा शेख यांनी दलित, मुस्लीम मुलींना शिक्षित करण्याचे प्रयत्न सुरु ठेवलेच त्याचबरोबर अनेक ठिकाणी शाळा सुरु करण्यात पुढाकार घेऊन शिक्षिका म्हणूनही काम योग्य रितीने पार पाडले. दुसरीकडे महात्मा फुले यांच्या विचाराने प्रेरीत होऊन सत्यशोधक समाजाची चळवळ अधिक गतिमान करण्याचे कार्य राजर्षी छत्रपती महाराज यांनी केले. बहुजन समाजाबरोबर मुस्लीम समाजाची शिक्षणाप्रती असलेली उदासिनता राजर्षी शाहू महाराज यांच्या लक्षात आली होती. वेळोवेळी मुस्लीम समाजाला आवाहन करुनही शिक्षण घेण्याचे प्रमाण वाढत नव्हते त्यावेळी राजर्षी शाहू महाराज यांनी स्वत: पुढाकार घेऊन मोहमेडन एज्युकेशनची स्थापना केली. त्याकरिता जागा, उत्पन्नाचे स्त्रोत, दरबारी मदत इ. मदत ही केली शिवाय मुस्लीम शिक्षित लोकांना दरबारात स्थानही दिले.

सूचक शब्द : बहुजन समाज, सत्यशोधक समाज, मुस्लीम समाज, महात्मा फुले, फातिमा शेख, राजर्षी शाहू महाराज.

१. प्रस्तावना :—

स्त्री शिक्षणाचे आद्यकर्ते महात्मा जोतिराव फुले, सावित्रीबाई फुले व फातिमा शेख यांचे योगदान स्त्रीशिक्षणात विशेषत: बहुजन व मुस्लीम समाजात खूपच मोठे आहे. सावित्रीबाई फुले यांच्या बरोबरीने शिक्षणाचे कार्य करणारी मुस्लीम महिला फातिमा शेख ; ngh दलित महिला व मुस्लीम महिलांना शिक्षित करण्याचे श्रेय आहे. पण फातिमा शेख हे पात्र काहीच्या प्रयत्नामुळे बाजूला पडले आहे. सावित्रीबाई फुले ज्यावेळी महात्मा फुले यांना पत्रव्यवहार करतात त्यावेळी आवर्जुन फातिमा शेख यांच्या सहकार्याचा उल्लेख करतात. शिवाय स्त्री शिक्षिका म्हणून केलेल्या कार्याचा गौरवोद्गार ही काढतात. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या समाजामधील शिक्षणाच्या प्रसाराने उस्मान शेख विशेष प्रभावित झाले होते. दलित मुलींना शिक्षण देताना फुले दाम्पत्याची धडपड उस्मान शेख यांनही जवळून बघितली होती, कारण महात्मा फुले हे उस्मान शेख यांचे मित्र होते. आपली बहिण फातिमा शेख यांनाही बहुजन समाज व मुस्लीम समाजात शिक्षण प्रसारासाठी फुले दाम्पत्यांबरोबर आपले योगदान दयावे यासाठी विशेष प्रयत्न उस्मान शेख यांनीही केले. शिवाय फातिमा शेख यांना शिक्षणाच्या प्रसारासाठी वेळोवेळी प्रोत्साहन व आर्थिक मदत ही केली.

बहुजन वर्गासाठी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाची पुढील कार्य करण्याची जबाबदारी राजर्षी शाहू महाराज यांनीही स्विकारली व त्या दृष्टीने त्यांनी बहुजन व विशेषत: मुस्लीम समाजातील शिक्षणासाठी विशेष प्रयत्न सुरु ठेवले. यातून मोहमेडन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली त्याकरिता लागणारी मोकळी जागा, उत्पन्नाचे स्त्रोत, व भरीव आर्थिक मदतही

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada Vidyapeeth

Scanned with CamScanner

दरबारातून केल्याचे दाखले आपणांस मिळतात शिवाय वेळोवेळी याकरिता मुस्लीम समाजातील शिक्षणासाठी विशेष लक्ष ही दिले.

२. उद्दिष्टये :—

१. महात्मा फुले यांचे शैक्षणिक योगदानामधील फातिमा शेख यांचा सहभाग याचा अभ्यास करणे.

२. फातिमा शेख यांच्या शैक्षणिक योगदानाचे विश्लेषण करणे.

३. राजर्षी शाहू महाराज यांचे मुस्लीम शिक्षणातील योगदान जाणून घेणे.

३. गृहिते :—

१. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक योगदान फार मोठे आहे.

२. राजर्षी शाहू महाराज यांचे मनित गटकावर असणारी आस्था खूप प्रचंड आहे.

३. फातिमा शेख यांचे महात्मा फुले यांचे शिक्षण प्रसारातील कार्य खूप मोठे आहे.

४. संशोधन पध्दती

प्रस्तुत संशोधन पेपर हा मुख्यत: मुख्यम साधन सामग्रीवर अधारित आहे. फातिमा शेख यांचे शैक्षणिक योगदान व राजर्षी शाहू महाराज यांचे मुस्लीम शिक्षणाविषयक आस्था यासाठी आधारित आहे. विविध लेख, पुस्तके, इंटरनेट इ. चा वापर केला आहे.

५. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले व फातिमा शेख यांचे शैक्षणिक कार्य:—

०३ जानेवारी १८३१ रोजी फातिमा शेख यांचा जन्म झाला. १९ व्या शतकातील पहिल्या मुस्लीम शिक्षिका फातिमा शेख होत. सन १८४९ मध्ये महात्मा ज्योतीराव फुले यांनी वडिलांनी घरातून बाहेर काढल्यानंतर उस्मान शेख यांनी महात्माफुले यांना आपल्या घरी राहण्याची अनुमती दिली. फुले दाम्पत्याने शैक्षणिक कार्य पाहून उस्मान शेख भारावून गेले होते. त्या जातिविरहीत समाज निर्मिती आणि आधुनिक शिक्षणाची सुरुवात मुलींमध्ये व्हावी या करिता त्या लढल्या. दलित व बहुजन मुलींना शिक्षणाची सोय, फुले दाम्पत्याची धडपड, समाजाकडून होणारा विरोध, हे सर्व उस्मान शेख पाहत होते. आपली बहीण फातिमा शेख हिने ही बहुजन व दलित मुलींसाठी शिक्षण, मुस्लीम मुलींकरिता शिक्षण याकरिता महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या बरोबरीने काम करावे अशी मनोमन इच्छा होती. फातिमा शेख यांना लिहिता व वाचता येत होते. त्यामुळे महात्माफुले यांनी फातिमा शेख हिला शिक्षक ट्रेनिंग कोर्सला पाठविण्यासाठी प्रोत्साहन दिले. 'Normal School' मध्ये सावित्रीबाई फुले व फातिमा शेख दोघेही पदवीधर झाल्या. व भारतातील पहिल्या मुस्लीम शिक्षिका म्हणून फातिमा शेख यांचे नांव गेऊ लागले. १८४९ मध्ये उस्मान शेख यांच्या घरी सावित्रीबाई व फातिमा यांनी मिळून शाळा उघडली त्याला 'Indigenous Library' असे नाव दिले होते. उस्मान शेख यानाही १८४९ मध्ये प्रौढ शिक्षा केंद्र चालू केले होते. दोघाही बहिण-भाऊ यांचे कार्य बहुजन शिक्षणाकरिता धडपड हेच होते. फातिमा शेख मुस्लीम उच्च समाजातील स्त्री होती. मदरशाच्या माध्यमातून स्त्रीयांच्या शिक्षणाची सोय होती पण बहुजन समाजातील स्त्रीयाना हा अधिकार नव्हता. म्हणून फातिमा शेख यांनी दलित मुलींनी शिकवण्याबरोबरच मुस्लीम मुलींना देखील घरोघरी जाऊन त्यांच्या पालकांचे समुपदेशन करून त्यांना मुलींना शाळेत पाठविण्यावर भर दिला गेला.

महात्मा फुले यांच्या वडिलांना समाजामधून बहिष्कृत करण्याचे कारण सांगून महात्मा फुले यांना घराबाहेर काढायला लावणाऱ्या समाजाकडून उस्मान शेख व फातिमा शेख यानाही त्रास होत होता. सावित्रीबाई यांच्या बरोबरीने फातिमा शेख ज्यावेळी शिक्षण प्रसारासाठी बाहेर पडत होत्या त्यावेळी दगड, शेण यांचा सामना करावा लागत होता. सावित्रीबाईना उच्च समाजातील लोकांकडून त्रास होत होता. पण फातिमा शेख यांना उच्च समाजाबरोबरच मुस्लीम समाजाकडूनही त्रास दिला जात होता. पण दोघीनीही यास न जुमानता शिक्षणाचे कार्य पुढे तसेच सुरु ठेवले. पुणे येथील मोठ्या ब्राम्हण समाजाविरोधात केलेले कार्य निश्चितच अमूल्य आहे. महात्मा फुले यांनी काढलेल्या पाचही शाळात अध्यापनाचे काम सावित्रीबाई फुले यांच्या बरोबर फातिमा शेख यांनीही केले. फावल्या वेळेत घरोघरी जाऊन फातिमा शेख शिक्षणाविषयी प्रसाराचे काम करीत होत्या. ज्या पालकांच्या मुली शाळेत

Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Parli Vaijnath Dist. Beed

Scanned with CamScanner

पाठवण्यास तयार नाहीत अशा पालकांचे समुपदेशन करत असे. दोन शैक्षणिक ट्रस्ट महात्मा फुले यांनी स्थापन केले त्यामध्ये Native Education School, Pune व Education of Mahars, Mang & Bahujaan यांचेही नेतृत्वही सावित्रीबाई फुले व फातिमा शेख यांनी केले.

फातिमा शेख यांचे व्यक्तिमत्व याबद्दल कोणताच ठोस पुरावा उपलब्ध नाही व उच्च वर्णीयांकडून त्यांचे व्यक्तीमत्व जाणूनबुजून झाकलेले आहे. किंवा नष्ट केलेले आहे. भारतातील पहिल्या मुस्लीम शिक्षिका म्हणून फातिमा शेख यांचे नाव गौरवाने घेतले जाते. महाराष्ट्र सरकारने त्यांचे योगदान लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती, बालभारती पुस्तकात उर्दु माध्यमाकरिता जीवनपरिचय दिला आहे.

६. राजर्षी शाहू महाराज आणि मुस्लीम समाज

छत्रपती शाहू महाराजांच्या सामाजिक कार्याचा गौरव म्हणून कानपूर येथे मुर्मी क्षत्रिय सभेने १९१९ साली 'राजर्षी' ही पदवी बहाल केली. राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्यामुळे दलित,पतितांचा उध्दारक, रयतेचा राजा म्हणून त्यांची प्रतिमा जनसामान्यात निर्माण झाली आहे. ब्रिटीश राजसत्तेच्या काळात सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व बहुजन समाजाच्या एकूणच सामाजिक उन्नतीसाठी राजर्षी शाहू महाराजांनी प्रयत्न केले. सामाजिक परिवर्तनाला गती प्राप्त करुन दिली. सनातनी कार्यांच्या विरोधाला न जुमानता त्यांनी दलित व मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी तसेच लिंगायत, जैन, मुस्लीम अशा जाती शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या होत्या अशा समाजात शिक्षणाचा प्रसार व्हायला पाहिजे असे राजर्षी शाहू महाराजांना वाटत होते. राजर्षी शाहू महाराज १९०२ मध्ये इंग्लंडच्या दौऱ्यावरुन आल्यानंतर राजर्षी शाहू महाराज यांचा सत्कार करण्याचा कार्यक्रम मुस्लीम समाजाने आयोजित केला होता या कार्यक्रमात बोलताना मुस्लीम समाजातील लोकांच्याकडून त्यांच्या शिक्षणासाठी जनजागृती चळवळ उभी करावी तसेच शैक्षणिक संस्था स्थापन करावी याकरिता दरबाराकडून पूर्ण मदत केले जाईल अशी अपेक्षा व्यक्त केली. मुस्लीम समाजाची शिक्षणाविषयी अनास्था असल्याने या समाजाकडून कारसे प्रयत्न झाले नाहीत हे राजर्षी शाहू महाराजांच्या लक्षात आले. शाहू महाराज गप्प बसले नाहीत त्यांनी शिक्षण घेण्यासाठी प्रयत्न करण्याऱ्या १० मुस्लीम विद्यार्थ्यांना कोल्हापुरात अगोदरच स्थापन झालेल्या व्हिटोरीया मराठा बोर्डिंगमध्ये प्रवेश देऊन मुस्लीमांच्या शिक्षणाचा प्रारंभ केला. १० विद्यार्थ्यांमध्ये एक कर्नाटकातील अथणी गावचा शेख महमंद युनुस अब्दुला होता. यास राजाराम कॉलेजमधून पदवीपर्यंतचे शिक्षण घ्यावयास लावले. राजर्षी शाहू महाराजांनी शेख मंहमद यास आपल्या संस्थानात मामलेदार म्हणून नियुक्त केले. मुस्लीम समाजाची शैक्षणिक अवस्था दयनीय होती म्हणून शेख महंमद यांच्यावर मुस्लीमामधील शिक्षणाचा प्रसार व्हायला पाहिजे या दृष्टीने जबाबदारी त्याच्यावर सोपविली.

१९०६ मध्ये राजर्षी शाहू महाराजांनी पुढाकार घेऊन मुस्लीम समाजातील प्रतिष्ठित मंडळांची बैठक बोलविली त्यांत त्यांनी मोहमेडन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली व स्वत: या सोसायटीचे अध्यक्ष बनले कारणही जाणीवपूर्वक होते. मुस्लीम समाजाविषयी शाहू महाराजांना आस्था तर होती शिवाय त्यांच्या शिक्षणाची पूर्ण जबाबदारी त्यांनी उचलली होती. शेख महंमद यास कार्यवाह बनविले. वेगवेगळया समाजाच्या शिक्षणाच्या प्रसारासाठी त्यांनी वसतिगृहे बनविले पण कोणत्याच संस्थेने पदाधिकारी शाहू महाराज बनले नव्हते. मात्र मुस्लीम समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार वेगाने होण्याचे हेतूने ते अध्यक्ष बनले होते. मुस्लीम बोर्डींगची स्थापना ही केली. तसेच वेगवेगळया मुस्लीम दर्ग्यांचे उत्पन्न बोर्डिंगला देण्यात यावे असे सुचविले गेले.

मराठा बोर्डिंगजवळ २५ हजार चौ. फुटांची मोकळी जागा मुस्लीम बोर्डिंगसाठी दिली. तसेच इमारतीसाठी ५५००/— देणगी दिली व संस्थानातील जंगलातून मोफत सागवान झाडे दिली राजर्षी शाहू महाराजांचे गुरु फ्रेझर साहेब यांच्या हस्ते बोर्डिंगची पायाभरणी केली. या संस्थेस शाहू महाराजांनी २५०/— रु. वार्षिक अनुदान व वार्षिक सहा—सात हजार रुपये उत्पन्न येईल एवढया जमिनी बहाल केल्या. मुस्लीम समाजातील मुलांनी शिकावे यासाठी महाराजांनी भरभरुन दान दिले होते. मराठा समाजापेक्षा मुस्लीम समाजात

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Library

Scanned with CamScanner

शिक्षणाच्या बाबतील अधिक उदासिन होता. तेव्हा अशा समाजाकडे विशेष तर दयावे असे त्यांना वाटत होते. आपल्या संपूर्ण कारकिर्दीत शाहू महाराजांनी हिंदू, मुस्लीम भावनिक व सामाजिक ऐक्यावर भर दिला. त्यासाठी अनेक उपक्रम होती घेतले, अनेक प्रयोगही केले. राजकन्या आक्कासाहेब यांच्या विवाहाच्या निमित्ताने एक प्रयोग केला. याप्रसंगी अनेक मराठा वधू–वरांचे विवाह लावले गेले. त्यासोबत मुस्लीम जोडप्यांचेही विवाह साजरे केले गेले. यातून मराठयांच्या इतकाच मुस्लीम समाजही महाराजांना जवळचा वाटत होता हे यातून स्पष्ट होते.

कुराण धर्मग्रंथ अरबी भाषेत असल्याने त्याचा अर्थ मुस्लीमांना समजत नव्हता. कुराणातील धर्मतत्वांचा अर्थबोध सामान्य माणसांना झाला पाहिजे याकरिता राजर्षी शाहू महाराजांनी मराठीत भाषांतर करण्याचे कामही त्यांनी सुरु केले होते. याकरिता दरबारातून २५०००/– रक्कम खर्च झाली होती हे काम अपूर्ण राहिल. १९१७ साली मुस्लीम समाजाच्या हिताच्या पण रक्षणासाठी काझी अथवा मौलवी यांनी लावलेल्या विवाहास कायदेशीर प्राप्त व्हावा यासाठी लग्नाच्या रजिस्टरवर सही व शिक्का घेण्याची सक्ती केली. रजिस्टरवर सरकारी नोंदणीचे कायदयाचे बंधने घातली. ही बाब मुस्लीम स्त्रियांच्या हिताची अधिक होती. न्यायव्यवस्थेमधील उच्चवर्णियांची मक्तेदारी संपविण्यासाठी महाराजांनी बहुजन समाजातील अनेक होतकरु तरुणांना वकिलीच्या सनदा दिल्या त्यामध्ये मुस्लीमांचाही समावेश केला होता. शेख अल्ली महंमद, महंमदहुसेन मियासाहेब चिकोडीकर, हुसेन दादाभाई जमादार अशी त्या काळातील मुस्लीम सनदी वकिलांची नावे होत.

आज मुस्लीम बोर्डिगमुन हजारो विद्यार्थी शिक्षण घेऊन बाहेर पडत आहे. यामध्ये हायस्कूल, ज्युनिअर कॉलेज तसेच स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र यांचा समावेश होतो. यामधून गुणवंत विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तसेच स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात मुस्लीम विद्यार्थ्यांच्या बरोबर इतर समाजातील विद्यार्थी ही अभ्यास करीत आहेत. हे सर्व राजर्षी शाहू महाराजांची दूरदृष्टीच होय.

७. निष्कर्ष :–

१. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक योगदान मोठे आहे. त्यांच्याबरोबरने काम करणाऱ्या पहिल्या मुस्लीम शिक्षिका फातिमा शेख यांच्यावर संशोधन करण्याची नितांत गरज आहे.

२. फातिमा शेख यांचे बहुजन, दलित व मुस्लीम मुलींच्या शिक्षणातील योगदान महत्वपूर्ण आहे.

३. उस्मान शेख व फातिमा शेख या भाऊ, बहिणीचे पुण्याच्या बहुजन समाजातील शिक्षणा मधील हिस्सा उल्लेखपूर्ण आहे.

४. फातिमा शेख व उस्मान शेख हे भाऊ, बहिण यांनी धर्माचो चौकट ओलांडून केलेले शैक्षणिक कार्य नक्कीच समाजामध्ये वेगळे स्थान निर्माण करते.

५. राजर्षी शाहू महाराज यांचे प्रगल्भ विचार दिसतात मुस्लीम समाजाची स्थिती शिक्षणाकडून सुधारु शकते यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले.

६. राजर्षी शाहू महाराजांचे मुस्लीमांमध्ये शैक्षणिक सुधारणा विषयी आस्था स्पष्ट दिसून येते.

७. मुस्लीम समाजाने शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी केलेले कार्य उल्लेखनीय आहे.

८. मुस्लीम समाजातील शिक्षणासाठी केलेली आर्थिक मदत, बोर्डिगची स्थापना, उत्पन्न स्रोत यामुळे कोल्हापूरातील मुस्लीम समाज शैक्षणिक प्रवाहात आणण्याचे प्रयत्न खूपच मोठे आहेत.

संदर्भ :–

१. www.indianmuslim.com

२. www.justicenews.co.in

३. महात्मा फुले गौरवग्रंथ च्यछ ४७ डॉ. मा. गो.माळी.

४. www.india.shafaqna.com

५. www.nationalindianews.in

६. Livemin.com

७. राजर्षी शाहू नव्या दिशा नवे चिंतन, डॉ. नारायण कांबळे, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

८. Susje. J. Tharu : k, Lalita (1991) Woman writing in India : 600 B.C. to the early twentieth century ISBN 978-1-55861-027-9

❑❑❑

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Peth Vadgaon Dist. Kolhapur

Scanned with CamScanner

ISSN 2349-638x
Impact Factor 6.293

Indian Council of Social Science and Research

(ICSSR)Western Regional Centre, Mumbai

and

Sahyadri Parisar Shikshan Prasarak Mandal's

SHRI. MANOHAR HARI KHAPANE COLLEGE OF ARTS AND COMMERCE, PACHAL

At/post- Rayapatan, Tal- Rajapur, Dist- Ratnagiri
Email-mhkcollegepachal@gmail.com
Re-Accrediated 'B' Grade by NAAC

Jointly Organized

One Day National Level

Multi Disciplinary Conference

On

"Impact of Migration on Rural and Urban Area in India"

On Saturday 29th February 2020

Dr. K. M. Kotwal
Principal

Dr. A. D. Patil
Conference Co-ordinator



Sr.No.	Name Of Author	Title Of Paper	Page No.
38	प्रा. प्रसाद सुरेश भागवत	ग्रामीण नागरी स्थलांतर प्रक्रियेची कारणमिमांसा	163
39	प्रो.प्रमोद अरविंद देसाई	शहरी स्थलांतराचे स्वरुप व परीणाम	166
40	डॉ. बी.पी. बोगार्डे	मसणजोगी समाजाचे स्थलांतर आणि लोकसंस्कृती	172
41	प्रा. डॉ. सत्येंद्र विजय राजे	स्थलांतराचा रत्नागिरी जिल्हयातील कृषी क्षेत्रावरील प्रभाव (1832 - 1947)	175
42	डॉ. सोमनाथ कदम	सिंधुदुर्गातील स्थलांतरित कातकरी समाजाची संस्कृती आणि समस्या व उपाय	180
43	डॉ. शेखर सुरेश पाटील	स्थलांतरणाची कारणे व परिणाम	184
44	सौ. सविता श्रीमंत शिरोळे	ग्रामीण स्थलांतर - कारणे व परिणाम	190
45	प्रा.डॉ. सुधीर सोपान वाघमारे	भारतातील स्थलांतराची कारणे आणि उपाय योजना	196
46	नेहा अशोक चव्हाण, युक्ता संतोष शिवदे	रत्नागिरी तालुक्यातील ग्रामीण भागातील श्रमिकांच्या स्थलांतराचा अभ्यास	201
47	प्रा. वैभव उदय कीर	भारतातील स्थलांतराचा ग्रामीण व शहरी भागावर होणारा परिणाम	206
48	प्रा.डॉ. डी.टी. कदम,	आदिवासी समाजाचे स्थलांतर : कारणे व परिणाम	210
49	प्रा. संग्राम विश्वास चव्हाण	स्थलांतरीत श्रमिकांच्या आर्थिक सामाजिक , समस्या व उपाययोजना	217
50	प्रा. डॉ. डी. व्ही. हारगिले	लोकसंख्या स्थलांतराची कारणे आणि परिणाम	221
51	डॉ. एस्. पी. तेरसे	स्थलांतराचे विविध प्रकार आणि स्थलांतराची वास्तविकता	223
52	अस्लम द. अत्तार	महाराष्ट्रातील स्थलांतर प्रश्न आणि उपाय	225
53	डॉ.संगीता भालचंद्र काटकर	कोकण विभागातील स्थलांतर	231
54	प्रा. विनोद कृष्णा भुवड	स्थलांतर आणि स्थलांतराची कारणे	2
55	डॉ.दिनेश सखाराम माश्रणकर	भारतातील ग्रामीण- नागरी स्थलांतर	2

Babasaheb Ambedkar Mahavidyalaya
Dist Kolhapur

महाराष्ट्रातील स्थलांतर प्रश्न आणि उपाय

अस्लम द. अत्तार
संशोधक विद्यार्थी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

गोशवारा :-

भारत हा खेड्यापाड्यांचा देश आहे." The soul of India a lives in its villages." Mahatma Gandhi स्वातंत्र्यानंतर व पूर्वी स्थलांतर ही मोठी समस्या प्रत्येक देशास लागली आहे. मानवी जीवन सुरु झाल्यानंतर स्थलांतर हे देखील सुरु झाली. स्थलांतराची पूर्वीची व सध्याची कारणे विभिन्न आहेत. पूर्वी सुरक्षित जागेकरिता तसेच सुपीक जमीन व पाणी याकरीता स्थलांतरे झाली आहेत. धर्माचा प्रसार, नवीन बाजारपेठांचा शोध, इ. करिताही स्थलांतर जाणीवपूर्वक घडवून आणली आहेत, पण अलीकडील दशकात लोकसंख्येचे स्थलांतर काम, व्यापार, शिक्षण, लग्न या कारणासाठी झालेले दिसून येते. स्थलांतरामुळे लोकसंख्येचा प्रश्न आणखी बिकट बनू लागतो. स्थलांतर व शहरीकरण एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. शहरीकरण होण्यास लोकसंख्येबरोबर स्थलांतर देखील जबाबदार आहे. स्थलांतर ही प्रक्रिया हळूहळू वाढत जाणारी सततची प्रक्रिया आहे. व याचा परिणाम म्हणून नागरीकरण/शहरीकरण होत जाते. जगाची ५४% लोकसंख्या ही शहरी भागात राहते. हेच प्रमाण ६६% २०५० पर्यंत जाईल, असे युनायटेड नेशन रिपोर्टमध्ये दाखवले आहे. जगातील दुसरे दिल्ली हे लोकसंख्या असणारे महानगर भारतात आहे. यामध्ये २.५ कोटी लोक राहतात त्या खालोखाल मुंबईत २.१ कोटी लोक राहतात. महाराष्ट्राचा विचार करता बाहेर राज्यातून मोठया प्रमाणात स्थलांतर एकटया मुंबईत होते, त्यानंतर पुणे येथे होते. उत्तरप्रदेश आणि बिहार या दोन राज्यातून मुंबईत स्थलांतर होण्याचे प्रमाण २०.८% इतके आहे. भारताचा विचार करता या दोन राज्यातून देशात अन्य राज्यात स्थलांतर होण्याचे प्रमाण ३७% आहे. ही लोकसंख्या २.९ कोटी आहे. स्थलांतरामुळे शहरीकरण समस्या मोठया प्रमाणात वाढली आहे. शहरीकरणास कारणीभूत असणाऱ्या घटकामध्ये स्थलांतर हा घटक हळूहळू वाढत चाललेला पण गंभीर स्वरूप धारण करणारा बनला आहे. नियोजन करताना या समस्येचा विचार करून उपाय शोधून लोकसंख्येचे स्थलांतर रोखले पाहिजे.

सूचकशब्द : लोकसंख्या, स्थलांतर, शहरीकरण, रोजगार, महानगरे

१) प्रस्तावना :-

मानवी जीवनाबरोबर पशु, पक्षी, प्राणी यांच्यामध्येही स्थलांतरही संकल्पना दिसून येते. मानवी जीवनमानाचा स्थलांतराशी सकारात्मक परिणाम जोडला गेला आहे. स्थलांतर मनुष्य जीवनाची सुरुवात झाल्यानंतर सुरु झालेली प्रक्रिया आज त्याचे स्वरूप बदलले आहे. धर्माचा प्रसार व व्यापार यातून स्थलांतरे होऊ लागली. सध्या रोजगार,व्यापार, शिक्षण, लग्न यामुळे स्थलांतर होऊ लागले आहे. ग्रामीण भागातून शहरी भागाकडे मोठया प्रमाणात लोकसंख्येचे स्थलांतर होऊ लागले आहे. भरपूर वेतन, चांगले शिक्षण, राजकीय व सामाजिक स्थिरता, नवे तंत्रज्ञान, रोजगाराच्या व उद्योगाच्या संधी यामुळे ग्रामीण भागातील/खेड्यातील लोक शहराकडे आकर्षिली जातात. दारिद्रय, बेकारी, पिकांची उत्पादन शक्यता कमी, सामाजिक विषमता, दुष्काळ, महापूर, सामाजिक सोयी व सुविधा कमतरता यामुळे लोकसंख्या शहरी भागाकडे स्थलांतरीत होते. [illegible]

हॉस्पिटल (आरोग्य सुविधा), शाळा, पिण्याच्या पाण्याची सोय, वीज, रोजगार संधी यामुळे ते स्थिरावतात व यातून शहरीकरण प्रक्रिया सतत व अखंड सुरु राहते.

Migration is the demographic process that links rural to urban areas, generating or spurring the growth of cities. स्थलांतर प्रक्रिया लोकसंख्येशी निगडित आहे. ग्रामीण खेडयातून शहरी भागाकडे होत असते व यातून शहरांची वाढ प्रचंड होत असते. यालाच शहरीकरण किंवा नागरीकरण असे नाव देता येईल. The process of society transformation from a predominantly rural to a predominantly urban- population is defined as urbanization. It includes two things an increase in the number of people living in urban settlements and an increase in the percentage of the population engaged in non-agricultural activities living in such places. प्रत्येक तीन भारतीयांपैकी १ भारतीय शहरात राहतो. भारतातील ग्रामीण खेडयांचे स्थलांतर दिल्ली, मुंबई, बेंगलोर, हैद्राबाद, अहमदाबाद, चेन्नई, कोलकत्ता, सुरत आणि पुणे शहरात होत आहे. १९५० पासून २०१५ पर्यंतच्या शहरी लोकसंख्येचे प्रमाण १७.१% पासून २९.२% झाले तर दुसरीकडे ग्रामीण लोकसंख्या याच कालावधीत ८२.९% पासून ६७.२% इतकी कमी झाली.

२) उद्देश :-

१. महाराष्ट्रात होणाऱ्या लोकसंख्या स्थलांतराची समस्या जाणून घेणे.
२. महाराष्ट्रातील लोकसंख्या स्थलांतराचा अभ्यास करणे.
